साप्ताहिक

१५ फेब्रुवारी ८६ / २ रुपये

# माणूस




## जेव्हा एक महाविद्यालय विकासाचं केंद्र असते...



**मृत्युपत्र**
एक रहस्यकथा

साप्ताहिक
# माणूस
¤
वर्ष : पंचविसावे
अंक : अडतिसावा
¤
१५ फेब्रुवारी १९८६
किंमत : दोन रुपये
¤
संपादक
श्री. ग. माजगावकर
¤
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस
¤
वार्षिक वर्गणी
साठ रुपये
¤
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही
¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९
¤
मुखपृष्ठ—श्याम देशपांडे
¤
छायाचित्रे
१. एका पाणीपुरवठा योजनेचे उद्‌घाटन
२. दुर्बल घटकांसाठी घर योजना



# मुंबापुरी

## ☐ अनावृत्त पत्र

राजमान्य राजेश्री श्रीमान अरुण पुरी, संपादक, ' इंडिया टुडे ', नवी दिल्ली, यांसी, स. न. वि. वि.

हे पत्र खरं तर डायरेक्ट आपणास कनॉट प्लेसच्या पत्त्यावर धाडणार होतो. पण आमचं इंग्रजी बेताचं. त्याला कोण काय करणार. स्पेलिंगच्याच केवढ्या तरी चुका होणार. पुन्हा टायपिंगचा वांधा. तेव्हा म्हटलं मायबोलीतच पत्र लिहू. तुम्हाला कळायचं असेल तर कळेल. नाहीतर राहिलं.

सध्या सर्वत्र ज्यांचा जयघोष होतोय आणि सर्वंकष क्रांतीचा प्रत्येक रविवारी दुपारी सव्वा बारा वाजता ज्या फार्मुला पेश करतात त्या श्रीमती प्रिया तेंडुलकरांची आपल्या पत्रप्रतिनिधीने ज्या प्रकारे बोळवण केली त्याचा ह्या पत्राद्वारे आम्ही कडाडून निषेध करतो. (पत्राखाली केवळ आमची सही आहे म्हणून हे पत्र. अर्धा डझन सह्या मिळाल्या असत्या तर पत्रकच काढलं असतं. आमच्या महाराष्ट्रात सह्या मिळवणं काही खास कठीण नाही.)

आम्हाला समजली ती हकिगत संक्षेपात अशी की आपल्या पाक्षिकाने ' रजनी ' वर कवर फीचर करण्याचं मनात घेतलं. त्यानुसार आपला दिल्लीचा प्रतिनिधी विमानाने मुंबईस दाखल झाला. ' रजनी 'चं चित्रीकरण जिथे चाललं होतं तिथे जाऊन या प्रतिनिधीने धांगडधिंगा घातला. बाशू च्यॅटर्जींची खरडपट्टी काढली. (त्यासंबंधी प्रितिश नंदी पत्रक काढताहेत असं ऐकतोय.) प्रिया तेंडुलकरांशी आपण आत्ताच बातचीत सुरू करणार असा हेका धरून या प्रतिनिधीने शूटिंगमध्ये अडथळा उत्पन्न केला.

त्यानंतर आपले जगद्‌विख्यात छायाचित्रकार रघू राय दिल्लीहून विमानाने मुंबईत दाखल झाले. रजनीचे फोटो घेण्यासाठी. त्यांनी प्रिया तेंडुलकरांना टॅक्सीतून दाही दिशा फिरवलं. नंतर गेटवे ऑफ इंडियाकडे एका विशिष्ट पोजमध्ये उभं राहायला सांगितलं. (इथे एक खुलासा आवश्यक आहे. आपल्याला एकूणच महाराष्ट्राची आणि मुंबईची फारशी माहिती नाही. तेव्हा ' गेटवे ऑफ इंडिया ' म्हणजे ' टाईम्स ऑफ इंडिया' सारखं एखादं वर्तमानपत्र आहे असा आपला समज होईल. तेवढ्यासाठी आपण विमानाने लंडनला जाऊन ' इंडिया हौस ' मधला भारताचा नकाशा पाहून याल. तसं करू नका. गेटवे ऑफ इंडिया म्हणजे भारताचं प्रवेशद्वार. त्याच्यासमोर ' ताजमहाल ' हॉटेल आहे. आता कसं नेमकं लक्षात आलं ? ) असो.

एवढा सगळा अपमान, चुकलो, अन्याय त्या प्रियाबाईंनी कसा काय सहन केला कोण जाणे. पिताजी राजमान्य राजेश्री विजयराव तेंडुलकर नसते तर काय झालं असतं कल्पनाच करवत नाही.

एवढा धांगडधिंगा घातल्यानंतर प्रिया मुलाखत देणार नाही अशी आपल्या प्रतिनिधीला काळजी वाटली. त्याने विजयरावांना इत्थंभूत माहिती सांगितली. आम्हाला वाटलं विजयराव जीप, टेपरेकॉर्डर आणि 'म. टा.'चा वार्ताहर घेऊन घटनास्थळी जाऊन रिपोर्ताज लिहायला बसतील. पण विजयरावांनी ही वैचारिक फुगडी घातली नाही अन प्रियाला मुलाखत रद्द न करण्याचा सल्ला दिला. पिताजींचाच सल्ला. मुलींनी मानायचा नाही तर काय ? आयुष्य म्हणजे ' कन्यादान ' नाटकातला दुसरा अंक नव्हे.

आपले फोटोग्राफर रघु राय तर इतकं जहरी बोलले की विचारू नका. फोटो काढतेवेळी प्रियाने सहज श्री. रायना ' रजनी ' विषयी विचारलं, तर ते म्हणाले की 'रजनी' सारखा फडतूस कार्यक्रम पाहणं म्हणजे वेळेचा

अपव्यय आहे असं बोलावं का ?

कलावंताच बोलणं कसं असावं ? प्रतिबिंबात्मक. त्रि–स्तरीय. सूक्ष्म, (संदर्भाकरता विजय तेंडुलकरांची 'लोकसत्ते' तली शाहबानो आणि समान नागरी कायद्यावरची मुलाखत वाचावी. मुलाखतकर्त्या प्रकाश कुलकर्णींनादेखील तेंडुलकराची उत्तरे कळली आहेतसं एकूण वाटत नाही.)

असो. पत्र बरंच लांबलं. पत्राचा अनुवाद प्रणय गुप्तेंकडनं करून घेणे. त्यासाठी खास विमानात इलेक्ट्रॉनिक अनुवादाची सोय आपण करून घ्यालच. ज्ञानेश्वर नाडकर्णींना अनुवाद करायला सांगितलं असत. पण ते सांप्रत फ्रेंच शिकताहेत. तेव्हा कळावे. लोभ असावा ही विनती.

आपले,
विष्णू जयदेव

## ☐ राष्ट्रवाद आणि धर्मश्रद्धा

मुंबापुरीत सध्या पोप जॉन पॉल ह्यांच्या आगमनाची धावपळ सुरू आहे. मुंबापुरीतील त्यांचा कार्यक्रम भरगच्च आहे. स्वत: सोनिया गांधी इटालिन असल्याने पोप महाशयाना स्टेट गेस्ट म्हणून बोलाविण्यात आले आहे असे म्हटले जाते. यात कितपत तथ्य आहे हे आम्हाला ठाऊक नाही. परंतु जगात सर्वत्रच किचन कॅबिनेट हे सर्वशक्तिमान कॅबिनेट असते, त्यामुळे पंतप्रधानाचे घरही त्याला अपवाद नसावे. जागतिक दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर त्यांची ही व्हॅटिकन बाहेरील भेट असल्याने अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात येत आहे. शांतिदूताच्याही जीवाला धोका असावा ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट म्हणायला हवी.

धर्मसत्ता आणि राजसत्ता ह्यांच्यातील संघर्ष जुना आहे. एके काळी युरोपमध्ये धर्म सत्तेचे प्राबल्य होते. धर्मसत्ता राज्याच्या सीमारेषा जुमानित नव्हती. राष्ट्र आणि राष्ट्रवादाची कल्पना जसजशी रुजत गेली तसा धर्मसत्तेचा प्रभाव कमी होत गेला. पोपचे प्रत्यक्ष साम्राज्य हे व्हॅटिकन पुरते मर्यादित झाले. परंतु अजूनही राष्ट्रीयत्वापेक्षाही धर्माचा पगडा लोकांवर अधिक मजबूत आहे. जोपर्यंत धर्मसत्तेचा आणि राज्यसत्तेचा झगडा सुरू होत नाही तोवर ह्या प्रभावाची जाणीव होत नाही. परंतु कोणत्याही परकी नेत्यापेक्षाही पोप महाशयाच्या दर्शनाला लोटणाऱ्या जनसमुदायावरून ह्या धर्मसत्तेच्या सामर्थ्याची जाणीव व्हावी.

उदाहरणादाखल बोलायचे झाले तर बहुसंख्य मुसलमानामध्ये अजूनही 'पॅन इस्लाम' च्या संकल्पनेला स्थान आहे. धर्मसत्ता आणि राज्यसत्ता ह्यामध्ये अजूनही सर्वसामान्य मुसलमान फरक करू शकत नाही. त्यामुळेच मुसलमान जेथे बहुसंख्य असतात तेथे ते इस्लामिक स्टेटची स्थापना करतात आणि अल्पसंख्याक असतात तेथे पॅन इस्लामसारख्या चळवळी मूळ धरतात.

कॅथॉलिक चर्चही आता पूर्वीइतके एकसंध राहिले नाही. युरोपबाहेर पसरलेला ख्रिस्ती समाजही त्या मानाने बराच सुधारलेला आणि सुधारमतवादी आहे. धर्माच्या जनमानसावरील अनिर्बंध सत्तेला तडा जाणे हे एका अर्थाने लोकाच्या हिताचे लक्षण मानले पाहिजे. राष्ट्रवाद आणि राष्ट्रीयत्व हे धर्मश्रद्धेपेक्षाही श्रेष्ठ तत्त्व आहे हे लोकाच्या मनामध्ये रूजणे हीच सुधारणेची पहिली पायरी आहे. ह्या सर्वांच्याही पलीकडे मानवतावाद हे सर्वश्रेष्ठ तत्त्व मानले पाहिजे.

कॅथॉलिक चर्चचे संपूर्ण भारतीयकरण, देशातील प्रार्थना स्थळांना बाहेरून मिळणाऱ्या देणग्या, शैक्षणिक मदत–वैद्यकीय सेवा आणि धर्मांतर ह्यांच्यातील संबंध, घटस्फोट, गर्भपात ह्या संबंधीचा वाद ह्या बद्दल पोप महाशय मुंबापुरीत तरी काही बोलतील अशी आमची अपेक्षा नव्हतीच; परंतु आजच्या ह्या अश्रद्ध अस्थिर जगात कुणी तरी व्यासपीठावरून उत्कटतेने प्रेमाचे आणि सद्भावनेचे आवाहन करावे ह्याचेही महत्त्व काही कमी नाही.

## ☐ जुने आणि सोने

मुंबापुरीचे माजी महापौर बोमन बेहेराम गेले ह्याचे आम्हाला भारी वाईट वाटले. बोमन बेहेराम हे अठ्ठात्तर सालापासून सतत महापालिकेवर निवडून येत होते. पाचही निवडणुका त्यांनी ए वॉर्डमधून अपक्ष म्हणूनच लढविल्या. एकोणिसशे चौऱ्याहात्तर पंचाहात्तरमध्ये ते महापौरपदी होते. महापालिकेच्या सभागृहातली त्यांची भाषणे फार अभ्यासपूर्ण होत असत. महापालिकेतील जुन्या प्रभावी वक्त्यापैकी ते शेवटचेच म्हणायला हवे. त्यांचे चुलते, त्यांचेही नाव बोमन बेहेराम–मुंबापुरीचे पहिले महापौर होते. सध्या छगन भुजबळ महापौर आहेत.

बोमन बेहेराम अतिशय वक्तशीर होते. बरोबर तीनच्या ठोक्याला ते महापालिका सभागृहात हजर होत असत. वयाची सत्तरी उलटली तरी कामाचा उत्साह ओसरला नव्हता. ते व्यवसायाने वकील होते. पारशी पंचायतचे ट्रस्टी म्हणूनही काम पहात होते. इतर अनेक संस्थांशीही त्यांचा संबंध होता.

एकतीस मार्च एकोणिसशे चौऱ्याऐंशीला मुंबई महानगरपालिका राज्य सरकारने बरखास्त केली त्याला मोजक्या नगरसेवकांनीच विरोध केला. स्थानिक स्वराज्य संस्थेची एकशे दहा वर्षांची परंपरा खंडित झाली ह्याचे बोमन बेहेराम ह्याना फार दु:ख झाले. ह्या प्रसंगी विधान सभेवर जो मोर्चा नेण्यात आला त्याला जेमतेम वीस ते तीस नगरसेवक हजर राहिले. बोमन बेहेराम ह्यांनी त्या मोर्चाचे नेतृत्व केले होते. मागे हृदय विकाराचा झटका आल्याने ते चालणे सहसा टाळीत असत. पण भर उन्हात पाय ओढत ते विधानसभेपर्यंत गेले. लोकशाही संस्थाबद्दलची त्यांची आस्था पुस्तकी नव्हती. बरखास्तीच्या काळातही वृत्तपत्रातून लेख लिहून आपली मते ते सतत मांडीत राहिले. ते लेखाचा मोबदला कधीच घेत नसत. मात्र त्यांचा आग्रह असे की त्यांचा लेख हा एडीट पेज किंवा कव्हर स्टोरी म्हणून वापरला जावा.

एप्रिल एकोणिसशे पंचाऐंशीमध्ये महापालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा सत्तावीस वर्षात प्रथमच बोमन बेहेराम ह्यांचा पराभव झाला. कॉंग्रेस आयचे कांती घुल्ला नावाचे उमेदवार निवडून आले. ते व्यवसायाने पत्रकार. त्यांची ही पहिलीच निवडणूक. आधीच पत्रकार आणि तशात राजकारणी तेव्हा त्यांच्याबद्दल अधिक काय लिहावे ? मागे प्रभाकर कुंटयाना प्रदेश कॉंग्रेसच्या कार्यालयाशी जी मारहाण झाली त्यात कांती घुल्ला ह्यांचा सहभाग होता. गेले कित्येक महिने त्याना सभागृहात पाहिल्याचे आम्हाला आठवत नाही.

पराभवामुळे बोमन बेहेराम याच्या दिनक्रमात बदल झाला नाही. 'ए' वॉर्डच्या

कार्यालयात लोकांची कामे पहाण्यासाठी ते नियमित जात असत. आठवड्यातून एकदा महापालिकेतही त्याची फेरी असे. निवडणुकीनतर काही दिवस धुल्ला स्वत ला जायंट किलर म्हणवून घेत असत. बोमन बेहेराम खरोखरीच जायट होते. त्यानी पराभवाचा दोष कुणाला दिला नाही. काती धुल्ला कोण कुठले–कुठल्या लाटेने किनाऱ्यावर आले. ह्याची कधी चौकशीही त्यानी केली नाही.

बाय द वे, जायंट किलर जॉर्ज फर्नांडिस ह्याचे पुढे काय झाले !

— विष्णु जयदेव

पुणे वार्ता

# जोडो भारत

पाच फेब्रुवारीची संध्याकाळ. विद्यार्थी सहाय्यक समितीचं प्रशस्त पटागण. मधोमध स्टेज. स्टेजवर सभेला आवश्यक त्या गोष्टी आणि शिवाय एक पलग. बाबासाठी ते बहात्तर वर्षांचे आहेत आणि अनेक चेंगट दुखण्यानी त्याच्या शरीरात ठाण माडलय. ते फार वेळ उभे राहू शकत नाहीत. स्टेजवरचा पलग बघून हे सगळं पटकन मनात येत. वाटत, बाबामध्ये चिरंतन उत्साहाचे एक नाही, अनेक जिवंत झरे असले पाहिजेत. नाही तर २४ डिसेंबर ८५ ते ९ एप्रिल ८६ पर्यंत ११० दिवसाची, १३ राज्य आणि ९६ गावं हिंडून 'भारत जोडो'चा सदेश सव्वाशे युवा-युवती यात्रिकाबरोबर देण्याची कल्पना त्याच्या मनात आलीच नसती.

'भारत जोडो' यात्रा सुरू झाली २४ डिसेंबरला. साने गुरुजीच्या जयती दिवसाच्या मुहूर्तानं कन्याकुमारीतून. शेवट होणार आहे काश्मिरला. भारताच्या या दोन टोकामधल्या पाच हजार किलोमीटर प्रवासात बाबाना मधल्या अधल्या सगळया प्राताना, माणसांना, भाषांना, धर्मांना एका 'भारतीयत्वाशी' असलेलं नात सांगायचय. यात्रेतून हे होईल का ? त्याना अभिप्रेत असलेल हे जोडकाम या चार महिन्याच्या प्रदीर्घ सायकलफेरीतून होईल का ? तरुण मुलामुलीचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल का ? की याला देखील एखाद्या कार्यक्रमाचं स्वरूप येईल ? मेळावा सुरू होण्यापूर्वी हे सगळं मनात होतं.

पावणेचारला युवक मेळावा आणि महिला मेळावा एकत्र होता. तीन वाजल्यापासून समितीत मेळाव्याची तयारी झाली होती. भारतजोडोचे बिल्ले लावलेले स्वयसेवक तयार होते हळूहळू माणस जमायला लागली. कॉलेजमधली मुल–मुली, मध्यमवयीन स्त्री–पुरुष, सामाजिक क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते. पटांगण भरून गेल. यात्रेत सामील झालेले सायकल–प्रवासीही होते. सुरुवातीला हिंदी, कन्नड आणि मल्याळम भाषेतली गाणी स्टेजवर जाऊन काही मुलामुलीनी म्हटली. गाण्यांचा ठेका चागला होता. नेमका अर्थ कळला नाही. पण युवाशक्ती, ध्येय, एकत्र या अशा अर्थाची गाणी असावीत. वाटलं, या भाषा थोडया थोडया जरी येत असत्या तर बरं झालं असतं.

मेळाव्याच सचालन करणारी स्वयसेविका पुढचा कार्यक्रम सागते यात्रेतले अनुभवकथन. बगलोरची सुजाता गायधनी सुजाताच लग्न झालय, तिला एक छोटा मुलगा आहे. ती म्हणाली, 'मला सारख वाटायचं की आपल्या जगण्याचा अर्थ काय, आपण काही तरी केलं पाहिजे. त्याच सुमाराला 'भारत जोडो' यात्रेसंबंधी माहिती कळली आणि मी लगेच जायच ठरवल. दीड महिना घराबाहेर रहावं लागणार होतं, पण घरच्यानी समजून घेतल. यात्रेत आल्यानंतर, वेगवेगळी माणसं, प्रात जवळून पाहिल्यावर मला या सगळयाशी माझ नातं आहे अस जाणवलं. आता मी कोणत्याही माणसाशी त्याची जात, पात, धर्म न विचारता बोलू शकते. यात्रेतला हा अनुभव मी कधी विसरू शकणार नाही.' नतर बाबासाहेब सूर्यवशी हा विद्यार्थी सहाय्यक समितीचा एक अपंग विद्यार्थी बोलला. भाषावाद, प्रांतवाद, गरीबी–श्रीमती या विषमतेविरुद्ध मला लढावसं वाटतं, मला भारतातले लोक बघावेसे वाटतात म्हणून मी यात्रेत सामील झालो असं तो म्हणाला.

चंद्रकात रागीट हाही विद्यार्थी सहाय्यक समितीचाच विद्यार्थी. 'भारत जोडो' अभियानाचं उद्दिष्ट सांगताना त्यानी एक गोष्ट सागितली. एक मानसतज्ज्ञ विचार करत बसला होता. त्याची छोटी मुलगी त्याला त्रास देत होती. त्याने जवळच्या एका कागदाचे तुकडे तुकडे केले. तो नकाशा होता. त्यानं तिला ते तुकडे जोडून द्यायला सागितले. नकाशाच्या पाठीमागे माणसाचं चित्र होतं. मुलीनं माणसाचं चित्र जोडलं आणि नकाशाही आपोआप जोडला गेला. चद्रकांत म्हणाला, युवकामध्ये इमानदारी, ताकद, धैर्य आहेच अभियानाला हे फक्त घुसळून काढायच आहे.

या मनोगतानंतर मेळाव्याला आलेल्यांनी काही प्रश्न विचारले. उदाहरणार्थ,"सर्व धर्म एकत्र येऊन वाटचाल करणं अवघड आहे, तर काहीच धर्म एकत्र आले तर ? किंवा अभियानानतरचा कार्यक्रम कोणता ? जे यात्रेत आले नाहीत त्यानी काय करायच ? यासारखे.

प्रश्नोत्तराचा कार्यक्रम थोड्या वेळात संपला. एक तर यात्रेत सहभागी झालेल्याना त्याना प्रवासात आलेले खरे अनुभव सांगण्याची सधी मिळाली नाही त्यामुळे तरुणांनी अस करायला पाहिजे, मनाचा मनाशी मुक्त संवाद हवा यासारखी भाषणबाजीच जास्त झाली. प्रश्नोत्तराचे कार्यक्रम नेहमी असेच होतात हेही तितकच खरं आहे

ही सगळी प्रश्नोत्तर बाबा स्टेजवरच्या कॉटवर पडून ऐकत होते. ते नतर बोलायला उठले. मेळाव्याला जमलेल्यापैकी कित्येकांनी बाबांना प्रथमच पाहिल होतं कुष्ठरोग्याना स्वावलबी करण्यासाठी, त्यांच्या चेहऱ्यावरचं हासू पहाण्यासाठी ज्या योग्यान सपूर्ण आयुष्य खर्ची घातल, ते बोलायला उठल्यावर लोकानी उत्स्फूर्तपणे टाळयाचा कडकडाट केला. कुष्ठ रोगी–पुनर्वसनाच असाध्य काम 'दैवी' नाही तर एका 'माणसानं' केल आहे, हे मी पाहिलं. बाबा बोलायला लागले. खूप मोठा आशय सांगायचा आहे आणि शब्द, वेळ कमी आहे, अशा वेळी जसं सूत्रबद्ध बोलल जानं, तसच बाबांचं सपूर्ण भाषण होत. बाबा म्हणाले, 'प्रश्न आणि उत्तरं यातून प्रश्न सुटत नाहीत. प्रश्न–उत्तराच्या मर्यादा मला माहीत आहेत. पण तुम्ही तरुण आहात. तरुण तो, जो समस्यांचे लचके तोडतो. प्रश्न सोडवण्यासाठी, राष्ट्रनिर्मिती करण्यासाठी तीन H हवेत. Hand, Head आणि Heart. हृदय, डोकं आणि हात यानी राष्ट्र घडतात पण अशा कामात उडी घेतली पाहिजे. सधीवर झडप घ्यायला पाहिजे. दाराच्या फटीतून प्रकाशाचा एक किरण आत घुसतो, आणि तुमच मन–हृदय प्रकाशित करतो–तो प्रेरित माणूस मग इतर समाजातला अधःकार दूर करतो. तुम्ही असे व्हा. बेचैनी हे प्रगतीचं लक्षण आहे. आपल्या देशातलं अतोनात दारिद्र्य, दुःख, भूक हे आपण कसं सहन करतो ?

असे प्रश्न आपल्याला पडतात का ? ध्येय-धुंद जगण्यासाठी आधी ध्येय काय आहे ते समजून घ्या. आपल्याला क्रांती हवी आहे. पण ती दवबिंदू, स्वेदबिंदू आणि करुणेचा अश्रू याच्या संगमावरची ज्या क्रांतीमध्ये करुणा नसते ती वाघिणीसारखी खादाड असते आपल्याला हवी आहे करुणा. करुणा म्हणजे दयाबुद्धी नाही. दु:खाने हृदय फाडत जाते ती करुणा. समाजात जगताना ही अनुभूती महत्त्वाची आहे. आपल्या संकल्पांचा सतत विचार करणं म्हणजे जप–तो आपण करायला पाहिजे.'

बाबा म्हणाले, 'मी आजवर हे कधी बोललो नाही, पण मला आज सगळ्या तरुणांशी बोलायचं आहे. कारण राष्ट्र नेहमी शाळा–कॉलेजमधल्या मुलांच्या श्वासावर विसावा घेत असतं. आज आपल्यात जी मानसिक बधिरता आली आहे ती नष्ट व्हायला पाहिजे. भारत जोडो हा प्रवासाचा पहिला टप्पा आहे. या प्रवासातून नवी शृंखला तयार होईल. भारत जोडोला फार प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. या यात्रेत डॉक्टर, इंजिनिअर, व्यावसायिक, विद्यार्थी मुलं–मुली सगळे आहेत. हे म्हणतात, आमच्या करिअरचं, स्थैर्याचं आम्ही बघून घेऊ–पुढे काय आहे ते सांगा. अभियानातून युवापिढी सदसद्‌विवेकपद्धतीची स्पंदन ऐकेल. हे भावनेला आव्हान नाही, तर वास्तवाच्या परिघावरूनची ही वाटचाल आहे.'

येवढं बोलून बाबा थांबले. जनगणमन होऊन कार्यक्रम संपला. कार्यक्रम संपल्यानंतरही जमलेली माणसं यात्रेतल्या मुलामुलींशी बोलत होती. आलेले अनुभव विचारीत होती. या यात्रेत आपणही गेलो असतो तर, असं प्रत्येकाला वाटलं असेल. नंतर 'भारत जोडो' अभियानाची जाहीर सभा शनिवारवाड्यावर होती. बाबांना पाऊण लाखाचा निधी महापालिकेतर्फे देण्यात येणार होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी यात्रा मुंबईच्या दिशेनं निघणार होती. अशाच आणखी चाळीस पन्नास गावातल्या मेळाव्यांना संदेश देत बाबा आणि त्यांचे मित्र फिरणार होते.

आणखी दोन महिन्यांनी हे अभियान संपेल. युवायात्रिक आपआपल्या गावात परत जातील. 'भारत जोडो'तून काय मिळालं हा प्रश्न नंतर विचारला जाईलच बाबा म्हणतात तसं फक्त उदार मानवतावादातून, 'मानव' धर्मातून भारत जोडला जाईल का, हा वादाचा मुद्दा आहे. कारण 'भारत तोडो' म्हणणाऱ्या शक्ती या राजकीय आहेत हे तर आपण बघतोच आहोत. बाबा म्हणतात–डोळ्याला पट्टी लावून चालायला सुरुवात केली तर खड्यातच पडणार. तसंच याही बाबतीत म्हणावं लागेल. तेव्हा भारत जोडण्याचा प्रश्न आधी राजकीय भूमिकेतूनच सोडवावा लागेल.

हे जरी असलं तरी 'भारत जोडो'मुळे या प्रचंड समाजाला घुसळण्याची प्रक्रिया थोडी फार तरी नक्कीच झाली आहे. होणार आहे. बाबांना बघणारा, ऐकणारा माणूस भारावून जातो. त्यांच्याबरोबर काम करण्यासाठी झपाटून जातो. या निमित्ताने बाबा १३ प्रांतातल्या ९६ गावात फिरणार आहेत. ९६ गावातली पाच–पाच मुलं जरी बाबांच्या या कार्यक्रमाला मिळाली तरी ते खूप होईल. अभियानाला गावागावातली, कार्यकर्त्यांची एक साखळी या निमित्ताने तयार करायची आहे. हे शक्य झालं तर अभियानाचं हे मोठं यश असेल.

— मेधा राजहंस

नवी 'कामराज' योजना

# वरवर पहाता योग्य, पण आतून उणिवांनी पोखरलेली

**प**क्ष मोठा की सत्ता मोठी, पक्ष संघटना महत्त्वाची की सरकार, मंत्रीमंडळ महत्त्वाचे हा तसा जुनाच चर्चा–विषय आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात सत्तेचा प्रश्न गौण होता. आणि प्राधान्याने तो 'नेटिवां'चा प्रश्नच नव्हता. त्यामुळे पक्ष संघटनेला अनन्यसाधारण महत्त्व होते. संघटनेसाठी मग पक्षाचे अध्यक्षही आपल्या पदाचा मोह धरीत नव्हते. मतभेद आले तर ते बाहेर पडत असत. येथे संघटना प्रथम होती. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्या पक्षाची रीत आपल्याला पटेल, भूमिका आपल्याला रुचेल, त्या पक्षात जावे. एकदा तो पक्ष स्वीकारला की सर्व वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून संघटना आदेशानाच महत्त्व उरायचे. पक्ष आपल्याला कोणते पद देतो याहीपेक्षा पक्ष आपल्याकडून काय अपेक्षा करतो त्याला प्राधान्य असायचे.

स्वातंत्र्योत्तर काळात हे चित्र बदलले. स्वातंत्र्यासाठी इतर पक्षांनीही प्रयत्न केले. हे आधुनिक राज्यकर्त्यांनी पुसून टाकण्याचा एकीकडे प्रयत्न केला. तर दुसरीकडे म. गांधींचा 'कॉंग्रेस नष्ट करा' हा आदेश त्यांच्या कानापर्यंत पोहोचलाच नाही. आणि येथूनच पक्ष संघटनेपेक्षा सत्तेला महत्त्व येऊ लागले. म्हणजेच स्वातंत्र्य मिळताच पक्ष संघटना धोक्यात आली. विशेषत्वाने कॉंग्रेसच्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवले.

आपला पक्ष हा 'मासेस'साठी, सर्वसामान्य जनतेसाठी आहे. त्यामुळे आम्ही कवायतींना महत्त्व देत नसतो अशी विचित्र विधाने कॉंग्रेसच्या नेत्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात अगदी प्रारंभापासून केली. अगदी परवा परवा झालेल्या कॉंग्रेस शताब्दी महोत्सवाच्या वेळी जो गोंधळ झाला त्याचे समर्थन, खुद्द पक्षाध्यक्ष राजीव गांधी यांनी मासेस पार्टीच्या नावेच केले. पण या 'मासेसच्या पार्टी'लाही मधूनमधून पक्षांतर्गत साफसफाईची गरज भासत आली आहे. पूर्वी ही साफसफाई नको त्या प्याद्यांना वगळण्यासाठीच केली जाई. १९ जानेवारीला राजीवजींनी पक्षाला महत्त्व देण्याचे धोरण जाहीर केले व काही मंत्र्यांना व इतर अधिकारी व्यक्तींना सत्तेतून मुक्त करून पक्ष कार्यासाठी जुंपले. हा प्रकार व पूर्वीचे साफसफाईचे प्रकार हे सारखेच आहेत का, हा एक प्रश्न याबाबत आपोआपच उभा राहतो.

स्वातंत्र्योत्तर काळात जे पंतप्रधान देशाला लाभले, त्यांनी अपवाद वगळता आपल्याला कोणी स्पर्धक निर्माण होऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली. स्वातंत्र्योत्तर काळात सरदार वल्लभभाई पटेल पंतप्रधान व्हावेत अशी अनेकांची इच्छा होती; पण प्रत्यक्षात ती जागा पं. जवाहरलाल नेहरूंनी मिळविली. ती कशी हा वेगळा विषय होईल.

अनेक वर्षे सत्ता उपभोगल्यानंतरही पं. नेहरू हे आपल्या वरचढ कोणी होऊ पाहतो, हे सहन करू शकत नव्हते. १९६२–६३ च्या सुमारास अशीच स्थिती होती. काही प्यादी वजीर होऊ पाहत आहेत अशी शंका पं.

नेहरूंना आली. आणि ते याच विवंचनेत होते. तशातच कामराज यानी एक योजना पं. नेहरूसमोर माडली. पक्ष सघटनेला महत्त्व देऊन संघटना कौशल्य असणाऱ्या व्यक्तींना संघटना कार्यासाठी वळवावे. त्यांना सत्तास्थानातून मुक्त करावे असा प्रस्ताव या योजनेत होता प. नेहरूनी ही योजना उचलून धरली. कामराजांनाच त्या योजनेचे प्रमुख केले. योजनेचे बाह्य स्वरूप पाहून अनेकानी राजिनामे दिले. पक्ष कार्यासाठी कार्य करण्याची त्यानी तळमळ व्यक्त केली, यांपैकी काहींचेच राजिनामे स्वीकारण्यात आले आणि त्याची स्थिती त्या वेळच्या पक्ष श्रेष्ठींनी दयनीय करून टाकली. ही मंडळी सत्ताही गमावून बसली नि पक्षातलेही कोणतेही महत्त्वाचे स्थान त्याना मिळाले नाही यामुळे पक्ष सघटना बळकट करायची, हा या योजनेचा केवळ फार्स होता. प्रत्यक्षात मोरारजी देसाईंसारखे लोक मात्र हात चोळीत बसले !

लाल बहादूर शास्त्रीना एकूणच कमी आयुष्य मिळाल्याने ते पक्ष कार्यासाठी फारसा वेळच देऊ शकले नव्हते. मात्र राजिनामा देऊन चुकीची जबाबदारी उचलण्याची धमक त्याच्यात होती हे त्यानी रेल्वे मंत्रालयात असतानाच स्पष्ट केले होते.

त्यानतर इदिराजी सत्तेवर आल्या. १९६९ मध्ये अभग कॉंग्रेसची पहिली फाळणी झाली. हळूहळू इंदिराजीनी सघटना या शब्दालाच हरताळ फासला. अध्यक्षाची प्रथम केविलवाणी अवस्था केली आणि शेवटी ते पदही त्यांनी आपल्याकडेच ठेवले. पक्ष श्रेष्ठी या शब्दाचा अर्थच त्यांनी एकमेव इंदिराजी असा करून टाकला. त्याना पटले तर ठीक, नाही तर उचलबांगडी ही स्थिती त्यानी आणली.

अभंग कॉंग्रेसचे शेवटचे अध्यक्ष निजलिंगप्पा यांचे हाल नुकतेच कॉंग्रेस शताब्दीच्यावेळी लक्षात आले. इकडे मुबईत जोरदार महोत्सव होत असतानाच, हे महान अध्यक्ष आपल्याच प्रातातल्या स्वातत्र्यविराच्या समवेत हा शताब्दी सोहळा साजरा करीत होते. ही सारी स्व. इंदिराजीचीच पुण्याई ! कॉंग्रेस इदिराजीच्या हाती गेल्यानतर गेली १४ वर्षे कॉंग्रेसच्या पक्षातर्गत निवडणुकाच झालेल्या नाहीत. पक्षात त्यानी नाममात्र लोकशाहीही ठेवली नव्हती, त्याचेच हे उदाहरण ! १९७७ नंतर फक्त इं. कॉं. च उरली. मग काय विचारता ?

गेल्या वर्षीपासून इंदिरा कॉंग्रेसमधली बजबजपुरी थाबेल अशी आशा वाटू लागली. ज्या स्वच्छतेला कॉंग्रेसजनानी कपड्यापुरतेच महत्त्व दिले होते त्या स्वच्छतेचा उच्चार आता तरुण अध्यक्ष व पतप्रधान राजीव गाधी करू लागले त्यामुळे देशात व पक्षात उत्साहाचे वारे वाहू लागले. कॉंग्रेस शताब्दीच्या निमित्ताने खुल्या अधिवेशनात इं. कॉंग्रेस पक्ष, कार्यकर्ते, नेते याच्यावर कडाडून हल्ला केला. हे सर्व बदलायला हवे असा निग्रह व्यक्त केला. यामुळे स्वच्छतेबाबतच्या आशा आणखी वाढल्या

शताब्दी सोहळा पार पडून जेमतेम महिनाही उलटला नव्हता की, राजीव गाधी यानी सरकारपेक्षा पक्ष महत्त्वाचा अशी घोषणा करीत काही नेत्याना सत्तेतून मुक्त केले. 'ही कामराज योजना नव्हे' असेही त्यानी जाहीर केले व मुक्त केलेल्या मत्र्याना पक्ष कार्यास जुपले

यात व्यापारमत्री अर्जुनसिंग, पेट्रोलियम मंत्री नवल किशोर शर्मा, मजूरमत्री टी. अजय्या या मत्र्याची वर्णी लागली. त्याचप्रमाणे राज्यसभेच्या उपाध्यक्षा नजमा हेपतुल्ला यानाही मुक्त करण्यात आले. पण हे एकूणच पुनर्गठन पाहता यामुळे पक्ष सघटना किती बळकट होईल याबाबत शंकाच वाटते. ती कशी ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

पतप्रधान व पक्षाध्यक्ष ही दोन्ही पदे एकाच व्यक्तीकडे असावीत का, या वादाला तूर्त बाजूला ठेवीत पतप्रधानानी इदिरा कॉंग्रेसमध्ये उपाध्यक्षपदाची निर्मिती केली. गेल्यावर्षी सतत महत्त्व वाढत गेलेल्या व एकाही पदावर स्थीरता न लाभलेल्या अर्जुनसिंग याना हे पद देण्यात आले. १० महिन्यात त्याना तीन पदे लाभली. प्रथम मध्यप्रदेशचे मुख्यमत्री, त्यानतर पजाबचे राज्यपाल नि नंतर व्यापारमत्री. प्रत्येक वेळी फक्त त्याचेच प्यादे का हलवले गेले हे लगेच स्पष्ट होणार नसले, तरी त्याचे राजीव गाधीजवळचे वर्चस्व वाढत गेले हे मात्र खरे. व्यापारमत्री केल्यानतर त्याना दिल्लीतूनच नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत निवडूनही आणले गेले. पण एवढे होते न होते, व्यापारमत्रालयाची बाराखडी त्याची पाठ होते न होते तोच त्याना पुन्हा एकदा राजिनामा देऊन नव्या वर्षाचे नवे पद स्वीकारावे लागले. सत्तेपासून त्याना दूर करण्यात आले व इं. कॉं. चे उपाध्यक्षपद त्याच्या सुपूर्द करण्यात आले. त्यांना त्याच्या कामी पूर्ण स्वायत्तता राहील असे आश्वासनही तरुण पक्षाध्यक्षानी दिले.

कामराज योजना व राजीवजीची ही अर्जुनसिंग योजना येथेच भिन्न झाली. कामराज योजनेत सत्तेपासून बाजूला खेचण्यात आलेल्यांना पक्षसघटनेतही महत्त्वाचे स्थान मिळाले नव्हते. आणि या नव्या योजनेत अध्यक्षपदाला समातर असे उपाध्यक्षपदच सिंग याना मिळाले.

अर्जुनसिंग याच्याखेरीज ज्याना मंत्रीपद व सत्तास्थान यापासून दूर खेचण्यात आले. त्यात मजूरमंत्री टी अजय्या, पेट्रोलियममत्री नवल किशोर शर्मा आणि राज्यसभेच्या उपसभापती नजमा हेपतुल्ला याची वर्णी लागली.

अखिल भारतीय इदिरा कॉंग्रेसची कार्यकारिणी नव्याने तयार झाली त्यात कमलापती त्रिपाठी याचे कार्यकारी अध्यक्षपद तसेच ठेवण्यात आले. वरील मंडळीव्यतिरिक्त पी. व्ही. नरसिंहराव, गनीखान चौधरी, श्रीमती चद्रशेखर, के. करुणाकरन्, ए. के. अँटोनी, भागवत झा आझाद, जी के मुपनार, रामधन, सीताराम केसरी, जानकी वल्लभ पटनाईक, बीर बहादूर सिंग, रामानद यादव, हितेश्वर सैकिया, आर. एल. भाटिया या नावांचा या कार्यकारिणीत समावेश झाला.


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

पूर्वीच्या अनेक पदाधिकाऱ्याना पदमुक्त करण्यात आले. प्रणव मुखर्जींच्या नावाचा तर विचारही झाला नाही. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री गुंडूराव व आणखी एक केंद्रीय मंत्री शकरानद याना अर्धचद्र मिळाला.

पक्षाध्यक्ष केवळ हे बदल करूनच थांबले नाहीत तर त्यानी नव्या पदाधिकाऱ्याना अधिकाधिक सत्ता देण्याचे जाहीर केले. त्याच्यावर सोपविलेल्या कामात त्यांना पूर्ण स्वायत्तता देण्याची खात्रीही त्यानी दिली.

## कार्य अवघड आहे

राजीवजीच्या योजनेत वरवर पाहता कोणतेही फाटे फुटलेले दिसत नाहीत त्यामुळे हे कार्य चागले वाटते. पण थोडा नीट विचार करायला लागताच या योजनेतल्या उणिवा स्पष्ट होतात. या उणीवा राजीव गाधीच्या नजरेतून सुटलेल्या तरी असाव्यात नाही तर त्या त्यांनी मुद्दामच दुर्लक्षिलेल्या तरी असाव्यात.

याचं महत्त्वाचं उदाहरणच घ्यायचं तर या बदलात जे नवे सरचिटणीस निर्माण करण्यात आले आहेत त्याच्यावर नजर टाकता येईल. हेपतुल्ला मॅडम, आझाद व रामधन हे नवे सरचिटणीस आहेत; पण मौज म्हणजे या तिघापैकी एकानेही प्रादेशिक पातळीवरही अध्यक्षपद साभाळलेले नाही. त्यामुळे त्याच्या सघटना कौशल्याबाबत शका घ्यायला बराच वाव आहे.

याचीच दुसरी बाजू अशी की ज्या मंत्र्याना सत्तेतून घालवले त्यानी फारसे नेत्रदीपक कार्य केलेलेच नव्हते. म्हणूनच त्याची वर्णी पक्षकार्यात करण्यात आली. पण मग असे अकार्यक्षम व अननुभवी लोक सघटना मजबूत कशी करणार? यातलीच आणखी एक गंमत म्हणजे या मुख्य मत्र्याच्या जागी ज्याना घेतले गेले त्यामुळे राजीव द क्लीनची प्रतिमाच धोक्यात येते. शिव शकर यांना स्वच्छ मत्री म्हणावे अशी राजीवजीची अपेक्षा आहे का? चंद्रशेखर सिंग जे निवडणुकीतही पडले, वस्त्रोद्योग मंत्रालय ज्याना नीट साभाळता आले नाही त्याना कार्यक्षम मंत्री म्हणायचं का?

यामुळेच एका वेगळयाच दुष्टचक्रात इंदिरा कॉंग्रेस सापडली आहे. स्वच्छपणा व कार्यक्षमता यांचे एकाच व्यक्तीच्या ठायी दर्शन दुर्लभ झाल्याने त्या दोन गुणाच्या कात्रीत इ. कॉं. सापडली आहे. वास्तविक दोन्ही शब्द एकमेकाला पर्यायी नसून पूरक आहेत पण वर म्हटल्याप्रमाणे दुर्लभ दर्शनामुळे वाटीतले ताटात, ताटातले वाटीत करण्यापेक्षा दुसरे काही या अध्यक्षांच्या हाती उरलेले नाही.

पक्ष संघटना बळकट करण्यासाठी, अधिकाधिक चागले लोक याकडे आकर्षित करण्यासाठी हा पक्ष नवनव्या योजना आखीत आहे. प्रती कामराज योजनेप्रमाणेच राजीवजी व त्याच्या सहकाऱ्यांनी कॉंग्रेसजनाकरता एक आचार सहिता तयार करण्याचे ठरविले. ही एक चांगलीच गोष्ट आहे. यामुळे ताटातले वाटीत गेले तरी या सहितेमुळे त्यांच्यावर अंकूश राहू शकतो. पक्षाध्यक्ष व प्रदेशाध्यक्ष याच्या परवानगीशिवाय कोणत्याही इं. कॉंग्रेस नेत्यास आता यामुळे स्वतंत्र निधी उभारता येणार नाही. हाही या सहितेचाच एक भाग आहे. यामुळे अनेक गोष्टीना आधार मिळतो.

याचबरोबर राजीव गांधी यानी अनेक वेळा पक्षातर्गत निवडणूक घेणार हे जाहीर केले आहे. ही निवडणूक आता एप्रिलच्या शेवटी वा मेच्या प्रारंभी होणार आहे. या पार्श्वभूमीवर विचार करता मात्र एक वेगळाच अर्थ अनेक गोष्टीना प्राप्त होतो राजीव गांधीनी अर्जुनसिंग याच्याकडे सध्या ३० लाख सदस्यत्व असलेल्या इ. कॉं.त नव्या सदस्याना प्रवेश देण्याचे अधिकार सोपविले आहेत तसेच जुन्याना काढण्याचेही अधिकार दिलेले आहेत. यामुळे राजीव गाधी या निवडणुकीची तयारी तर करीत नाहीत ना, ही शका येते. पक्षाध्यक्षपदी पुन्हा आपणच यावे ही कल्पना त्याच्या मनात नाही ना? आपल्याला एकनिष्ठ लोकच ठेवावेत हा त्याचा उद्देश नाही ना अशी एक शंका येते अर्थात पक्ष सघटना कार्याचा राजीवजीना तरी कितीसा मोठा अनुभव असाही एक प्रश्न चर्चिला जात आहेच!

पक्ष सघटना बळकट करणे, स्वच्छ करणे, आपल्यावर टीका करण्यास मुभा देणे, दूरदर्शनवरील महत्त्व कमी करणे, या अशाच काही योजनात गुतल्याने राजीव गांधी यांची पक्षावरची व एकूण लोकावरची पकड हळूहळू ढिली होऊ लागली आहे, अशी खात्री वाटू लागते. गेल्या काही निवडणुकीत त्याच्या पक्षाने पाहिलेला पराभव हे त्याचेच लक्षण म्हणता येईल. एकच निर्णय घेऊन ते ठामपणे राबवू शकत नाहीत. इतराना त्यांनी इतके महत्त्व दिले आहे की त्याच्या सल्ल्याने कार्य करण्याऐवजी ते त्याच्या चमच्यानेच 'सल्ला' घेतात की काय अशी शका वाटू लागली आहे. परवाचीच भाववाढ करण्यापूर्वी आपल्याला दोन दिवसानतर ती कमी करण्याची नामुष्की पत्करावी लागेल हा साधा विचार त्यांच्या मनात आला नाही का? आणि जर लोकप्रियता डोळयापुढे ठेऊन प्रथम १० पावले भाव वाढवून चार पावले मागे घ्यायचे हे धोरण असेल तर हा खेळ आता जुना झाला आहे, हे त्याना कोणी सागितले नाही का? यामुळेच राजीवजीची धोरणे शेवटी ठिसूळ पायावर तर उभी राहणारी नाहीत ना अशी एक शंका मनात येते.

राजीव गाधीकडून वास्तविक खूप चागल्या योजनाची अपेक्षा आहे. त्यानी चागल्या योजना राबवून लोकशाहीला पुढेही आणले आहे. पण अशा रीतीने त्यांची एकूण राजकारणावरील, लोकांवरील व पक्षावरील पकड ढिली होणार असेल तर त्यानी वेळीच सावध व्हायला हवे, नाही तर त्याच्यासारख्या खूप काळाने लाभलेल्या आशादायी नेतृत्वाला याच पक्षातले जुने, चेंगट व वेगळ्या रीतीने अनुभवी नेते कोठे नेऊन सोडतील त्याचा नेम नाही!

—अनिल शिंदे

# गावाच्या सर्वांगीण विकासाशी समरस झालेली प्रेरक संस्था

विनय गुणे

संगमनेर सोडलं आणि नासिककडं जायला लागलं की नजरेत भरायचं कऱ्हाच्या घाटापर्यंत पसरलेलं उजाड माळरान. तरवड–बाभळीची खुरटी झाड, निवडुगाचे फड, चुबुकाटे आणि सराटे, रणरणत्या उन्हान वाळून पिवळं पडलेल गवत, दगडा–खडकाचा भकास परिसर.

१९६५ पूर्वीचं हे चित्र.

२३ जानेवारी १९६१, नेताजी सुभाषबाबूंची जयती.

एक शुभ दिवस. संगमनेर शहरातील विविध क्षेत्रातील सुविद्य नागरिकानी एकत्र येऊन एक सस्था स्थापन केली. 'शिक्षण प्रसारक सस्था.'

उद्देश–, या ग्रामीण परिसरातील महाविद्यालयीन शिक्षणाची गैरसोय दूर व्हायला हवी. इथल्या कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्याच्या, गरीब विडीकामगाराच्या मुलाना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हायला हवी.

आधीच दुष्काळी प्रदेश. त्यामुळे आर्थिक प्रतिकुलता. बहुसंख्याची जागा दारिद्र्यरेषेखालची. त्यामुळे शिक्षणाची सधी नाही.

ही कोडी फोडायला हवी–

आणि सस्थेनं एक महाविद्यालय सुरू केल.

शहरातल्या नगरपालिकेच्या जागेत एका खोलीत सुरू झालेलं हे महाविद्यालय १९६५ साली स्वत:च्या जागेत आलं.

दानशूरांच्या औदार्यानं हे उजाड विस्तीर्ण माळरान मिळालं.

त्यानंतरच्या वीस वर्षात चालू आहे अविरत वाटचाल.

त्या भकास निवडुगाच्या माळरानावर आज 'गुलाबाच्या' बागा फुलल्यात.

भव्य दगडी, सिमेंटकॉंक्रीटच्या इमारतींना झाकून टाकणारी गर्द वृक्षराजी, आखीव–रेखीव बागा, विविध विद्याशाखाचे स्वतत्र विभाग, विद्यार्थ्यांचे वसतिगृह, प्राध्यापक निवास, भव्य सभागृह, खुले नाट्यगृह, प्रशस्त व्यायामशाळा, सुसज्ज उपहारगृह, विद्यार्थी–विद्यार्थिनींसाठी खुल्या विश्रामिका, समृद्ध ग्रथालय, विस्तृत मैदान, पदव्युत्तर अध्यापन केंद्र,

नमुनेदार रनिंग ट्रॅक–

नजर सुखावणारा, पुन्हा पुन्हा रेंगाळायला लावणारा महाविद्यालयाचा रम्य परिसर. ३६ एकरांच्या माळरानाचा हा गेल्या २५ वर्षात झालेला कायाकल्प

स्वातत्र्यपूर्व काळात दिलासा होता–

स्वातत्र्य येईल, गरिबी जाईल. आर्थिक सुबत्तेबरोबर सास्कृतिक समानता सगळीकडे पसरेल. श्रमाला प्रतिष्ठा येईल. विकास योजना राबवल्या जातील आणि या सगळ्याच्या केंद्रस्थानी असेल इथला खेड्यापाड्यातला समाज– त्यातला प्रत्येक माणूस.

पण झाले उलटेच.

शहरी आणि खेड्यातला वर्ग आर्थिक आणि सास्कृतिक दृष्ट्या दोन विभागात दुभंगत गेला. दऱ्या वाढल्या, अहंमन्यता वाढली. त्याला कुणी हवा तसा वैचारिक मुलामा दिला. या परिस्थितीनं काही प्रामाणिक माणसाना अस्वस्थ केल. या प्रामाणिक अस्वस्थतेनं सूज्ञांना विचारी बनवलं. कुठं चुकतंय याचा शोध सुरू झाला. आपण संस्कार करण्यात कुठं तरी कमी पडतोय ही खंत होतीच. ही दरी वाढायला आपलं शिक्षण कारणीभूत आहे. मग महाविद्यालयीन शिक्षणाची उद्दिष्टं कोणती? त्याचं साफल्य कशात आहे? शिक्षणान विद्यार्थी स्वावलबी होतो का? अस्तित्वातील शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांच्या स्वप्रयत्नाला वाव आहे का? जे महाविद्यालयात शिकवले जाते, त्याचा प्रत्यक्ष जीवनाशी सबध आहे का? किती?

आपली शिक्षणपद्धती समाजाभिमुख आहे का? या समाजाचे आपण काही देणं लागतो, असा पुसटसा तरी सस्कार या शिक्षणपद्धतीनं विद्यार्थ्यांवर केला आहे का?

– या शोधान अनेक प्रश्न निर्माण केले. उत्तरं शोधताना कबुलीही मिळाली. आजची शिक्षणपद्धती ही परीक्षापद्धती आहे. पदवीची ज्ञानापासून फारकत झाली आहे. शिकणे आणि शिकवणे याचा विचार होण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा विचार महत्त्वाचा ठरला. महाविद्यालये ह्या पदव्या प्रदान करण्याचा कारखाना बनला आहे. शिक्षण हे खऱ्याखुऱ्या समाजप्रवाहापासून दूर गेल. उरला फक्त तात्त्विक काथ्याकूट

आवश्यकता काय आहे आणि काय दिले जाते याचा विचार सुरू झाला.

'अस्तित्वातील शिक्षणपद्धतीमुळे शिक्षणाची उद्दिष्टे विफल झाली आहेत तेव्हा ही पद्धती बदलायला हवी.'

'सामाजिक गरज' हा शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा महत्त्वाचा पैलू हवा'

'पुस्तकी धडे देण्यापेक्षा प्रत्यक्ष प्रयोग जास्त परिणामकारक असतो.'

## विकासाची दृष्टी

'शिक्षणान बदलत्या समाजाच्या नैसर्गिक, सास्कृतिक आणि सामाजिक बदलाविषयी जाण निर्माण झाली पाहिजे.'

'पुस्तकी शिक्षणावर भर देण्यापेक्षा जीवनलक्षी, व्यवसायाभिमुख गरजाना अनु-

सरून शिक्षण दिले जावे.'

'शिक्षण क्षेत्र हे भोवतालच्या बाकीच्या जीवनापासून तुटक–अलग नाही.'

'The school must be closely associated with the developmental Activities of the area.'

'समृद्ध ग्रंथालयात, उच्च संशोधन केंद्रात आणि विद्यापीठांच्या महाकेंद्रात विद्या गोठून जाता उपयोगाची नाही, तिचे पाझर लाब खेड्यापाड्यात आणि डोंगरदऱ्यात पसरले पाहिजेत.'

'धावत्या जगाबरोबर निदान चालण्यासाठी तरी, बदलत्या काळाचा विचार करून त्यासाठी माहिती आणि कौशल्य पुरवणारं शिक्षण हवं.–'

–अश्या मत-मतातरातून नवीन प्रयोगांचा विचार सुरू झाला. १९७८–७९ मध्ये भारत सरकारनंही आपलं 'ग्रामीण विकासाभिमुख' धोरण जाहीर केल. विद्यापीठ अनुदान मडळातही उच्च शिक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वं घालून दिली.

विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली कार्यपद्धती, व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम, कार्यानुभव देणारी अध्यापनपद्धती, शैक्षणिक कार्याशी संबद्ध समाजसेवा, समाजाभिमुख शिक्षण यावर आधारित शिक्षणाची सामाजिक विकासाची गरज, काम, प्रत्यक्ष अनुभव, उत्पादकता यावरोबर जोड देणारी पद्धत प्रयोगादाखल स्वीकारली

सर्वांगीण उन्नतीसाठी संधीची आणि सवलतीची उपलब्धता हवी. त्यासाठी Restructing courses ची योजना तयार झाली.

पुणे विद्यापीठातर्गत येणाऱ्या सात जिल्ह्यातल्या १६९ महाविद्यालयांपैकी–

७ महाविद्यालयाची निवड त्यासाठी करण्यात आली.

त्यापैकी 'सगमनेर महाविद्यालय' एक...

१४४८ विद्यार्थ्यांच्या सहभागानं आणि सर्व विद्याशाखात योजना राबविणारं एकमेव महाविद्यालय

प्रस्थापित समाजव्यवस्थेशी आर्थिक हितसंबंध नसलेला विद्यार्थीच फक्त राष्ट्रीय पुनःनिर्माणाचा अग्रदूत होऊ शकतो. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक, प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणक्षेत्रात काम करणारे अन्य घटक अशा सगळ्या 'शिक्षण परिवारा'च्या सहकार्यानं प्रयोग सुरू झाला.

विद्यापीठाची योजना ८२–८३ मध्ये सुरू झाली असली तरी स्थापनेपासून 'ग्रामीण जीवनाशी जवळीक बाळगून असलेल्या संगमनेर महाविद्यालयात असे विविध प्रयोग सुरुवातीपासूनच राबविले जात होते.

शैक्षणिक दृष्ट्या स्वयंपूर्णतेसाठी त्यापूर्वीच पूर्ण केलेल्या विविध प्रकल्प उपक्रमाने ही दृष्टी ठेवली होती. तशा प्रयत्नाचं भान सगळ्याच प्रकल्पान राखलं होतं विद्यापीठाने आखून दिलेल्या चौकटीत Formal आणि Non Formal शिक्षणाचे संतुलन राखण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू होता.

याच जाणीवेतून २।१२।७९ ला या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तालुक्यातील एकेका गावाला गेले नुसता Formal सर्व्हे न करता गावाच्या अडचणी समजावून घेतल्या. अपेक्षा विचारल्या. गावकऱ्यांची आस्था, तयारी बधितली. गावाची आर्थिक, सामाजिक परिस्थिती, त्या खेड्यातील लोकाना भेडसावणारे प्रमुख प्रश्न, सरकारी माध्यमातून ते सोडविण्याचा गावकऱ्यानी केलेला प्रयत्न आणि गावकऱ्याचा त्यातील सहभाग, विकासाची इच्छा आणि तयारी अशा तालुक्यांचे 'दर्शन' घडविणाऱ्या या ८० गावांच्या सर्वस्पर्शी पहाणीन कामाला एक दिशा दिली –

त्यातून साकारल्या विविध योजना, उभे राहिले रचनात्मक प्रकल्प. सुरू झालं प्रयोगांसाठी सशोधन.

कॉलेज विस्तार योजना–ग्रामीण विकास केंद्र उभं राहिल. ग्रामीण परिसरात शैक्षणिक ॲक्टिव्हिटीजचा एक भाग म्हणून सुरू झालेलं हे केंद्र, या उपक्रमानं सामाजिक सेवेला वेगळी दिशा दिली. रुळलेल्या पुस्तकी शिक्षण आणि सशोधन या चाकोरीतल्या दैनंदिन कार्यक्रमाशिवाय रुळलेल्या वाटेबाहेर जाऊन उपक्रम राबवले.–

विकास म्हणजे बदल आणि असा बदल निर्माण होण्यासाठी तशी 'दृष्टी' निर्माण व्हायला हवी. प्रवृत्ती हवी, अभ्यास हवा. या बदलासाठी ग्रामीण नागरिकांच्यात आत्मविश्वास निर्माण होणे गरजेचे आहे. 'खाटल्यावर देणाऱ्या हरी'ची वाट बघण्याची प्रवृत्ती बदलायला हवी. त्यासाठी 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या माध्यमातून प्रत्येक वर्षी २०० विद्यार्थी स्थानिक लोकाबरोबर ग्रामीण प्रकल्पावर काम करतात.

## सहकाराचा संस्कार

तालुक्यातील पर्जन्यहीन परिस्थिती, नैसर्गिक असमतोल लक्षात घेऊन ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे किंवा प्रत्येक ठिकाणी जेवढे पाणी उपलब्ध आहे ते वापरण्याचे शास्त्र शेतकऱ्याना पटविणे गरजेचे आहे.

उपलब्ध पाण्याचा नाश कमी करून त्यापासून जास्तीत जास्त पिके काढण्याची पद्धती शेतकऱ्यापर्यंत न्यायला हवी. जमिनीतही पाण्याची पातळी खाली खाली जात आहे. त्यासाठी 'पाण्याचे व्यवस्थापन' शेतकऱ्यापर्यंत पोहचवायला हवे. या विचारातून पाण्याच्या नियोजनाचा 'पायलट प्रकल्प' आकाराला आला.

पाणी निष्काळजीपणे वाया जाण्यापासून वाचविता कसे येईल, आवश्यकता आणि उपलब्धता याचे सतुलन कसे राखता येईल अशी परिसरातील ५ एकरासाठी 'ड्रिप ॲरिगेशन, आणि 'स्प्रिंकलिंग'ची योजना तयार झाली. हा प्रकल्प परिसरातील अनेक शेतकऱ्याना प्रेरक ठरला आहे.

'नुसते पुस्तकी धडे देऊन जे पटविणे अवघड आहे त्यासाठी एखादा प्रत्यक्ष प्रयोग जास्त परिणामकारक ठरतो. म्हणून कृषीविद्यापिठाच्या सहकार्याने फळफळावळ आणि भाजीपाला लागवडीचे विविध शास्त्रीय उपक्रम महाविद्यालयाने राबवले. आधुनिक तंत्रज्ञान, खते आणि रसायनाचा योग्य वापर याचे तज्ज्ञाच्या सहकार्याने शेतकऱ्यासाठी प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे शिक्षण देण्याची यशस्वी योजना अमलात आणली.

नुसत्या 'झाडे लावा'च्या आदेशाने जगल वाढणार नाही त्यासाठी कृती हवी. नैसर्गिक समतोलासाठी त्याची गरज पटविणे महत्त्वाचे आहे अशा परिसराची जाण वाढविणारी वृक्षारोपण आणि संवर्धनाची व्यापक चळवळ सुरू झाली. कॉलेजपरिसरातील २२०० च्यावर वृक्षाची गर्द वनराई




ग्रामीण विकास केंद्राचं उद्घाटन करताना रामकृष्णजी बजाज. सोबत भाऊसाहेब थोरात, ओंकारनाथ मालपाणी आणि प्राचार्य कौंडिण्य.

आणि परिसरातील ३० गावातून केलेले एक लाख वृक्षांचे रोपण आणि संवर्धन ही या चळवळीची यशस्वी फलश्रुती आहे.

कार्यशाळेची स्थापना — तंत्रविज्ञानात रूची निर्माण होण्यासाठी, काम करण्याची सवय हवी, कामालाही प्रतिष्ठा आहे याची जाण यावी, श्रमाचा संस्कार करावा या हेतूने सुरू झालेल्या कार्यशाळेत शेतकऱ्यांना उपयुक्त अशी विविध अवजारे बनवून पुरवली जातात. त्या अनुषंगाने टर्नर, फिटर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, आदी कोर्सेसही सुरू आहेत. त्याचा आजपर्यंत ५० च्यावर जणांनी लाभ घेतला आहे.

२४३ लोकांनी लाभ घेतलेला योगासन वर्ग, ऑफिस व्यवस्थापन, इंग्रजी लिहिता—वाचता येण्यासाठी घेतलेले वर्ग हाही या विस्तारीत उपक्रमाचा एक भाग आहे.

विद्यार्थ्यांची जाण वाढविणारे, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे देणारे उपक्रम राबविताना महाविद्यालयाने महिलांकडेही लक्ष पुरविले आहे. शेतकऱ्यांच्या स्त्रियांसाठी घेतलेल्या सॉस तयार करण्याची प्रक्रिया शिकविणाऱ्या प्रशिक्षणवर्गात सहभागी झालेल्या ग्रामीण स्त्रियांची १०० ही संख्या खासच दुर्लक्षणीय नाही.

'निरक्षरता हा शत्रू आहे' अशा छातीठोक घोषणांनी साक्षरता येणार नाही. त्यासाठी चिकाटीने प्रयत्न व्हायला हवेत. ग्रामीण भागातल्या या महत्त्वाच्या आणि खऱ्याखुऱ्या प्रश्नांकडे स्वातंत्र्योत्तर काळात म्हणावे तेवढे गांभीर्याने कधीच पाहिले गेले नाही. उपक्रमावर झालेला खर्च हे यशस्विता मोजण्याचे सरकारी मोजमाप असल्याने 'घडक योजना' राबवूनही यश मिळाले नाही. महाविद्यालयाने आपल्या भावी विकास योजना सर्वांच्या सहभागानं यशस्वीपणे अमलात आणायच्या असतील तर इथल्या लोकांना साक्षर करायला हवं, त्यांना लिहिता वाचता यायला हवं— त्यांचं भलं—बुरं त्यांना समजलं पाहिजे हे जाणलं. आणि त्यासाठी चिकाटीने प्रयत्न जारी ठेवले. महाविद्यालयातील ४० प्रौढ शिक्षणकेंद्रांच्या माध्यमातून असे साक्षरता वर्ग दरवर्षी वर्षभर नियमितपणे घेतले जातात. विद्यार्थ्यांकडून चालविल्या जाणाऱ्या अशा वर्गांचा दरवर्षी ग्रामीण परिसरातील किमान १२०० लोक लाभ घेतात.

ग्रामीण परिसरातील कुटुंबांच्या आर्थिक कमकुवतपणामुळे त्यांच्या मुलांना योग्य विकास आणि शिक्षणापासून वंचित व्हावे लागते. अशा संस्कारक्षम वयात त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यायला हवी. या हेतूने या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी एकत्र येऊन एक संस्था स्थापन केली. या 'विद्याप्रबोधिनी' संस्थेच्या वतीने 'आनंदवन' नावाची शाळा चालविली जाते. २०० ग्रामीण कुटुंबातील मुलांना त्यामुळे विकासाची संधी निर्माण झाली आहे.

'सहकाराचा संस्कार' हा या शैक्षणिक अॅक्टिव्हिटीजचाच एक भाग आहे. ७२९७ विद्यार्थी भागधारक असलेल्या विद्यार्थ्यांच्या सहकारी संस्थेमार्फत संगमनेर शहरात 'सहकारी ग्राहक वस्तू भांडार' चालविले जाते. यात शालेय उपकरणे, पुस्तके, स्टेशनरी आणि सौंदर्यप्रसाधने योग्य आणि वाजवी किमतीत उपलब्ध असतात. अशा प्रकारचा पुणे विद्यापीठांतर्गत हा पहिलाच उपक्रम आहे.

विद्यार्थ्यांना स्वस्त जेवण उपलब्ध करून देणारं 'तृप्ती कॉमन किचन सेंटर' हा या सहकारी संस्थेमार्फत राबविला जाणारा आणखी एक स्तुत्य उपक्रम.

ग्रामीण परिसरातलं महाविद्यालय. येणारा विद्यार्थीसुद्धा गरीब परिस्थितीतला. तालुक्याच्या गावात येऊन शिक्षण घ्यायचं. जिद्द आहे पण परिस्थितीची साथ नाही. चटणी—भाकरीचं जेवण हेच पूर्णब्रह्म. गावाकडून एस. टी. नं डबा येतो.

जेवणाचा खर्च वाचला तरी इतर आवश्यक खर्च भागवायला हवा. घरून पैसे मागण्याची सोय नाही.

अशा आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्यांना आर्थिक आधार देताना दान न देता, सव-

लतीची सवय न लावता काम करून मिळवण्याची जिद्द निर्माण करून स्वावलंबी शिक्षणाचे धडे देणारा उपक्रम महाविद्यालय दरवर्षी राबवते. या 'कमवा आणि शिका' योजनेत १०० विद्यार्थ्यांना काम दिले जाते आणि मोबदला म्हणून महिना ६० रुपये आणि श्रमाचा संस्कार.

हे महाविद्यालय ज्या परिसरात आहे ते घुलेवाडी गाव.

पिण्याच्या पाण्याची इथे नेहमीच टंचाई. या कामी महाविद्यालयानं पुढाकार घेतला. आणि दोन महिन्यात योजना आकाराला आली.

या पिण्याच्या पाण्याच्या योजनेचा लाभ ४१० ग्रामस्थांना मिळाला आहे.

## कल्पक योजकता

महाविद्यालयाच्या परिसरात असे छोटे, मर्यादित प्रकल्प यशस्वीपणे राबविल्यानं आपल्या कार्याचं क्षेत्र विस्तारण्याच्या दृष्टीनं महाविद्यालयाने शेजारच्या दोन खेड्यांची निवड केली. या खेड्याच्या सर्वांगीण विकासाचा विचार, करताना त्याच्या पाण्याच्या प्रश्नाला अग्रक्रम देणं आवश्यक होतं. गुंजाळवाडीच्या १३४ शेतकऱ्यांना एकत्र करण्यात आलं. सहकारी संस्था स्थापन झाली. सर्वांनी एकमुखानं महाविद्यालयाचं नेतृत्व स्वीकारलं. बँक आणि साखर कारखाना मदतीला आले. आणि सहकारी पाणी पुरवठा योजना आकाराला आली. पावसाकडे डोळे लावून बसणाऱ्या शेतकऱ्यांच्यात उत्साह संचारला..... १६ लाख, ११ हजार ९१५ रु. योजना उभी राहिली. २०० एकर क्षेत्रात पाणी खेळू लागलं.

या प्रयोगानं परिसरातल्या लोकांचं कुतूहल वाढलं. गुंजाळवाडीचं बदललेलं चित्र समोर होतच. महाविद्यालयाचाही आत्मविश्वास वाढला. शेजारच्या आणखी एका खेड्यातले, मालदाडचे १२५ अल्पभूधारक एकत्र आले. महाविद्यालयाशी संपर्क साधला. आणि दुसऱ्या 'लिफ्ट इरिगेशन' चा शुभारंभ झाला.

२० लाख, ४ हजार, ९०० रु. या योजनेनं १७५ एकर शेतीला पाणीपुरवठा होणार आहे.

अन्न, वस्त्र, निवारा ह्या मुलभूत प्राथमिक गरजा. सारख्याच महत्त्वाच्या. संगमनेरजवळच खांडगाव नावाचं गाव. तिथं दगडाच्या खाणीत काम करणारे वडार खाणीच्या बाजूलाच पाल ठोकून राहायचे. दिवसभर कष्ट, पण निवारा नाही; आहे तो सुरक्षित नाही. हिवाळा, पावसाळ्यातले हाल विचारायला नको काम कायमचे, त्यामुळे भटकती नाही. इथच कायम वास्तव्य. या लोकांची समस्या गावाचा सर्व्हे करताना लक्षात आलेली. महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थ्यांनी या लोकांशी संपर्क साधला. योजना समजावली. त्यासाठी त्याना बचतीची सवय लावली. त्याच्या बचतीतून, महाराष्ट्र सरकारच्या सहकार्यानं, विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून, आणि महाविद्यालयाच्या प्रेरणेने खाणीला लागूनच ४५ घरांची एक टुमदार वसाहत उभी राहिली.

उघड्यावरच्या वडारांना निवारा मिळाला.

स्त्री ही आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभी हवी.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्याना त्यासाठी काम पुरवायला हवे.

कोणाच्या औदार्यावर जगत राहाण्यापेक्षा स्वकष्टाने स्वावलंबी बनण्यावर भर दिला तरच 'स्त्री मुक्ती' चळवळीला अर्थ आहे.

अशा ग्रामीण महिलांना काम उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'प्रिन्टिंग प्रेस' चा प्रकल्प उभा आहे

प्रेसच्या कामाबरोबरच पाकिटे तयार करण्याची आणि अनुषंगिक इतर, उपक्रम राबविण्याची योजना आहे या प्रकल्पाचा लाभ किमान ४० स्त्रियाना होईल.

एवढेच का, अजून असंख्य उपक्रम राबविले जातात. योजना तयार आहेत. Restructuring कोर्सेसच्या उद्देशाचा हा दृश्य परिणाम आहे.

अशा विविध उपक्रमातून ग्रामीण जीवनाशी आपले नाते प्रस्थापित करताना विद्यार्थ्यांच्यात सामाजिक जाण निर्माण व्हावी असा प्रयत्न करत असताना विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाकडेही तितकच आवर्जुन लक्ष दिलं जातं. शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच विविध सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या थोरा-मोठ्यांना इथं आवर्जुन बोलावलं जातं. राम ताकवले, राम जोशी, पी. जी. पाटील, जे. पी. नाईक, जी. एस महाजनी, एम् आर. भिडे, सुरेन्द्र बार्रालगे, अनंत काणेकर, ग. प्र. प्रधान, कवि अनिल, कुसुमाग्रज, शंकरराव खरात, गं. बा. सरदार, म. म. द. वा पोतदार, नाथ पै, रामकृष्ण बजाज, सतीशचंद्र, चंद्रशेखर धर्माधिकारी, बी. एन्. देशमुख, चंद्रकांत घोरपडे, अनिलकुमार लखिना, अजित वाडेकर, रा. वा. दांडेकर, डॉ. वि. म. दांडेकर, डॉ. रथ, शरद जोशी, यशवंतराव चव्हाण, मोरारजीभाई देसाई, शरद पवार, दादासाहेब रुपवते, मधुकरराव चौधरी, अण्णासाहेब शिंदे, दत्ता देशमुख, भाऊसाहेब थोरात, बी. जे. खताळ, प्रमोद महाजन, राजकपूर, नर्गिस, कल्याणजी ही त्यातली काही नावं.

विविध विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी विविध उपक्रमाना अशा विविध विचाराच्या लोकाना बोलावलं जातं. विद्यार्थ्यांचा अष्टपैलू विकास घडावा हा त्या मागचा उद्देश.

सरकारच्या अनेक कल्याणकारी योजना आहेत. त्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचतच नाही. ग्रामपंचायतीच्या भिंतीवरच्या पोस्टरवरची योजना कोणताच 'ग्रामसेवक (?)' लोकाना समजावून सांगण्याचे कष्ट घेत नाही. अशा योजनांचा योग्य तो फायदा लोकाना करून घेता यायला हवा.

सगळ्या योजना राबविताना हे भान महाविद्यालयात राखलं... त्यामुळे भारत सरकार, भारत सरकारचे शिक्षण खाते, महाराष्ट्र सरकारचे शिक्षण आणि वनखाते, विद्यापीठ अनुदान मंडळ, सोशल वेल्फेअर बोर्ड, हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन, हंगर प्रोजेक्ट बोर्ड (U.S.A.) साखर कारखाना, नगरपालिका याच विविध योजनांना अर्थसहाय्य मिळवता आलं.

गेल्या २५ वर्षातील प्रयोगाचा हा धावता आलेख.

संगमनेर महाविद्यालय हे अशा विविध 'प्रकल्पाची प्रयोगशाळा' आहे. 'अहवालापुरता प्रकल्प' असं या कामाचं स्वरूप नाही.

शैक्षणिक संस्था ही ज्या परिसरात काम

करते त्या परिसरातील सर्वांगीण जीवनाशी ती बांधील आहे. या विचारानं, या मातीतल्या माणसाच आपण काही देण लागतो हे भान प्रत्येक प्रकल्पानं राखल. तसा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. म्हणून हे महाविद्यालय या परिसरातील विधायक आणि रचनात्मक चळवळींचं केंद्र बनलं आहे.

महाराष्ट्रातील हे असं एकमेव महाविद्यालय असाव.

सामाजिक काम करताना वेळोवेळी दंड थोपटावे लागतात.

प्रस्थापित गटांशी सामना उभा राहतो. अशावेळी समाजाची ही अलिप्ततेची भावना असते. त्यामुळ काम करणारे खचतात, नाउमेद होतात.

सरकारच्या विविध योजनांचा पाठपुरावा करताना दमछाक होऊन जाते अशा स्थितीत अविरत काम करत रहाण अवघड, पण या महाविद्यालयान ते करून दाखवल आहे. या सर्वांमागे भारदस्त आधार आहे महाविद्यालयाचे प्राचार्य–मधुसूदन कौडीण्य यांचा.

विद्यापीठाचा उपक्रम हा ' वरून आलेला' म्हणून फक्त यांत्रिक अमलबजावणी न करता प्रत्येक उपक्रम अग्रक्रमान राबविण्याचा अट्टाहास आहे.

कामाचा अहर्निश ध्यास आहे. आणि त्यात मानसिक सहभागही आहे.

प्रत्येक प्रकल्पात, प्रयोगात कल्पक योजकता आहे. या शिक्षण, सशोधन आणि विकासाच्या कार्यक्रमातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि लाभकर्त्या ग्रामीण जनतेचा शारीरिक आणि मानसिक सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे.

इथले संस्थाचालकही तशी ' दृष्टी ' असलेले आहेत. सगळी संस्था हाच एक परिवार आहे. हे काम सगळ्या परिसरात पुरेपूर भिनलं आहे. झिंग आली आहे.

गती धीमी असली तरी दमदार आहे.

समाजाभिमुख शिक्षणपद्धतीचा हा प्रयोग, विधायक आणि रचनात्मक चळवळीचं हे स्वरूप विस्तारलं,–नक्कीच विस्तारेल.

शहराच्या दिशेनं वहाणारा रस्त्यांचा ओघ आता मागे फिरेल. पुन्हा खेडीं वसतील. मग महात्मा गांधींच्या स्वप्नातल्या स्वयपूर्ण भारताचं चित्र फार लांब असणार नाही !

□

# मांडवा प्रकल्प - यश आणि अपयश

विश्राम राजहंस

अलिबाग तालुक्यात उत्तरेला माडवा नावाचं गाव आहे. मुबईहून लॉंचने या माडवाला जाता येतं वैभवशाली मुबईच्याजवळ पण तरीही वैभवापासून हजारो योजने दूर अशी या मांडवा परिसराची परिस्थिती आहे. या भागात वैद्यकीयसेवा नावालासुद्धा अस्तित्वात नव्हती. कोणी आजारी पडला तर प्रथम घरगुती उपाय, मग भगत, मांत्रिक इ उपाय आणि शेवटी पैसे जवळ असले तर बैलगाडीत घालून २०–२५ कि मी. अंतरावरच्या अलिबागच्या सरकारी दवाखान्याची वारी करून जगला वाचला तरच तो परत यायचा कारण अलिबागचं हॉस्पिटल म्हणजे नावालाच होतं. ही परिस्थिती होती १९७०-७१ ची.

मुबईला डॉ. एन्. एच्. अँटिया नावाचे एक प्रख्यात प्लास्टिक सर्जन आहेत. त्यांनी या भागास वारंवार भेट देऊन त्याची पहाणी केली. माणसं साध्या साध्या विकारानं भरून आत होती. किरकोळ रोगसुद्धा महिनोन् महिने शरीरात ठाण मांडून बसत असे. आव, जत, सर्दी, खोकला यासारख्या रोगांचा उपचार होऊ शकत नव्हता. जे काही तथाकथित ' डॉक्टर्स ' या भागात व्यवसाय करीत होते, ते पूर्वी दवाखान्यात कपौंडर असायचे. म्हणजे त्याच वैद्यकीय ज्ञान बरचसं अर्धवटच. त्यामुळे जे काही उपचार ते करायचे, तो महाग तर असायचा, पण बहुधा चुकीचाही असायचा.

यावर काहीतरी केलं पाहिजे असा विचार करून डॉ. अँटिया यांनी प्रसिद्ध उद्योगपती श्री. एन्. पी. गोदरेज याच्या सहाय्याने प्रथम या विभागाची काटेकोर शास्त्रीय पहाणी केली व मग एक योजना आखली. कोणत्याही गावाच आरोग्य चांगलं ठेवणं यासाठी फार मोठ्या तंत्रज्ञानाची किंवा फार मोठ्या साधनसामुग्रीची गरज लागत नाही, असं डॉक्टराच मत होतं. समाजाचं सहकार्य असेल तर अत्यत कमी खर्चात, सरकारी योजनेपेक्षाही जास्त कार्यक्षमतेने आरोग्यसेवा उपलब्ध करता येईल. सध्याची सरकारी वैद्यकीय सेवा यंत्रणा आरोग्याचा फक्त उपचार पद्धतीने विचार करते, तर प्रत्यक्षात रोगप्रतिबंधनाच्या उद्देशाने ही सेवा राबवली पाहिजे.

माडवा परिसरात एकदर ३० खेडी आहेत १९७१ साली लोकसख्या सुमारे ३०,००० होती. मुख्य धंदा शेती आणि मासेमारी. अगदी क्वचित कुठेतरी कुक्कुटपालन, दुग्धदुभतं किंवा छोटासा कारखाना दिसतो. शिवाय बहुतेक घरातन एखादा माणूस मुबईला चाकरमान्या असतोच. त्यामुळे एकदरीत आर्थिक स्थिती अत्यत हलाखीची. १९७६ साली मी एका माझ्या मित्रासोबत त्या भागात गेलो असताना, आमच्या स्वागतासाठी जो चहा झाला, त्यातला गूळ एका घरातला, पातीचहा दुसऱ्याकडून, दूध तिसऱ्याकडून आणि चूल चवथ्याची, या पद्धतीने झाला ( शिवाय तो दोन कप चहा. ८–१० जणात वाटला गेला ! ) अशा या भयानक दरिद्री अवस्थेत सार्वजनिक किंवा खाजगी आरोग्य ते कोणतं असणार ?

या भागातले सगळे रोग दारिद्र्याचे होते. गॅस्ट्रो, जंत, खरूज, मलेरिया, क्षय आणि कुष्ठरोग. वैद्यकीय दृष्टया हे सर्व रोग बरे करायला अगदी सोपे. त्याचे प्रतिबंधक उपायही फारसे अवघड नाही. लस टोचणे, गॅस्ट्रोमधे पुरेसे पाणी पोटात घेणे, विहिरी निर्जंतूक करणे या उपायाना खर्चही फार येत नाही. मग तरी या ठिकाणी अनारोग्य एवढे का ? गावकऱ्याकडे असलेले आरोग्याचे अज्ञान, याच उत्तरापाशी शेवटी आपण येऊन पोचतो. म्हणून मग डॉक्टर अँटिया यानी लोकाना शहाणे करून सोडण्यासाठी एक अभिनव तोडगा काढला.

१) प्रत्येक गावातील एक–दोन व्यक्तीना पद्धतशीर प्राथमिक वैद्यकीय ज्ञान द्यायचं. २) ती व्यक्ती शक्यतो स्त्रीच असावी. ३)

तीअल्पाक्षर असली तरी चालेल पण समजूतदार, गावाबद्दल आपुलकी असणारी व चतुर असावी. अशा आरोग्य सेविकांच्या पायाभूत आधारावर एक पूर्णपणे स्वतंत्र व स्वायत्त अशी वैद्यकीय . सेवा यत्रणा उभी करू शकलो तर तो एक नवा प्रयोगही होईल व त्यामुळे सर्व देशभर प्रयोग लागू करता येईल.

डॉ. अँटिया सुरुवातीला गावा–गावात जायचे आणि झाडाखाली बसून गावकऱ्याशी या विषयावर चर्चा करायचे. गावकऱ्याच्या आरोग्याच्या कल्पना जास्त डॉक्टर्स, मोठे हॉस्पिटल, भरपूर मोफत औषध याच्या पलिकडे जायच्याच नाहीत. 'बाबानो तुमच्या गावाच आरोग्य तुमच्याच हातात आहे ते चागल ठेवण्यासाठी फार खर्च येत नाही. तुम्हाला त्याची फक्त नीट माहिती व्हायला पाहिजे.' असं डॉक्टर बोलू लागले की माणसं चूप बसत असत. त्यामुळे डॉक्टर अँटियाना आपल्यापुढे केवढ मोठ काम कराव लागणार आहे, याची जाणीव झाली.

१९७३ च्या सुरुवातीला प्रत्यक्ष योजना सुरू झाली सुदैवाने डॉक्टराच्या कल्पनाचा प्रसार करण्यासाठी एक उत्कृष्ट मदतनीस मिळाला हा गृहस्थ स्वत: खेड्यातलाच होता आणि शिवाय मुबईतल्या टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस या सस्थेचा पदवीधर होता. त्याने आपल्या स्वत:च्या नवीन पद्धतीने काम सुरू केल. झाडाखाली बसून लोकांशी चर्चा करण्याबरोबरच एक प्रत्यक्ष दवाखाना जर सुरू केला केला तर लोकांना ते लवकर पटेल, म्हणून 'माडवा' बंदराच्या गावी दवाखाना सुरू करण्यात आला. त्या साठी सुदैवाने एक अतिशय सेवावृत्ती डॉक्टरही मिळाला

एकमेकास अनुरूप कार्य करणाऱ्या या दोन–एक सामाजिक व्यावसायिक कार्यकर्ता आणि दुसरा वैद्यकीय तत्रज्ञानात पारगत असा डॉक्टर, या व्यक्तीमुळे डॉक्टर अँटियाच्या कल्पना भराभर प्रत्यक्षात उतरू लागल्या दवाखान्यामळे या कार्याची माहिती सगळीकडे झटपट पसरू लागली. याच वेळी मग प्रत्येक खेड्यातून एकेका आरोग्य-सेविकेला निवडण्यात आलं. तिला ५० रु. द. म. देण्याच त्या त्या गावच्या ग्रामपंचायतीनी कबूल केल. उरलेले ५० रु. या आरोग्य–योजनेच्या खर्चातून देण्यात येणार होते. पहिल्या १५ आरोग्य–सेविकाचा शिक्षणाचा एक १० दिवसाचा अभ्यासक्रम झाला. या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष वर्ग घेण्यापेक्षा चर्चा, शंका–समाधान, गप्पा यावर जास्त भर होता.

याच वेळी मांडवा येथे विस्तार करण्यात आला. एक हॉस्पिटल बाधण्यात आल. डॉक्टर व सामाजिक कार्यकर्ता या खेरीज सर्व कामावर देखरेख करण्यासाठी एक प्रशासकीय अधिकारी नेमण्यात आला या प्रयोगाच सशोधनाच्या दृष्टीने मूल्यमापन व्हावं म्हणून संशोधकही नेमण्यात आला. प्रशासकीय कामासाठी एका मदतनीस घेण्यात आला. इकडे मुबईत या कार्यासाठी डॉ. अँटिया व श्री. एन. पी. गोदरेज यांनी 'फाऊंडेशन फॉर रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ' या नावाचे एक प्रतिष्ठानच निर्माण केले. त्यामुळे सर्व कार्याचे सुसुत्रीकरण झाले.

शेवटी कुलाबा जिल्हा परिषद व महाराष्ट्र सरकारदेखील या कार्यास हातभार लावण्यासाठी पुढे झाले. वोलकार्ट फाऊंडेशनच्या देणगीतून ठोकावडे येथे एक मोठे हॉस्पिटल बाधण्यात आल. त्यात एक हॉस्पिटलची इमारत व एक कर्मचारी वसाहत अशा दोन बिल्डिंग्स बाधण्यात आल्या. त्याचा चालवण्याचा खर्च, पगार, औषधे इ. सरकार देणार होते. अशा रितीने एक खाजगी प्रतिष्ठान व सरकार याच्या सहकार्याने हा माडवा प्रयोग जोमाने सुरू झाला.

. या प्रयोगात सगळ्यात खाली सुमारे २८ आरोग्य सेविका होत्या. त्या आपापल्या गावात प्राथमिक उपचार करायच्या, पाच वर्षाखालील मुलाची नोद ठेवायच्या, क्षय व कुष्ठरोगाच्या रुग्णाची तपासणी करून त्यांना हॉस्पिटलमध्ये निदानासाठी पाठवायच्या, गर्भार स्त्रियाना काळजी कशी घ्यावी याचा सल्ला द्यायच्या, गावातल्या लोकांना सार्वजनिक आरोग्य कसे राखावे याचा उपदेश करायच्या, रुग्ण गभीर असेल किंवा उपचारांना दोन दिवसपर्यंत दाद देत नसेल तर त्याला प्रशिक्षित नर्सकडे सोपवल जायचं

प्रशिक्षित नर्स दर पाच–सहा खेड्यातून एक असायची. आरोग्य सेविकेला मदत करणे, तिच्यावर देखरेख ठेवणे हे तिचे काम होते. या नर्सेस बाळंतपणं करायच्या, लस टोचायच्या आणि गर्भार स्त्रियाची काळजी घ्यायच्या. त्याच्या हाताबाहेरची केस असेल तर मात्र ठोकावडे इथल्या इस्पितळात रुग्णाला पाठवण्यात येई.

## फायदे–मूल्यमापन

इस्पितळात एक ऑपरेशन थिएटर होते व एक वॉर्ड होता. इथे रुग्णाच्या रोगाचं निदान करून पूर्व उपचार करण्याची सोय होती. अशा प्रकारच्या त्री–स्तरीय आरोग्य योजनेमध्ये आरोग्यविषयक जवळजवळ सर्व समस्या सोडविण्याची क्षमता होती. या योजनेचा आत्मा म्हणजे आरोग्य सेविका होत. त्यांच्याकडे काही सल्फा औषधे, अॅस्पिरीन, क्लोरोक्वीन ( मलेरियासाठी ) पिपरेझीन (जतासाठी) आणि काही अ व ड जीवनसत्वे एवढी औषधे दिलेली असत. निदान झालेल्या कुष्ठरोग्याच्या रुग्णांना डॅप्सोनच्या गोळ्या देणे, हे देखील कार्य त्याच्याकडे होते. याशिवाय कुटुबनियोजन, ५ वर्षाखालच्या मुलाची काळजी, साथीच्या रोगाबाबत घ्यायची काळजी, पाणीपुरवठा व साडपाणी निचरा याची नीट व्यवस्था बघणे इ. कामाबाबतही त्याना शिक्षण दिलेले होते.

अलिबाग तालुक्याच्या उत्तर भागातल्या या ३२ खेड्याच्या आरोग्याची देखभाल करण्यासाठी हा माडवा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येऊ लागला; पण केवळ आरोग्य–सेवा देऊन या भागाचे प्रश्न सुटणार नव्हते. शेवटी या लोकाचे दारिद्र्य हे देखील या अनारोग्याचे प्रमुख कारण होते. म्हणून 'सामाजिक आरोग्य संशोधन प्रतिष्ठान' च्या वतीने या भागात इतर काही पूरक योजना सुरू करण्यात आल्या. यासाठी एका पूर्व प्रशिक्षित व सामाजिक जाणीव असणाऱ्या इंजिनियरची नेमणूक करण्यात आली. निरनिराळ्या सस्थाकडून पैसे उभारण्यात आले.

. **(१) आदिवासी – विकास योजना :** यात सरकारच्या मदतीने आदिवासीना शेतकरी बनविण्याचे प्रयत्न सुरू झाले. आदिवासीची एक सघटना बांधून सामूहिक

शेतीचा प्रयोग सुरू झाला. २० कलमी कार्यक्रमाद्वारे कातकऱ्यासाठी घर बांधण्याचा कार्यक्रम झाला. एक बोअरिंगची विहीर खोदण्यात आली आणि एक बालवाडीसुद्धा सुरू करण्यात आली.

(२) **सार्वजनिक आरोग्य योजना :** मानकुळे गावच्या लोकांच्या २५% खर्चाच्या सहभागाने गावात स्वच्छ सडास बांधायच ठरल.

(३) **शेतीविकास कार्यक्रम :** बांधवस्ती घालणे, बिंदू-सिंचन पद्धतीची शेती करणे, कपोस्ट खत तयार करणे इ. कार्यक्रमाचा यात अंतर्भाव होता.

(४) **बालकांचे पोषण :** दारिद्र्यामुळे बालकाचं नीट पोषण अवघडच होतं. म्हणून बालकाना रोज एक ग्लास दूध देण्याची योजना सुरू करण्यात आली.

याशिवाय आणखी काही योजना आखण्यात आल्या; पण त्याची सुरुवातच होऊ शकली नाही. अशा प्रकारे हा माडवा प्रकल्प १९७३ साली सुरू झाला. ८-१० वर्षात खूप विस्तार पावला. याचे फायदे लगेच दिसायला लागले. रोग-प्रतिबंधक लस बहुसख्य मुलाना टोचली गेली. बालमृत्यूच प्रमाण खाली आलं, बाळंतपणातल्या स्त्रियांची जास्त काळजी घेतली गेल्याने, स्त्रियाच्या व बालकाच्या आरोग्यात वाढ झाली, कुष्ठरोग व क्षय या रोगाच्या जास्तीत ज्यास्त केसेस शोधून काढून त्यावर उपचार करण्यात आले. कुटुंब नियोजनाचा प्रचार प्रभावी करण्यात आला.

सशोधनाच्या दृष्टीने या प्रकल्पाच मूल्यमापन होत राहिल्याने ही सर्व प्रगती आकडेवारीनिशी सिद्ध करता आली. या सर्व प्रयोगाच्या मुनशी आरोग्य-सेविकाचा ताफा होता. असाच आरोग्य-सेविकाचा ताफा जामखेडला डॉ. रजनीकात आरोळे यानी पण तयार केला होता. माडवा प्रकल्प १९७०-७१ च्या सुमारास आखण्यात आला. साधारणपणे त्याच वेळेस डॉ. आरोळयाचा जामखेड प्रयोगही सुरू झाला होता; पण तोही अगदी बाल्यावस्थेत होता. त्यामुळे कोणतेही मॉडेल समोर नसताना माडवा प्रकल्प सुरू झाला.

पण सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हा मांडवा प्रकल्प १९८४ साली पूर्णपणे बंद पडला. 'सामाजिक आरोग्य संशोधन प्रतिष्ठान'ने या प्रकल्पातून आपले अंग संपूर्णपणे काढून घेतले. त्यामुळे सध्या तिथे फक्त सरकारी 'कामकाज' चालू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र नेहमीप्रमाणेच चालू आहे. या प्रकल्पात प्रतिष्ठानतर्फे ४४ जण काम करीत होते (त्यात २८ आरोग्य सेविका होत्या.) आणि सरकारतर्फे ६ कर्मचारी होते. आज तेथे फक्त सरकारी सेवक आहेत. याचवेळी हेही ध्यानात येते की डॉ. रजनीकात आरोळे याचा जामखेड प्रकल्प पूर्ण जोमात चालू आहे. मॅगसेसे पारितोषिकही त्यांना मिळाले. पण माडवा प्रकल्पाला मात्र गाशा गुंडाळावा लागला. याची कारण शोधायला गेलं तर अक्षरश: अनत आहेत. या कारणाचा अभ्यास करणे, हे सामाजिक कार्यकर्त्याचं काम आहे त्यामुळे कार्यकर्त्याला आपल नक्की कुठ चुकत आहे, ते कळेल.

## अपयशाची कारणे

(१) ज्या डॉ. अँटिया व श्री. गोदरेज यांनी हा प्रकल्प सुरू केला, ते दोघेही शहरातलेच. जन्म, शिक्षण हे शहरात झालेले. शिवाय दोघेही खानदानी श्रीमंत. शहरातल्या सामान्य लोकाशीसुद्धा त्याचा संपर्क नाही, तर खेड्याशी कुठून असणार ? त्यामुळे खेड्यातले प्रश्न सोडवण्यासाठी लागणारी अत:दृष्टी त्याच्याजवळ नाही. अर्थातच हा त्याचा दोष नाही. उलट श्रीमंत व उच्च वर्गातील असूनही खेड्यासाठी काही तरी कराव असं वाटणं हे त्याना भूषण आहे.

(२) डॉ. अँटिया यानी प्रतिष्ठानचे डायरेक्टर या नात्याने प्रकल्पाची जबाबदारी उचलली तरी त्याचे वास्तव्य व व्यवसाय कायम मुंबईत असे महिन्यातून एखाद दुसरी भेट देऊन प्रकल्पावर व्यक्तीश: नियत्रण ठेवणे, आपल्या कल्पना प्रत्यक्षात स्वत:च अमलात आणणे, त्यात सुधारणा करणे हे त्याना प्रकल्पापासून लाब राहून जमणे शक्यच नव्हते.

(३) सुरुवातीला एक डॉक्टर व एक सामाजिक कार्यकर्ता असे दोघेजण या कामासाठी नेमले गेले. ते दोघेही उच्च विद्याविभूषीत होते व शिवाय मूळचे खेड्याचले होते. त्यामुळे ते दोघे या कामासाठी पूर्ण योग्य होते. त्यानीच या मांडवा प्रकल्पाचा पाया घातला. आरोग्य सेविकांची पहिली तुकडी त्यानीच तयार केली. पण लवकरच त्या दोघानी एकदमच राजिनामा दिला. कारण प्रकल्पाच मूल्यमापन करण्यासाठी व नीट सुसूत्रीकरण होण्यासाठी दोन अधिकारी याच्या डोक्यावर बसवले गेले. ज्यानी आपली पूर्ण शक्ती लावून व कल्पना लढवून काम सुरू केलं, त्याना आता दुसऱ्या अननुभवी माणसांकडून आदेश स्वीकारणं कठीणच झालं असत. या व्यतिरिक्तही काही कारणं असतील, पण त्या दोघांच्या एकदम निघून जाण्याने प्रकल्पाला पहिला हादरा बसला. दूरान्वयाने याचा दोष पुन्हा डॉ. अँटियाच्याकडेच जातो. त्यांनीच या नेमणुका केल्या.

(४) प्रकल्प सूत्रधार म्हणून ज्याला नेमले होते, तोच तो प्रकल्प सोडून आपली पी. एच. डी. करण्यास निघून गेला. म्हणजे शेवटी या प्रकल्पात तीन जागा रिकाम्या झाल्या. माडवा प्रकल्पासारख्या सामाजिक प्रयोगामध्ये काम करणारे कार्यकर्ते अत्यंत तळमळीचे, सेवाव्रती व पूर्णपणे परिपक्व असावे लागतात. केवळ रिकाम्या जागा भरून प्रकल्प मार्गी लागत नाही. पण ही चूक प्रतिष्ठानच्या अननुभवी डायरेक्टरांना समजली नाही. या तिघाच्या बदली दुसरी माणस नेमली गेली. पण ती कामासाठी काम करणारी होती. डॉक्टर म्हणून एक सेवानिवृत्त आरमारी डॉक्टर नेमले गेले. प्रकल्प सूत्रधार म्हणून पुन्हा एक टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसचा पदवीधारक होता.

(५) माडवा प्रकल्प हा मूळचा आरोग्यप्रकल्पच होता. पण त्याला जोडून आर्थिक-सामाजिक विकासाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. अशा कामासाठी लागणारे तत्रज्ञान, किंवा पायाभूत आराखडा नसतानासुद्धा हे काम रेटण्यात आले. हे सर्व कार्यक्रम गुतागुतीचे आणि पूर्ण वेळ खाणारे होते. त्यामुळे मूळच्या आरोग्य-सेवेच्या कार्याकडे दुर्लक्ष झाले, शिवाय सर्व कार्यक्रमाची जबाबदारी डॉक्टरांच्याही अगावर टाकली गेली.

(६) टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल

सायन्सेसचे पदवीधर हे अशा प्रकारचे सामाजिक कार्य करायला पूर्ण लायक असावेत, अशी अपेक्षा असते. इथे झालं उलटच. सुरुवातीचा प्रकल्प संघटक सोडला तर बाकीच्याकडून प्रकल्पाचा तोटाच होत गेला. म्हणजे सामाजिक कार्याचं प्रशिक्षण घेण्यापेक्षा मूळची कार्याची तळमळ असणं, हे जास्त महत्त्वाचं आहे.

(७) प्रकल्पाचा पहिला डॉक्टर सोडला तर नंतर येणारे डॉक्टर्स पाट्या टाकणारे होते. त्याना कार्याची तळमळ नव्हती किंवा सामाजिक बांधिलकीची जाण नव्हती. एकंदरीत खेड्यात राहून पगार घेऊन सेवा करणारे डॉक्टर्स मिळणं दुर्मिळच एखादा चुकूनमाकून मिळाला, तर त्याला टिकवून ठेवता आलं नाही. शेवटची ३–४ वर्षे तेथे एक बी. ए. एम. एस. डॉक्टर होता. तो तिथला स्थानिक रहिवासी असल्याने, तो पूर्णवेळ काम करत होता. पण डॉ. अँटिया व इतर मंडळीचा त्याच्यावर विश्वास नव्हता. त्यांच्या कमी अनुभवामुळे, त्याला मोठी ऑपरेशन्स करता आली नाही. त्यामुळे बरेच रुग्ण अलिबागला पाठवावे लागले. त्यामुळेही लोकाचा या हॉस्पिटल-वरचा विश्वास उडाला.माघ्या अडाणी बाईला जर प्रशिक्षण देऊन आरोग्य-सेविका करता येत होतं, तर या अनुभवी डॉक्टरलासुद्धा प्रशिक्षण देऊन त्याच्याकडून सर्व कामे करून घेता आली असती. याऐवजी तो प्रकल्पच बंद करून टाकण्यात आला.

(७) आरोग्यसेवकांनी सुरुवातीच्या काळात खूपच चागले काम केले. पण पुढे पुढे लोक त्याच्याकडून औषधं घेण्यापेक्षा, नर्स-कडून किंवा डॉक्टरांकडून घेऊ लागले. हे प्रकल्पाच मूलभूत अपयश. याची कारणं विविध आहेत अ) नर्सेसची सख्या जास्त असल्याने त्या सहज उपलब्ध होत्या त्यामुळे त्याच्याकडून औषध घेण सोप बनल. ब) नेहमीच्या ओळखीच्या स्त्रीपेक्षा परक्या व्यक्तीवर जास्त विश्वास बसतो. क) आरोग्यसेविकाकडे असलेली तुटपुंजी औषधं. ड) वैद्यकीय उपचार–सेवा ही फार सोपी असते, हा भ्रम.

इथं लक्षात ठेवलं पाहिजे की, आरोग्य-सेविका उपचाराबद्दल पैसेही (अधिकृतपणे) घेत होत्या. त्यामुळेच सुरुवातीला का होईना, त्यांना जे यश मिळाले ते फार लक्षणीय आहे.

## उत्साह संपला

(८) नर्सेस ज्या नेमल्या गेल्या, त्यांचं प्रशिक्षण फारच अपुरं होत. त्याना प्रति-ष्ठानतर्फे पुन्हा प्रशिक्षण द्यायला पाहिजे होतं. जिल्ह्याच्या ठिकाणी सरकारी प्रशिक्ष-णाची पातळी फारशी चांगली नसते. शिवाय या नर्सेसकडे आरोग्य–सेविकेमार्फत रुग्ण यायला पाहिजेत. पण प्रत्यक्षात या नर्सेसच रुग्णांना सरळ आपल्याकडे येण्यासाठी उत्तेजन देऊ लागल्या. त्यामुळे आरोग्यसेविकेचं महत्त्व कमी झालं. हे म्हणजे इमारतीचा पाया खिळखिळा करण्यासारखं होतं.

(९) आरोग्यसेविकेपासून हॉस्पिटलपर्यंत उभारलेल्या या मांडवा प्रकल्पाचा उद्देश लोकांवर उपचार करणे हा नसून, रोग-प्रतिबंधन हा होता. पण प्रत्यक्षात रोगप्रति-बंधनाचा भाग खूप कमी पडला आणि रोग–उपचार हाच भाग मुख्य बनला. मग सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि मांडवा प्रकल्प यात फरक काय राहिला?

(१०) गावकऱ्याना या यंत्रणेचे फायदे स्वीकारण्यापुरते सहभागी न करता, त्याना या यंत्रणेचा भाग बनवणे, हे एक या प्रक-ल्पाचे उद्दिष्ट होते. पण प्रत्यक्षात ते झालं नाही. नाही म्हणायला ग्रामपचायतींनी आरोग्यसेविकाचे निम्मे पगार देण्याचं कबूल केलं. (ते सुद्धा अगदी सुरुवातीच्या सामा-जिक कार्यकर्त्यांमुळेच) पुढे प्रतिष्ठानने ही यंत्रणा गावकऱ्यातर्फेच राबवण्यासाठी एक समिती बनवली या समितीमध्ये गावातले राजकारणी व उच्चवर्गीय श्रीमत लोकच भरले गेले.प्रतिष्ठानने ही निवड होताना तटस्थ भूमिका घेतली, हे चुकलेच. राजकारणी स्वार्थी व हितसंबंधी मंडळीच्या कारवाया-कडे प्रथमपासून लक्ष द्यावयास हवे होते. (इथे 'मंथन' या चित्रपटाची आठवण येते. सहकारी दुग्ध योजनेत सर्व थरातली माणसं सहभागी व्हावीत म्हणून चित्रपटाचा नायक अथक परिश्रम व प्रयत्न करतो. ते जेव्हा सहभागी होतात, तेव्हाच ती चळवळ रुजते.) हा प्रकल्प गरिबासाठीच होता, आणि प्रत्यक्षातसुद्धा गरीब माणसंच त्याचा फायदा घेत होती. तेव्हा समितीवरसुद्धा त्या गरीबां-चेच प्रतिनिधी यावेत असा प्रयत्न करायला पाहिजे होता. ही चूक संपूर्ण प्रकल्प बंद होण्यास पुढे कारणीभूत झाली.

(११) आतापर्यंतच्या सरकारी धोरणाने लोकांना अशी सवय झाली होती, की गावाचा किंवा लोकांचा विकास करायचा म्हणजे लोकानी मागण्या करायच्या व सरकारने त्या पुरवायच्या. लोकानी स्वतः होऊन त्या कामामध्ये काही स्वतःचा सहभाग दाखवावा, अशी अपेक्षा किंवा सवय कुणीच लावली नाही. या प्रकल्पात लोकांचा सहभाग महत्त्वाचा होता दुर्दैवाने राजकीय पुढाऱ्यानी लोकाना या प्रकल्पाविरुद्ध चेतवले आणि या पुढाऱ्यापुढे प्रतिष्ठानचा प्रचार किंवा महत्त्व कमी झाले. अशा सार्वजनिक कार्यात राज-कीय हितसंबधाचा विरोध होणार याची कल्पना अगोदर कुणालाच आली नाही. त्यामुळे पुढे पुढाऱ्यांनी वाट अडवल्यावर मागे फिरण्यावाचून गत्यंतरच उरलं नाही.

(१२) लोकांच्या अगवळणी नवीन कल्पना पडण्यास बराच वेळ लागतो. म्हणून कोणताही कार्यक्रम राबवताना पुरेसा वेळ जाऊ द्यावा लागतो. तो या प्रकल्पात दिला गेला नाही. एकामागोमाग कार्यक्रमावर कार्यक्रम लोकांवर लादले गेले. प्रकल्पाचे कर्मचारी 'शहरी' वळणाचे आणि थोडे फार पाश्चात्य सस्कारांचे असले तर जे काही भारतीय खेड्यातील कार्यक्रमाच होत, तेच या ठिकाणीही झालं.

(१३) कार्यक्रमाचे मुख्य सूत्रधार, त्याचे सहाय्यक, वैद्यकीय अधिकारी, संशोधन अधिकारी आणि मुंबईतले प्रतिष्ठानचे डायरेक्टर याच्यात शेवटी शेवटी सुसवाद न राहाता, खूप वाद होऊ लागले. स्थानिक चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी आणि हे अधिकारी यांच्यातही खूप भांडण झाली. त्याचं पर्यवसान अनेक अधिकाऱ्यानी राजिनामा देण्यात झालं. तेव्हा अशा प्रकल्पाच्या अधिकाऱ्याकडे जर जनसंपर्काचं तंत्र नसेल तर हाताखालची किंवा बाहेरची माणसं हाताळण्यात चूक होते आणि त्याचा परिणाम प्रकल्पावर होऊ शकतो, हाही एक धडा यातून शिकायला मिळतो.

(१४) आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबवण्यासाठी एक समुचित तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतलेला इंजिनियर नेमण्यात

आला होता. पण त्याने राबवलेल्या बहुसख्य योजना पूर्णपणे अपयशी ठरल्या. म्हणजे पुन्हा अशा कार्यासाठी विद्यापीठीय शिक्षण घेतलेले पदवीधर अलायक असतात; असा निष्कर्ष निघू शकतो. बालकांच्या पोषणासाठी परकीय चर्चच्या मदतीने दुधाची पावडर आणून मोफत दूध वाटपाचा कार्यक्रम सुरू केला, पण लवकरच पुरेशा प्रतिसादाअभावी बंद करण्यात आला. या सगळ्या शहरातून आलेल्या लोकाना वाटायचं, आपण एवढं पोषक अन्न मुलाना मोफत देतोय, पण त्याना त्याचं महत्त्वच कळत नाही. या कार्यक्रमातल मुलाच मानसशास्त्र (एकच चव रोज) किंवा एक ग्लास दुधासाठी त्याना किती अतर काटावं लागत याचा विचार आणि शेवटी पावसाळ्यातल्या अडचणी याचा नीट साकल्याने विचार झालाच नाही. (तलासरी येथे दुधाऐवजी पाव-उसळ दिली गेल्यावर आदिवासी भरपूर संख्येने जमू लागले हेही या ठिकाणी आठवतं.)

१५) आर्थिक कार्यक्रमामध्ये कातकरी लोकांना शेतीचे शिक्षण देऊन शेतकरी बनवण्यात जोर देण्यात आला. पण आदिवासीमधे सामाजिक बदल घडवून आणणं फार अवघड असल्याने या पहिल्याच कार्यक्रमात सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह खर्ची झाला आणि शेवटी पूर्ण निराशा पदरी आली. तेव्हा सामाजिक कार्यात जे सोपं, सहज जमण्यासारखं आहे, त्याने सुरुवात करून मग अवघड, गुतागुतीची कामं हाती घेतली पाहिजेत.

## सांस्कृतिक क्रांतीच हवी

१६) माडवा प्रकल्पाविषयी मी डॉ. एन. एच. अँटिया याना विचारलं की, तुम्हाला काय शिकायला मिळालं, तेव्हा त्यांनी फार छान उत्तर दिलं. ते म्हणाले, 'खेडूत लोक फार चतुर आणि शहाणे असतात. त्याच्याकडूनच आपण खूप शिकू शकतो. कोणत्याही योजनेतील त्रुटी त्याना समजतात. त्याच्यात अन् आपल्यात नीट सुसवाद असेल तरच त्यांचं म्हणण आपल्याला कळतं. शहरातल्या लोकानी त्याना ज्ञान टोचून देण्याचा प्रयत्न करू नये. तसेच आरोग्यापेक्षा पोटाची खळगी भरणे, ही त्याची जास्त गरजेची गोष्ट आहे,'

मात्र हा प्रकल्प बद पडल्यास ते ग्रामपंचायत व जिल्हा परिषदेच्या राजकारणी लोकाना जबाबदार धरतात. या स्वार्थी सत्तास्पर्धी लोकांना हा प्रकल्प म्हणजे त्यांच्या सत्तेला आव्हान वाटू लागला. अन् त्यामुळे त्याचा विरोध सुरू झाला. या विरोधाला न जुमानता काम सुरू ठेवलं, तेव्हा शेवटी तेथील प्रतिष्ठानच्या कर्मचाऱ्याना धाकदपटशा सुरू झाला. अगदी जीवावरच बेतायला लागल्यावर मात्र त्यानी हा प्रकल्प गुडाळला. महाराष्ट्रात काय कुठेही स्थानिक हितसबध हे असतातच. एकतर त्यांचे सहाय्य घेऊन किंवा त्यांना प्रथमपासून दूर ठेवूनच कोणतही कार्य करावं लागतं. हा देखील अशा प्रकल्पातून मिळणारा धडाच आहे. डॉ. अँटिया याना असं वाटत की, या प्रकल्पामुळे त्याना (म्हणजे पुढाऱ्याना) राजकीय फायदा किंवा व्यक्तिगत फायदा (मोफत उपचार व प्रथम पसती) मिळत नसल्याने त्यानी विरोध केला.

मी जेव्हा त्याना 'हे सगळीकडे असच चालत' असं सागायला लागलो, तेव्हा ते उसळून म्हणाले, 'मी चीनला जाऊन आलो. तिथे अगदी माडवा प्रकल्पाप्रमाणेच आरोग्य सेवक हा पाया मानून संपूर्ण देशभर आरोग्य सेवा यत्रणा उभी केलेली आहे. तिथे ती यशस्वी होते, मग आपल्याकडे का होऊ नये?' मी त्याना चिनी राज्यक्रांतीची पार्श्वभूमी सांगायला लागलो, तर त्यांनी भरतवाक्यच म्हणायला सुरुवात केली. 'भारतात सुद्धा चीनप्रमाणे सांस्कृतिक क्राती करून सगळा भारत मुळापासून ढवळून काढला पाहिजे. त्याशिवाय विधायक कार्याला होणारा हा राजकीय विरोध थाबणार नाही.' विधायक कार्य करायला निघालेले डॉ. अँटिया एकदम सास्कृतिक राज्यक्रातीपर्यंत पोचतात, हे त्यांना आलेल्या आत्यतिक वैफल्याच निदर्शक आहे. विधायक कार्यात आलेल्या अशा अपयशानं खचून 'सगळ मोडून तोडून फेकून दिलं पाहिजे.' असा आततायी विचार करायचा नसतो, हाही या प्रकल्पाचा एक धडाच आहे.

१७) माडवा प्रकल्पाच्यामागे एन्. पी. गोदरेजसारखे उद्योगपती उभे असल्याने या प्रकल्पाला आर्थिक समस्या कधी जाणवलीच नाही. वेळोवेळी अनेक इतर खाजगी सस्थानी प्रतिष्ठानानी आणि सरकारनेसुद्धा या कार्यात सढळ हाताने मदत केली. एवढा भरपूर पैसा उपलब्ध असूनसुद्धा हा प्रकल्प शेवटी बद करावा लागला. म्हणजेच केवळ पैसा भरपूर असून चालत नाही. त्यासाठी निराळ्याच गोष्टी लागतात, हाही एक मोठ्ठा धडा घ्यायचा आहे.

१८) या प्रकल्पात डॉक्टर, इंजिनियर आणि व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ते सामील झाले होते. पण १-२ अपवाद वगळता, बाकी कोणालाही अडचणीवर मात करता आली नाही. यातून असा अर्थ निघतो की, आपण जे मोठमोठया सस्था, कॉलिजे वगैरे काढून शिक्षण देतो, ते प्रत्यक्ष समाजाला उपयोग होण्याचे दृष्टीने कुचकामी आहे. उदा. वैद्यकीय कॉलेजेसमधे ज्या रोगाच्या उपचाराच शिक्षण देण्यावर भर दिला जातो (उदा हृदयविकार, मधुमेह इ) त्या ज्ञानाचा प्रत्यक्ष समाजाला फार थोडा उपयोग आहे. लोकांना प्रेरणा देऊन त्यांना लोकशिक्षण देण्याच शिक्षण वैद्यकीय कॉलेजमधे मिळत नाही, अन् त्याच्या अभावी व्यवहारात तुमच्या ज्ञानाला किंमत नाही. समुचित तत्रज्ञानाच खास शिक्षण घेतलेला इंजिनियर सुद्धा कुचकामी ठरला. आपल्या संपूर्ण शिक्षणपद्धतीच्या मर्मावरच यामुळं बोट ठेवलं गेलं आहे

अशा रीतीने मांडवा प्रकल्पाच्या प्रयोगातून हजारो गोष्टी शिकता येतील. भारताची सहावी व सातवी पचवार्षिक योजना आखताना डॉ. अँटिया याच्या 'सामाजिक आरोग्य संशोधन प्रतिष्ठान' या सस्थेची मदत घेतली गेली त्यामुळे तर संस्थेच्या अशा प्रयोगाच्या मूल्यमापनाच महत्त्व प्रचंड आहे. इथे झालेले प्रयोग देशभर लागू केले तर, चुकाही सहस्र पटीने मोठ्या होतील. म्हणून हा प्रपंच. □






# मृत्यूपत्र

मूळ लेखक : फ्रेडरिक फोरसिथ । अनुवाद : रघुवीर मुळे

**जी**वनातल्या कोणत्याही समस्येला घिसाडघाईने तोंड देण्याचे तिमोथी हॅन्सनच्या स्वभावातच नव्हते. कोणत्याही प्रश्नाचा सर्वच बाजूंनी शांतपणे विचार करून त्याची उकल करणेच त्याच्या रक्तात! आणि म्हणूनच उत्तरायुष्यापर्यंत यशस्वी उद्योगपती आणि एक श्रीमंत धनिक अशी आपली कीर्ती तो टिकवून होता.

प्रकृतीच्या नियमित तपासणीसाठी डॉक्टरांनी त्याला आजची तारीख दिली होती. लंडनच्या मध्यवस्तीत डेव्हॉनशायर स्ट्रीटवर दवाखान्यात आला, तेव्हा तो उत्तेजित होता. एप्रिल महिन्याच्या सुंदरशा सकाळी वाहाणाऱ्या मंद झुळुकांचा हा परिणाम. त्याची अन् डॉक्टरांची चांगली गट्टी असल्याने आल्या आल्या डॉक्टरांच्या केबिनचा दरवाजा ढकलून तो आत गेला. डॉक्टरांनी त्याला तपासले आणि म्हणाले,

'तिमोथी, पेशंटला त्याच्या प्रकृतीबाबत कटू सत्य सांगण्याची माझ्या आयुष्यातली फक्त तिसरी वेळ' क्ष–किरण फोटो आणि टाईप केलेल्या अहवालाच्या कागदाचे पाकीट त्यांनी पुढे केले. 'डॉक्टरांवर ती पाळी यावी हा एक भयानक अनुभव असतो.'

हॅन्सनला डॉक्टरांच्या शब्दांवर आणि अहवालावर विश्वास ठेवण्याशिवाय गत्यंतरच नव्हते.

'तू धीराचा माणूस आहे, म्हणूनच मी धारिष्टच करू शकलो. खरं तर काही गोष्टी तुझ्यापासून दडवून ठेवण्याचा मला बऱ्याचदा मोहही झाला होता.'

हॅन्सनने डॉक्टरांचे आभार मानले अन् त्यांचा निरोप घेऊन तो निघाला दरवाजापर्यंत त्याला पोचविण्यासाठी म्हणून डॉक्टर उठले. त्याच्या खांद्यावर मित्रप्रेमाने थोपटीत ते म्हणाले, 'तुझी तब्येत...पण तसं काही असलं तर मला केव्हाही फोन कर...' डॉक्टरांचा हात हातात घेत तो मंद हसला. त्याच्या दृष्टीने आता एवढंच पुरेसं होतं.

रस्ता ओलांडताना त्याचं लक्ष ऊंच टाचांच्या चपला घालून मोठ्या ऐटीने येणाऱ्या मुलीकडे गेलं. तिच्याकडे पाहून त्यानं स्मित केलं. हा अनोळखी इसम मागे कधी भेटला असावा, असा विचार करून तिनंही प्रतिसाद दिला. तिमोथीचा ड्रॉयव्हर आलिशान रोल्सरॉईसमध्ये बसूनच होता. बॅकमिररमधून त्यानं पाहिलं; पण आपण त्या गावचेही नाहीत अशारीतीनं नजर फिरवली.

हॅन्सन गाडीजवळ येताच ड्रायव्हर रिचर्डस् खाली उतरला. मागचा दरवाजा अदबीनं उघडला. आतल्या उष्णतेनं तिमोथीला हुशारी आली. कोट काढून नीट घडी घालून त्यानं तो शेजारीच सीटवर ठेवला, रेलून बसला.

'साहेब, गाडी ऑफिसला घ्यायची?' रिचर्ड.

'केंट' हॅन्सन. गाडी सुरू झाली,

'साहेब, काय म्हणाले डॉक्टर?'

'तसं काही विशेष नाही, फक्त छातीत थोडीशी धडधड वाढली होती.'

'खरं तर त्याच्या हृदयक्रियेत काहीच बिघाड नव्हता. त्याअर्थी तो पूर्णपुरुषच; पण ड्रायव्हरशी यापेक्षा अधिक चर्चा करायला नको असा विचार करून तो गप्प बसला. गाडी एव्हाना पिकॅडली सर्कस या गजबजलेल्या चौकात आली.

गाडीच्या छताकडे पाहात तिमोथी स्वतःशीच म्हणाला, 'आजपासून फक्त सहाच महिन्याचा जीवनानंद अं? ठीक आहे. दोन्ही पाय मोडल्यावर तेवढेच दिवस दवाखान्यात नाही तर एखाद्या गुन्ह्यासाठी तुरुंगात खितपत पडण्यापेक्षा हे किती तरी पटीनं चागलंच नाही का? शेवटचा महिना तर दवाखान्यात काढावाच लागणार आहे. बघू या. रोज नवनवे शोध तर लागतच आहेत. एखादं चागल औषध बाजारात येऊन चमत्कारही घडू शकेल.' थेम्स नदीच्या काठाकाठानं गाडी पुढे झेपावत होती तशी त्याच्या विचारचक्रांची गतीही. पूर्वायुष्यातील एक एक प्रसग तो आठवू लागला.

'धंद्यात एकेक पायरी वर चढत जाताना आपण कोणीच भागीदार घेतला नाही. मिळविलेल्या पैशात आणि यशात ना कोणाचा वाटा की आशीर्वाद. एवढी मालमत्ता भरभक्कम बँकअकौंट. खेरीज अवघ्या इंग्लंडला अभिमान वाटेल असा विविध नाण्याचा प्रचड सचय....'

गाडी ओल्ड केंटरोडकडे वळली. मोठ्या प्रेमानं आतरबाह्य खर्चिक सजावटीनं उभी असलेली त्याची स्वतःची 'केंटिश मनोर हाऊस' दृष्टिपथात आली आणि हॅन्सन मनोमन सुखावला. 'केंटिश मनोर हाऊस'च्या जवळ जवळ वीस एकर परिसरातली वृक्षराजी मोठी रम्य होती.

'ह्या देखण्या वास्तूच आणि अप्रतिम निसर्गसौंदर्याच आता काय होणार?' असाही एक विचार त्याच्या मनात चमकून गेला. याशिवाय 'मेफेअर हाऊस' धंदापाण्याची बोलणी कोणत्याही उची हॉटेलात करण्यापेक्षा ह्या दोनच ठिकाणी होण हॅन्सन अधिकच पसत करी....अनेक कपन्याचे शेअर्स ...*विविध बँकातली डिपॉझिट्स.*

ओल्ड केंट रोडवरून गाडी जात असताना गाडीचा वेग थोडा कमी झाला आणि गडवड ऐकली म्हणून त्याने काचेतून बाहेर डोकावल. चार 'नन्स'च्या मार्गदर्शनात लहान मुलाची राग पुढे पुढे सरकत होती. दोन नन्स पुढे आणि दोन मागे. रस्ता ओलाडताना शेवटच्या रागेतला मुलगा थांबला तो तिमोथीच्या आलिशान गाडीकडे मोठ्या कुतुहलाने बघत. मोठं गोड छोकरं होत ते. त्याच्या टोपीवर 'सेंट बी' अशी अक्षरं हॅन्सनला दिसली. गाडीच्या जवळ येताच तो छोकरा गाडीच्या दरवाजाच्या चादीच्या मुठी पाहून भलताच हरखलेला दिसला. जाता जाता त्या छोकऱ्यान एका मुठीवर आपला हात हळुवारपणे ठेवला. बद काचेवर मुलाचं नाक टेकलं तेव्हा तिमोथीनं आतूनच त्याच्यावर लाडानं टिचकी मारली. छोकरा चमकला न् पटकन् रागेत सामील होऊन निघूनही गेला. रस्ता ओलांडल्यावर मुल पुन: एकत्र झाली आणि समोरच्याच करड्या रगाच्या बसक्या बंगलीत गेली. त्या इमारतीभोवती कुपण होत. रस्ता मोकळा झाला अन् गाडीनं पुन्हा वेग घेतला. तशा हॅन्सनच्याही आठवणी....

'आपल वैवाहिक जीवन अल्पायुषी ठरलं असलं तरी ते खचितच सुखी होतं. तिला जाऊन आज दहा वर्षे होत आली. त्या दु:खाबरोबरच ती एक खत देखील मागे ठेवून गेली. आपल्याला मूलबाळ काहीच झालं नाही बऱ्याचदा दोघांनीही दत्तक घ्यायचा विचार केला; पण तो प्रत्यक्षात कधीच आला नाही. 'ती' देखील आईवडिलांची एकुलती एकच होती, खेरीज मातृपितृप्रेमाला लहानपणीच पारखी झालेली. आता आपल्याला जवळचं नातेवाईक म्हणजे फक्त बहीण. पण फक्त नात्यान. ती ना कधी आपल्याला आवडली, ना तिचा नवरा. दोघंही वेंधळे. नेहमीच अनुत्साही आणि अकार्यक्षम.'

तिमोथी हॅन्सन आपल्या बंगलीत आला. आता आपल्याला 'मृत्युपत्र' केलं पाहिजे हा विचार त्याच्या मनानं घेतला.

'पाऊड-मोगार्टी' या कायदा-सल्लागार कंपनीच्या कचेरीत पाऊल ठेवताच सेक्रेटरी म्हणाला, 'मिस्टर पाऊड तुमचीच वाट पाहात आहेत. या आत.' हॅन्सनला पाहाताच मि. पाऊड उठून उभे राहिले. त्याच्याशी हस्तादोलन करीत ते म्हणाले, 'अरे दोस्ता, किती दिवसानी भेटतोयस.' इतर अनेक धनिकामारखेच तिमोथीचेही चार विश्वासू मित्राशी सख्य होते. सॉलिसिटर, कायदा-सल्लागार, सचिव आणि डॉक्टर दोघेही बसले.

'काय करू बाबा, तुझ्यासाठी, बोल' —पाऊड

'तुझाच सारखा धोशा होता ना माझ्यामागं, मृत्युपत्र कर म्हणून.'

'मग? बरोबरच आहे ते. दूरदृष्टीच्या माणसांनी ते वेळीच करून ठेवणं चागलं असतं.'

हॅन्सनन आपल्या बॅगेतून सीलबंद केलेला एक मोठा लखोटा काढून पाऊंडच्या हातात देत म्हटलं, 'घे तर मग हे.'

'तिमोथी, तुझ्यासारख्या कुबेराचं मृत्यूपत्र... म्हणजे सगळ्याच बाबीचा समावेश.'

'झालाय अरे एका ख्यातनाम वकिलानेच केलंय ते. माझ्यासह साक्षीदारांच्या सह्याही आहेत त्यावर. कसलीही त्रुटी नाही. सगळं कस स्पष्ट आणि स्वच्छ आहे'

'छान.'

'तुला कदाचित वाईट वाटेल तुझ्या फर्मकडून ते मी केलं नाही म्हणून पण त्याला तशी कारणंही आहेत राग मानू नकोस. पण आत्ता हा लखोटा उघडायचा नाही मात्र.'

'असू दे रे! मी अन् तुझ्यावर रागावेन? हे माझ्याच कस्टडीत ठेवायचं ना?'

'हो. पण एक महत्वाची गोष्ट. या मृत्युपत्राचा तूच एक्झिक्युटर आहेस. त्याच्या कार्यवाहीत तुला काही शारीरिक वा मानसिक त्रास होईल असं काहीच नाही. तेव्हा'

मिस्टर पाऊडनं लखोटा हातात घेत त्याचं वजन अजमावलं मृत्यूपत्र आणि एव्हढं जड कस? असाही एक विचार त्याच्या मनात येवून गेला

'ठीक आहे. शब्द देतो. इतकी वर्षं माझाच आग्रह होता त्याच्यासाठी. असू दे. पण आज तू भाठा खुषीत दिसतोयस?'

मग थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा मारून हॅन्सन बाहेर पडला तेव्हा 'मे'चं उन्हं चकाकत होती.

*सप्टेंबरच्या मध्यतरापर्यंत तिमोथी हॅन्सन* हा आपल्या कामधद्यात नेहमीप्रमाणेच गर्क होता. त्याचे परदेशदौरेही चालूच होते. आपल्या व्यापक उलाढालीची निरवानिरव न करता काही माणस अचानक या जगाचा निरोप घेतात. अन मग मागे खूप गुतागुत होते जे आपण आज केलं ते ठीकच झालं असही त्याला वाटल.

पधरा सप्टेंबरला रिचर्ड-ड्रायव्हरला बंगल्यावर ये म्हणून त्यान आधीच बजावून

ठेवलं होतं. रिचर्ड आणि त्याच्या बायकोनं गेली काही वर्षं तिमोथीला अगदी प्राणापलिकडे जपल होतं. हॅन्सन आपल्या ग्रंथालयात बसला होता. रिचर्डला पाहून हॅन्सन म्हणाला,

'रिचर्ड तुझ्यासाठी म्हणून सांगतो. कोणाशी एका अक्षरानही हे कुठं बोलू नकोस. वर्षअखेर मी सगळ्या व्यापातून मुक्त होणार आहे.'

रिचर्डला हा धक्काच होता. तो शांतपणे उभा होता. 'एवढंच नाही तर मी लडनही सोडून जाणार आहे. कुठं तरी शांत ठिकाणी आता उरलेल आयुष्य व्यतीत करण्याची माझी इच्छा आहे.'

म्हणजे मालकांनी आपल्याला तीन महिने आधी सांगितलं ते, बरंच झालं. दरम्यान दुसरीकडे कुठ नोकरीचं तरी पाहाता येईल. अन्यत्र लगोलग नोकरी मिळणं अवघड. असा विचार रिचर्डसच्या मनात आला. तिमोथीनं बॅग उघडली अन् एक जाडजूड लखोटा रिचर्डसच्या हातात देत म्हणाला,

'मला दुःख होतय. मी गेल्यानंतर ह्या केंट मनॅार हाऊसमधली जागा कदाचित तुला सोडावी लागेल. मिसेस रिचर्डस्‌ना तर ही कल्पनाही सहन होणार नाही, पण नव्या मालकाची काय इच्छा, असेल ते मी कसं आज सागणार ?'

'बरोबर आहे, साहेब.'

'तू इथंच रहावं असं मला वाटत, पण इलाज नाही. या गोष्टी बोलायच्या नाहीत बाहेर. दरम्यान तू कुठं तरी नोकरी शोध. एक नोव्हेंबर ही शेवटची तारीख. समजल?'

हातातला भला मोठा लखोटा साभाळीत रिचर्ड म्हणाला, 'जशी आपली इच्छा. मी याबाबत काहीच कुठं नाही बोलायचा !'

'गेली बारा वर्षे तू आणि मिसेस रिचर्डसनं मला साभाळलं त्याची ही छोटीशी भेट समज. मी गेल्यावर कदाचित सहा-सात महिने तुला नोकरी मिळणारही नाही. म्हणून त्याची ही बेगमी समज पाहिजे तर. त्यात दहा हजार पौंड आहेत.'

'आभारी आहे, साहेब' रिचर्ड गहिवरून बोलला.

'अं. हं. नीट ऐकून घे. त्या नोटा मी कशा आणि कुठं लपविल्यात हे शोधणं सोपं नाही. ही रक्कम बँकेत ठेवायची नाही. नाहीतर कर-अधिकाऱ्यांची झागटी तुझ्या माग लागतील. हळूहळू खर्च कर. कोणाच्याही डोळ्यावर येणार नाही अशा पद्धतीनं.'

'साहेब, आम्ही तुमचे उपकार आयुष्यात विसरणार नाही.'

रिचर्ड बाहेर येऊन रोल्सराइस प्रेमानं साफ करू लागला. थोड्याच दिवसात ही अलिशान गाडी, उमदा मालक आणि सुसज्ज क्वार्टरला आपण दुरावणार या विचारानं त्याचे डोळे डबडबले.

•

एक ऑक्टोबर ! तिमोथी हॅन्सन कपडे करून दिवाणखान्यात आला. मिसेस रिचर्डस् त्याच्या नाष्ट्याचीच तयारी करीत होती. रात्री त्यानं किती तरी गोळ्या घेतल्या; पण पोटदुखी काही थांबली नव्हती. अवघी रात्र त्यान मरणप्राय वेदना सहन करीत तळमळून काढली आता सगळं संपलं हे त्यानं ओळखलं, पण तसं चेहऱ्यावर काहीच नव्हतं. रिचर्डच्या क्वार्टरमधील फोनचं बटन त्यानं दाबल. मला सकाळचा नाष्टा नको म्हणून त्यानं निरोप दिला आणि अर्ध्या तासानं ग्रथालयात ये, असं तिमोथीनं रिचर्डला बजावलं. सोबत मार्टिन पाऊडला घेऊन.

शांतपणे तो कपाटाजवळ गेला. रिव्हॉल्वर काढल. त्यात दोन गोळ्या टाकल्या आणि खुर्चीत येऊन बसला. आपल्या अमोल नाणी आणि ग्रथसग्रहालयावर अखेरची नजर टाकली. खोल श्वास घेतला आणि रिव्हॉल्वरची नळी छातीवर उलटी धरून त्यान क्षणार्धात चाप दाबला.

मार्टिन पाऊंड आपल्या सुसज्ज कार्यालयात येऊन बसला. टेबलासमोर तिमोथी हॅन्सनची बहिण सौ. आर्मिटेज, तिचे यजमान व मुलगा असे बसले होते. श्री. आणि सौ. आर्मिटेज याच्या अगावर सुतकाचे काळे कपडे होते. त्याच्या मुलाच्या 'तारकीन'च्या चेहऱ्यावर उत्सुकता शिगोशिग भरली होती. नाकावरचा चष्मा व्यवस्थित ठेवीत त्या तिघाना उद्देशून मार्टिन पाऊड म्हणाले,

'स्वर्गीय तिमोथी हॅन्सनन त्याच्या मृत्युपत्राच्या अमलबजावणीचं काम माझ्यावर सोपवलं आहे. खरं तर साधारणपणे त्याच्या मृत्यूची बातमी कळताच पुढे काय व्यवस्था करावी यासाठी मी ते त्वरित उघडायला हवं होतं.'

'म्हणजे ते मृत्युपत्र तुमच्यामार्फत नाही ?' आर्मिटेज.

'नाही.'

'याचा अर्थ त्याच्यातला मजकूर तुम्हाला ठाऊक नाही.' तारकीन.

'अर्थातच नाही. त्यानं मृत्यूपूर्वी ग्रंथालयात जे पत्र लिहून ठेवलं तेव्हा काही गोष्टी कळल्या.'

'ठीक आहे, आता उघडा तर मग' तारकीन उतावळेपणाने म्हणाला.

काहीही न बोलता मि. पाऊड त्याच्याकडे पाहात असतानाच तारकीनची आई म्हणाली,

'तू गप्प बस पाहू.'

'खरं तर तिमोथी हॅन्सननं आत्महत्या केली; पण त्याला कर्करोगानंच मृत्यू अटळ होता. कर्कव्याधीची ही अखेरची अवस्था होती हे त्याला एप्रिलमध्येच कळलं होत'— पाऊड

'अरेरे'— मिसेस आर्मिटेज.

'ते पत्र मी लगोलग केंटच्या कॉरोनरकडे दिलं. त्यामुळे पोस्टमॉर्टेम, पंचनामा वगैरे गोष्टी निर्वेध पार पडल्या. तिमोथीनं त्याच्यावरच्या अत्यसंस्कारासाठी पंधरा दिवसांची मुदत पत्रात नमूद केली आहे. कॉरोनरचे सोपस्कार आटोपल्याशिवाय मृत्युपत्राचा लखोटा उघडू नये असं पत्रात म्हटले आहे. लखोटा आपल्या निकटवर्तीयाच्या समोरच उघडून वाचला जावा अशी तिमोथीची इच्छा.'

'तिमोथीचे निकटवर्ती तर आम्ही तिघेच आहोत' —सौ. आर्मिटेज.

'बरोबर'—पाऊंड.

'मग त्याच्या इस्टेटीचे वारसदारही आम्हीच ना ?' श्री. आर्मिटेज.

'ते मी आत्ताच कस सांगणार ? फक्त मृत्युपत्र तुमच्यासमोर उघडलं जावं असा पत्रात मजकूर होता. या लखोट्यातला मजकूर काही मला ठाऊक नाही.'

'वा ! काय विनोद आहे !' सौ. आर्मिटेज.

'ठीक आहे. आता आपण सुरुवात करू.' —पाऊड.

हातात छोटीशी सुरी घेऊन पाऊडनं

हलकेच लखोटा उघडला. त्याच्या आतही एक सुबकपणे टाईप केलेले पाकीट निघाले. आतून कागद काढून पाऊंड वाचू लागला आणि तिघानीही कान टवकारले.

'...हे माझं अखेरचं इच्छापत्र. मी टिमोथी हॅन्सन ..वय ...पत्ता...'

'ते आम्हाला सगळं माहित आहे. अनावश्यक भाग टाळावा मी म्हणते.' सौ. आर्मिटेज.

त्यांच्याकडे एक कटाक्ष टाकून पाऊंडनं सुरुवात केली. 'माझ्या या मृत्युपत्राची कार्यवाही इंग्लिश कायद्यानेच व्हावी (२) या आधीची माझी इच्छापत्रे असल्यास या पत्रान्वये ती आपोआपच रद्द झाली असं समजावं. (३) या इच्छापत्राची कार्यवाही माझे मित्र आणि पाऊंड-गोगार्टी या कायदा सल्लागार कपनीचे भागीदार मिस्टर पाऊंड हे करतील. (४) याच सोबत एक पाकीट आहे. त्या पाकिटात माझ्यावरचे अन्यसंस्कार आणि मृत्युपत्राच्या कार्यवाहीसाठी लागेल एव्हढी रक्कम ठेवलेली आहे. समजा त्यातून काही पैसे शिल्लक राहिले तर ती रक्कम मि. पाऊंड यानी त्याना वाटेल त्या शैक्षणिक वा धर्मादाय संस्थेला देणगी म्हणून द्यावी.'

दुसरे बद पाकिट मिस्टर पाऊंड ह्यानी फोडले. त्यात वीस पौंडाच्या अशा एकूण पाच हजार पौंडाच्या कोऱ्या करकरीत नोटा होत्या पाऊंड याच्या कचेरीत निरव शातता होती. छोटा तारकिन आर्मिटेज, पाऊंड नोटा मोजत असताना आशाळभूतपणे त्याकडे पाहात होता. नोटाचे बडल मोजून झाल्यावर त्यानी ते बाजूला ठेवले व पुन मृत्युपत्राकडे वळले.

'...(५) माझे मित्र आणि ह्या पत्राचे कार्यवाहक मि. पाऊंड माझ्यावरचे अंत्यसंस्कार आटोपल्यावरच मृत्युपत्रान्वये कार्यवाही करतील.' थोडा वेळ हातातली फाईल बाजूला ठेवून आर्मिटेज कुटुबियाना उद्देशून पाऊंड म्हणाले, 'खरं तर टिमोथीच्या मृत्युपत्राचा कार्यवाहक मी आहे, हे समजल्यावर त्याच्या उद्योगव्यवसायाच्या ठिकाणी मी प्रत्यक्ष जायला पाहिजे. कुठे काही गडबड व्हायला नको म्हणून. पण त्याचा पसारा इतका मोठा आहे की, लगोलग सगळ्या बाबी उरकणे कठीणच. पण आता स्वर्गीय टिमोथीच्या इच्छेचा अवमान आपण करणं शक्य नाही. अंत्यसंस्कार आटोपल्याशिवाय मी काही हालचाल करू शकणार नाही.'

'ते ठीक आहे, पण दरम्यानच काही हेराफेरी झालीच तर?' मि. आर्मिटेज म्हणाले.

'मला तसं वाटत नाही. टिमोथीनं व्यवसायात जे काही मिळवलं त्यात विश्वासू सहकारी ही फार मोठी मिळकत आहे हे मला ठाऊक आहे.'

'पण तरीही' सौ. आर्मिटेज काळजीच्या सुरात उद्गारल्या.

'मी काहीच करू शकत नाही. अंत्यसस्कार आटोपल्याखेरीज.' पाऊंड निर्विकारपणे म्हणाले.

'मग ते तरी एकदाचे लवकर उरकू.'

'ठीक आहे' म्हणत पाऊंड पुनः मृत्युपत्राकडे वळले.

...(६) मी...' आणि पाऊंड ह्यांनी पुढच्या मजकुरावरून धावती नजर फिरवली. तो त्यांना मोठ्याने वाचवेना पण ते जबाबदारी कशी टाळणार? आवढा गिळून त्यांनी सुरुवात केली. 'उर्वरित मालमत्ता मी माझी प्रिय बहिण सौ. आर्मिटेज हिला अर्पण करीत आहे. जेणेकरून तिचा छोटा ससार, तिचे पती आणि छोट्या तारकिनसह सुखाचा होवो. पण त्यासाठी आर्मिटेज कुटुबियाना मात्र पुढच्या कलमाची कार्यवाही करावी लागेल.

सर्वत्र औत्सुक्यपूर्ण शातता पसरलेली. मनातून अतिशय खूष झालेल्या सौ. आर्मिटेज खोटे खोटे अश्रू आपल्या छोट्या रुमालाने पुसू लागल्या.

बाईंनी आपल्या यजमानाकडे आणि वकिलाकडे पाहून विचारलं, 'किती असावी मालमत्ता टिमोथीची?'

'मी कसं आत्ताच सांगणार?' पाऊड

'तुम्ही अंदाज तरी सागाल की नाही.' तारकीन उतावळेपणाने म्हणाला, 'आणि त्यातली आम्हाला किती मिळेल?'

'जवळजवळ सगळीच. पण ते खात्रीनं मी तरी कसं सागू, कितीची इस्टेट आहे ते. कारण मी अद्यापी काहीच चौकशी केलेली नाही.'—पाऊड

'तरीही.'

'पचवीस ते तीस लाख पौंडाच्या जवळपास.'

'झक् मारत गेले ते पैसे! अहो, त्यावर करच पच्याहत्तर टक्क्याच्या जवळपास भरावा लागेल हो' श्री. आर्मिटेज.

'नाही. त्यापेक्षाही जास्तीच' पाऊड.

'हू, तर आपण वाचन पुढे सुरू करू या. परिच्छेद क्रमांक (७)...कधीतरी एखादे दिवशी मी या मातीत विलीन होणारच आहे याची मला पूर्णपणे कल्पना आहे आणि म्हणूनच मी माझी विशिष्ट शवपेटी बेनेट अँड गेन्स ह्या कपनीकडून करवून घेतली आहे. कोणीतरी माझे शव खड्ड्यात टाकून त्यावर माती ढकलावी ही कल्पनाच मला सहन होत नाही आणि म्हणूनच माझं दफन विशाल सागरात केलं जावं, अशी माझी इच्छा आहे. समुद्रात तेही विशेष करून डेव्हान बंदरापासून वीस मैल आत. जिथं मी सागरावर अधिकारी म्हणून काम केलेले आहे. माझी शवपेटी माझी बहीण, तिचे यजमान आणि छोटा तारकीन ह्यानी ती समुद्रात खोलवर नेऊन ढकलून द्यावी अशी माझी इच्छा आहे आणि तेच नेमके पार पडते की नाही, पाहण्याची जबाबदारी या मृत्यूपत्राचे कार्यवाहक म्हणून व मित्र म्हणून श्री पाऊंड ह्याच्यावरच आहे.

या वाक्यान पाऊड दचकले. आपल्या मित्रानं हे भलतच धर्मसकट आपल्यावर टाकलंय म्हणून त्याना काळजी तर वाटलीच, पण त्याच्या कल्पनाशक्तीवर ते भलतेच खूष झाले. चेहेऱ्यावर मात्र कोणतेही भाव न दाखविता श्री. पाऊड म्हणाले,

'मिसेस आर्मिटेज, सहज म्हणून विचारतो. आपल्या लाडक्या भावाची ही शेवटची इच्छा करणार ना तुम्ही पूर्ण?'

'मूर्खपणाच आहे हा त्याचा अहो, दफन आणि तेही भर समुद्रात? कायद्यात तरी हा प्रकार बसतो काय?'

'हा प्रकार लोकविलक्षण आहे खरा, पण बेकायदेशीर आहे असे नाही म्हणता येणार.'

'किती खर्च येईल?' —तारकीन.

पाच हजार पौंडाच्या थप्पीवर हात ठेवीत श्री. पाऊड म्हणाले, आपली काही हरकत?

'काही नाही. पण अखेरी ही सगळी धन भलत्याचीच ना.'—श्री. आर्मिटेज.

'कठीण आहे. पण अशक्यतरच नाही.' सौ. आर्मिटेज.

'ठीक आहे लवकरात लवकर हा प्रकार उरकू या.' श्री. आर्मिटेज.

'आता तुम्ही तिघेही या मृत्यूपत्राच्या प्रत्येक पानावर सह्या करा. दरम्यान मी तुमच्याशी संपर्क साधेनच' असं म्हणून पाऊंडनं मृत्यूपत्र त्यांच्यासमोर सरकवलं.

ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्याची सुरुवात कडाक्याची थंडी पडलेली आणि समुद्रदेखील खवळलेला. अशावेळी हे अघटित दफन म्हणजे गोष्ट जरा अवघडच होती. श्री. पाऊंड तर डेव्हान बंदरापासून आत वीस मैल जायला तयार नव्हताच; पण कोणीही मचवेवालाही ती जबाबदारी, नसती भानगड नको म्हणून जबाबदारी घ्यायला तयार नव्हता. अखेरी खूप समजावल्यानंतर एक मचवेवाला त्याच्या तीन साथीदारांसह तयार झाला. ह्यात काही बेकायदेशीर नाही असं पटवून दिल्यावर.

जवळजवळ अर्ध्या टनापेक्षा जास्ती वजनाची शवपेटी सर्वांनी मोठ्या कष्टानंच मचव्यावर चढवली. एवढं प्रचंड वजन शवपेटीचं? प्रत्येकजण एकमेकाकडे कुतुहलानं पहात होता पण त्याचं उत्तर मात्र कोणाकडेच नव्हतं. छोटा तारकीन आर्मिटेज आणि वकील पाऊंड मात्र धक्क्यावरच थांबले. सौ. आर्मिटेज म्हणाल्या 'वीस मैल आत.'

'एवढं?' म्हणत नाविकानं नकाशा बाहेर काढला.

'तुला कळेल ना?'—श्री आर्मिटेज.

'हो. चला' म्हणून सगळेच निघाले. मचव्यात नाविकाबरोबरच त्याचा भाऊ आणि पुतण्याही होता. त्याच पिढ्यानपिढ्या आयुष्यच समुद्रावर गेलं होतं. अगदी यांत्रिकपणे त्यानं इंजिन सुरू केलं. दफनविधीचं साहित्य बरोबर होतच. 'तिथ पोचायला तासभर तरी लागेल.' असं नावाडी म्हणाला.

विशिष्ट ठिकाणी पडाव स्थिर झाला खरा; पण शवपेटी त्या पाचही जणांनी प्रयत्न करूनही समुद्रात ढकलली जाईना. बाहेर काढता काढता नावच कलंडून तिच्या वजनाने सगळ्यांनाच जलसमाधी मिळते की काय अशी पाळी यायची. आकाशात ढगही दाटून आले होते आणि वाऱ्याचा वेगही वाढला होता. थंडीनं तर सगळेच कुडकुडत होते. अखेरी धामाधुम होत त्या तिमोथी हॅन्सनच्या शवपेटीन समुद्रतळाकडे झेप घेतली. इकडे धक्क्यावर पाद्री आपले सोपस्कार उरकत होता.

'हे नाटक म्हणजे अतीच झालं; मि. पाऊंड. आता तुम्ही लवकरात लवकर प्रोबेट दाखल करायची तयारी करा न् इस्टेटीच्या हिशेबाच्या व्यवस्थेला लागा बुवा' सौ. आर्मिटेजचा आता धीरच सुटला होता. 'ठीक आहे. काय काय झालं ते मी तुम्हाला कळवीनच' असं म्हणून तो रेल्वे गाठायला गेला.

नोव्हेंबर जवळजवळ संपत आला होता. अनेक व्यापामुळे पाऊंडला आर्मिटेजशी काही संपर्क साधता आला नाही. अखेरीस आर्मिटेज कुटुंबीयच त्याच्या कचेरीत एके दिवशी दाखल झाले.

'तसं बरचसं काम आटोपत आलंय'—पाऊंड.

'काय काय झालं?'

'हॅन्सनच्या सॉलिसिटरनं सगळेच तपशील दिले. त्यानुसार सगळं तपासूनही पाहुल.'

'माझ्या माहितीप्रमाणे तिमोथी हॅन्सनच्या इस्टेटीचे सात भाग पडतात. किंवा सात ठिकाणी विभागलेली आहे असं म्हटलं तर ते अधिक सयुक्तिक ठरावे. त्याच्या नाणी संचयाच्या वेडातून त्यानं लंडनमधली नाणी वितरण पेढी नव्यानेच विकत घेतली होती.

'या पेढीची किंमत किती असावी?'

'बारा लाख पाच हजार पौंड.'

छोट्या तारकीननं हलकेच शीळ घातली.

'पण तुम्ही हा आकडा निश्चितपणे कोणत्या आधारावर सांगता.'—श्री. आर्मिटेज.

'कारण म्हणजे, तिमोथीनं तेवढ्याच रकमेला ती पेढी विकून टाकली आहे.'

'काय?' सौ. आर्मिटेज जवळजवळ किंचाळल्याच.

'होय. मरण्यापूर्वी तीनच महिने त्याने एका श्रीमंत डच व्यापाऱ्याला ही पेढी विकली. बऱ्याच दिवसापासून तशी त्याची बोलणीही चालू असावी.'

'पण तो तर, मरण्याच्या आदल्यादिवसापर्यंत त्या पेढीच्या कचेरीत काम करीत होता. हा विक्रीचा व्यवहार कोणा कोणाला माहीत आहे अजून?'

'कोणालाही नाही. तो व्यापारी आणि तिमोथीखेरीज. अगदी तिथं काम करणाऱ्या नोकराना, व्यवस्थापकाना देखील. खरेदीखत लिहिणाऱ्या वकिलाकडे चौकशी केली. खरेदीखतातील मजकुराबद्दल मी सांगू शकतो त्या दोघाचे खाजगीत काय ठरले होते याची मला काहीच कल्पना नाही असं तो म्हणाला. खरं तर तिथ पेढीत जे पाच नोकर आहेत त्यांना नव्या मालकान यापुढेही कामावर ठेवायचे आणि हॅन्सनच्या मृत्युपर्यंत त्यानच कारभार पहायचा असा करार तोंडी झाला असावा असं मानायला जागा आहे.'—पाऊंड

'तुमची भेट झाली त्या माणसाशी?'

'होय. डी. जोग. ते ॲमस्टरडॅमला असतात. अतिशय सधन माणूस. मी चर्चा केली. सगळे कागदपत्रही त्यानं खुल्या मनानं दाखवले. कुठही संशयाला जागा नाही, की काही बेकायदेशीरही नाही.'

'मग हॅन्सननं एवढ्या पैशाचं केलं तरी काय?' आर्मिटेज.

'ती रक्कम त्यानं बँकेत ठेवली.' पाऊंड

'छान. मग काही प्रश्नच नाही.' तारकीन

'केंट मनोर हाऊस ही दुसरी इस्टेट. तो बंगला आणि सभोवतालचा वीस एकराचा विस्तीर्ण परिसर. ही मालमत्ता तिमोथीनं गेल्या जूनमध्ये गहाण टाकली आणि त्यावर ९९। टक्के रक्कम उचलली. गहाण रकमेच्या परतफेडीचे त्रैमासिक हप्ते ठरले होते. एक हप्ता तिमोथीनं मरणापूर्वी भरलाही होता. आता ती इमारत अटीनुसार पतपेढीच्या ताब्यात गेली आहे. तेही बेकादेशीर म्हणता येत नाही.'

'मनोर हाऊस गहाण ठेऊन किती पैसे काढले तिमोथीनं?'—आर्मिटेज

'दोन लाख दहा हजार पौंड'

'ह्या रकमेचं...?'

'तीही त्यानं बँकेतच ठेवली.'

'खेरीज 'मेफेअर हाऊस' हा बंगला देखील तिमोथीनं दीड लाख पौंडाला विकला न् पैसे बँकेतच ठेवले.'

'पुढ असं की त्याचा जो खाजगी नाणी संग्रह होता तो त्यानं वेगवेगळ्या इच्छुकांना पाच लाख पौंडाला विकला. ते कागदपत्र त्याच्याच ग्रंथालयात मिळाले. हरेक व्यवहार झाला की रक्कम तिमोथी बँकेत जमा करीत होता, ते त्याच्या डायरीवरून आणि बँकेच्या खात्याच्या उताऱ्यावरून स्पष्टच आहे. दलालांमार्फत त्याने शेअर्सचीही अशीच

विल्हेवाट लावली. राहता राहिली ती त्याची रोलसराईस गाडी तीही त्याने अठ्ठेचाळीस हजार पौंडाला विकून टाकली. शिवाय वेगवेगळया बँक अकौंटस्चाही मी तपास घेतला. अशा रीतीन एकूण मालमत्ता तीस लाख पौंडाची आहे'

'म्हणजे मरणापूर्वी कोणालाही न सांगता सवरता त्यान आपल्या प्रत्येक मालमत्तेची विल्हेवाट लावली आणि ती रक्कम बँकेत टाकली असं ना मिस्टर पाऊड ?' सौ. आर्मिटेज.

'आई, असं काय करते ? म्हणजे मामानी तुमची जबाबदारीच नाही का हलकी केली ?' तारकीन. पुढे म्हणाला, 'आता कर न् असल्यास कर्ज वजा जाता आमच्या हातात किती रक्कम पडेल ?'

'ते अवघड आहे' श्री. पाऊड

'का ? आम्ही त्याचे कायद्यानेच वारस आहोत ना ?' किंचित् त्राग्याने पण चिंतेच्या सुरातच सौ. आर्मिटेज उद्गारल्या.

'का म्हणजे ? ही सगळी रक्कम हॅन्सनने बँकेतून अगदी रोख काढून घेतली होती मरणापूर्वी' पाऊड.

'तीस लाख पौंडाएव्हढी रक्कम एकाच वेळी काढता येत नाही, मिस्टर पाऊंड, खातेदाराला' अविश्वासाने श्री. आर्मिटेज म्हणाले.

'तुमचं म्हणणं बरोबर आहे पण बँकेला आधी सूचना दिली तर दरवेळेस पन्नास हजार पौड वा अधिकही काढता येतात. हॅन्सनने त्याच पद्धतीने ही रक्कम उचलली'

तिघेही विस्मयानं गप्पच झाले. त्यांच्या चेहेऱ्यावर राग, दुःख, खेद, साऱ्या साऱ्या छटा स्पष्ट दिसत होत्या.

'तुम्ही दोघं जिवलग मित्र. तुम्हाला माहीतच असेल हे पैसे त्यानं कुठ ठेवल्येत ते. नसेल तर शोध घ्या' श्री. आर्मिटेज असं बोलताच श्री पाऊड खवळला.

'वाट्टेल ते बोलू नका. मला काही माहिती असायच कारण नाही आणि तसा शोध घेण्याची जबाबदारी देखील माझी नाही. यावर शांतपणे विचार करूनच मार्ग काढायला पाहिजे.'

'सॉरी तुम्ही सांगा. आम्हाला हो काय कळतं त्यातल ?' सौ. आर्मिटेज.

'सरकारला एवढ्या मोठ्या उलाढालीवर प्रचंड प्रमाणात कर भरावा लागला असता. एकदम कोणाला कायदेशीररीत्या रक्कम दिली गेलो असती तर. ही रक्कम त्याने विदेशो बँकेत जमा केली असावी, असा माझा आधीचा समज होता. आपल्याला नजिकच्या भविष्यात मृत्यू अटळ आहे हे तिमोथीला ठाऊकच होत. या परिस्थितीत आधीच गडगज असणाऱ्या बँकाना तो धनिक मग कसा करेल ? त्याचा तो स्वभावही नाही, नव्हता. ह्या रकमेतून त्यान काहीतरी मौल्यवान वस्तूची खरेदी केलो असावी असा माझा कयास आहे. किंवा दुसरी काही मालमत्ता महसूल खात्याच्या अधिकाऱ्याना हा तपशील कळवून त्यांच्यामार्फतच चोकशी, शोध घ्यावा लागेल.'

'मग आता पुढे काय ?' आर्मिटेज.

'मी लंडनमधल्या सगळ्याच बँकांकडे चौकशी केली. त्यांच्याकडे कॉम्प्युटर सेवा असल्याने तिमोथी हॅन्सन नावाच्या इसमाची आपल्याकडे कोणत्याही प्रकारची ठेव वा खाते नाही अशो उत्तरे आलीत. प्रमुख दैनिकातूनही आवाहन केले पण प्रतिसाद शून्यच तिमोथीचा विश्वासू ड्रायव्हर-रिचर्डस् आता साऊथ वेल्समध्ये राहतो. त्याला भेटलो. त्यालाहो काहीच माहिती नाही. मग आता मी काय करावं अशो तुमची इच्छा आहे ?' पाऊड

कोणीच काही बोलेना. तिघेही स्तब्धच होते मनातल्या मनात मि. पाऊड म्हणाले, 'दोस्ता, अरे केलस तरी काय तू एवढ्या रकमेच ? तुझा स्वभाव मला माहीत आहे. महसूल अधिकाऱ्याच्या भीतीनं तू काही केलं नसणार. कारण तुला भीती हा शब्दच माहीत नव्हता तू कुठही पैसा दडवला असतास तरी आज ना उद्या ते त्याचा शोध घेणार याची तुला कल्पना नसावी ? त्याना घाई अशी काहीच नसते. मग तो पैसा देशात असो की बाहेर !'

'मिस्टर पाऊंड, आपणच पुढाकार घ्या ना त्या रकमेच्या शोधात.' श्री. आर्मिटेज कळवळून म्हणाले.

'शोध घ्या म्हणजे काय करू ? माझ्याच्याने जेव्हढे प्रयत्न करण शक्य होत तेव्हढे मी केले. तो काही माझा व्यवसाय नाहो. सगळा वेळ मला याच कामात देवून कसं चालेल ?'

'मग तुमचा काय विचार आहे ?'

'जे घडल ते महसूल खात्याला कळवावं अन् शोधाची जबाबदारी त्यांच्यावरच सोपवावी.'

'ते शोध घेतीलच. कारण कराच्या रुपानं त्याचाही फायदाच नाही का ?' सौ. आर्मिटेज.

'खात्रीनं ?'–पाऊंड

'किती दिवस लागतील त्यांना ?'

'झाल तर एका महिन्यात, नाही तर वर्षानुवर्ष. काहीही सागता येत नाही. त्यांना कसली घाई ?' पाऊंड

'पण आम्हो नाही थाबू शकत एव्हढे दिवस, त्याचं काय ?' सौ. आर्मिटेज

'मग हे काम खाजगी गुप्तहेराकडेच सोपवू.' तारकिन म्हणाला.

'मिस्टर पाऊड, तारकीनची कल्पना कशी काय वाटते तुम्हाला ?' आर्मिटेज.

'चागली आहे, पण खाजगी डिटेक्टिव्हपेक्षा प्रायव्हेट एन्क्वायरी एजट म्हणू. मागे एका प्रकरणात मी त्याची मदत घेतलीही होती. असाच एका मृत्यूपत्रासबंधी. मोठी इस्टेट मागे सोडून गेलेल्या माझ्या अशिलाच्या वारसाच्या शोधासाठी. गमत म्हणजे तेव्हा इस्टेट होती तर वारस नव्हते आज वारस आहेत आणि इस्टेटच गायब आहे ..' पाऊड

'सागा. बोलवा त्या एजटाला. ठरवून टाकू सगळं त्या मूर्खानं कुठं ठेवल्येत पैसे हे शोध म्हणाव बाबा.' सौ आर्मिटेज कंटाळून बोलल्या.

'तिमोथीच्या मृत्युपत्रासोबत अंत्यविधी आणि इतर सोपस्कारासाठी अवघे पाच हजार पौंड त्यान ठेवले होते याची तर तुम्हाला कल्पना आहेच. त्यातली अगदी थोडी रक्कम माझ्याकडे उरली आहे तीही या शोधासाठी वापरता येणार नाही. कारण तर ती धर्मादाय सस्थेला देणगीरुपाने द्यावी लागेल. तिमोथीचीच तशी इच्छा आहे मग एजटाच्या फीच कस काय करायच ?'पाऊड.

'नॉर्मन ?' सौ आर्मिटेजन आपल्या पतीला उद्देशून विचारलं.

'अ...अ .. करू. करू काहीतरी व्यवस्था' आर्मिटेज. आता गाडीच विकावी लागेल हे आर्मिटेजनं बायकोकडे पाहात ताडल.

'मग मी युस्टॅस मिलरला नेमतो. चागला आहे तो. कष्टही घेईल.'–पाऊड

मिलरकडे तपासाची जबाबदारी सोपवून महिना झाला, पण त्याच्याकडून काही एक समजलं नाही. इकडे तर वरच्यावर फोन करून आर्मिटेज कुटुंबियांनी पाऊंडला भंडावून सोडलं होतं. अखेरी एक दिवस मिलरचाच फोन आला. थोडा फार माग आपल्याला लागलाय् म्हणून. मग पाऊंडच्याच कचेरीत बैठक ठरली. मिलरचा एकूण अवतार बघून मात्र आर्मिटेज कुटुंब थोडं नाराज झाल्यासारखं दिसलं. त्यांच्या 'डिटेक्टिव्ह' दिसण्याच्या वा असण्याच्या कल्पना या चित्रपट पाहून झालेल्या होत्या.

मिलर बोलू लागला, 'काही तरी निश्चित हेतू तिमोथीन मनाशी धरला होता. त्यानुसार त्यानं आपल्या मालमत्तेची विल्हेवाट लावली न् तिचं रोख रकमेत रूपांतर केलं. दुसरं म्हणजे ही रक्कम सरकारी खजिन्यातही जायला नको न् वारसांनाही मिळायला नको असा त्यामागे तिमोथीचा ठाम हेतू होता असं माझं ठाम मत आहे.'

'नालायक साला' तारकीन भडकला.

'मि. मिलर, पुढं सांगा.' पाऊंड.

'दुसरं म्हणजे ही रक्कम काही तिमोथीन जाळून टाकली नसणार. विदेशात हलवणही एवढं सोपं नाही, हेही तिमोथीला माहीतच होतं. ही रक्कम त्यानं एकाद्या बहुमोल वस्तुत गुंतवली असं मला वाटतं.'

'सोन्यात ? हिऱ्यात ?' आर्मिटेज.

'नाही. त्याचाही मी शोध घेतला.' मिलर म्हणाला, 'सोनही नाही न् हिरेही नाही. बहुमोल किंमत पण आकारानं लहान, असा कोणता धातू आहे याची मी 'जॉन्सन अँड मॅथ्यू' या कपनीकडे चौकशी केली न् त्याचं उत्तर मला सापडल.'

'सापडलं ?' तिघेही आर्मिटेज एकदमच उद्गारले.

'धन नाही हो सापडलं. उत्तर सापडलं.' असं म्हणून मिलरनं आपली बॅग उघडून एक पाकीट बाहेर काढल. 'ही आहे जॉन्सन—मॅथ्यू कपनीच्या पावतीची प्रत. तिमोथीनं त्यांच्याकडून ९९.९५ टक्के शुद्धतेचं अडीचशे औंस प्लॅटिनम खरेदी केलं त्याची.'

कुतुहलपूर्ण शांतता पसरली.

'तिमोथीनं खरेदीची पावती नष्ट केली असण्याची शक्यता आहे, पण दुकानदार मात्र असं काही करू शकत नाही म्हणून शोध लागला. हे पहा.'

'पण प्लटिनम् कशासाठी ?' पाऊंडनं आश्चर्यचकित होऊन विचारलं.

'तीच तर खरी गमत आहे.' मिलर सागू लागला, 'सध्याच्या कायद्याप्रमाणं मोठ्या प्रमाणात सोन खरेदी करायला अन् ते जवळ बाळगायलाही सरकारची परवानगी लागते. हिरे तर सहजी ओळखू येतात. अमुक-अमुक माणसाजवळ मोठ्या प्रमाणात हिरे आहेत अशी माहिती महसूल अधिकाऱ्यांना सहजी मिळाली, तशी ती मिळतेही ! की झालेच जप्त. प्लॅटिनमच्या खरेदीवर मात्र सरकारचे बधन नाही न् परवानगीही लागत नाही. खेरीज प्लॅटिनम् हा जगातला सर्वात अधिक महागामोलाचा धातू आहे. हॅन्सननं जेव्हा प्लॅटिनम जॉन्सन अँड मॅथ्यू ह्या कपनीकडून खरेदी केला तेव्हा त्याचा भाव होता औंसाला पाच हजार अमेरिकन डॉलर !'

'केव्हढयाच घेतल असेल प्लॅटिनम तिमोथीन ?' सौ. आर्मिटेज.

'बहुतेक सर्वच पैशांच. तीस लाख पौंडाच' मिलर.

'मग कुठं ठेवलं असेल ?'—आर्मिटेज्.

'बहुधा कॆंट मनोर हाऊसमध्ये.'—मिलर

'कॆंटला ? मी स्वतः जाऊन आलो तिथं. मला कस काहीच आढळलं नाही तिथ' पाऊड आश्चर्यान् म्हणाले.

'साहेब, तुमची नजर, दृष्टी वकिलाची आहे. मी 'शोधक' आहे. डिटेक्टिव्ह म्हणा, नाही तर प्रायव्हेट एन्क्वायरी एजंट म्हणा. त्यात काही फरक पडत नाही. मी कॆंट मनोर हाऊसमध्ये कशाला जाईन ? मनोरमध्ये न जाता मी बाहेरच्या गॅरेजवजा आऊटहाऊसपासून माझ्या तपासाला सुरुवात केली. तुम्हाला माहीत आहे ? कॆंट मनोरच्या तबेल्याला लागूनच एक सुतारकामाची अद्यावत् कार्यशाळा आहे ते ?' मिलर

'हो. माहीत आहे फावल्या वेळात सुतारकाम हा तर तिमोथीचा छदच होता.'

'बरोबर! अतिशय स्वच्छ व देखणं वर्कशॉप आहे ते पण नुकतच साफ केलेलं दिसल मला' मिलर.

'हॅन्सनच्या ड्रायव्हरन, रिचर्डसन्‌नं केली असेल.' पाऊंडन आपल मत मांडल.

'शक्यता आहे; पण तसं नसावं. मला तिथं जमिनीवर डिझेलचे डाग आढळले. गेल्या मे महिन्यात हॅन्सननं डिझेलवर चालणारा एक शक्तीमान जनरेटर विकत घेतला होता. आत्महत्येपूर्वीच काही दिवस त्यान तो विकला अस मला आढळलं' मिलर.

'विजेवर चालणाऱ्या हत्यारासाठी तो जनरेटर घेतला असावा.'—पाऊंड.

'नाही. तस नाही. दुसऱ्याच एका कारणासाठी. वर्कशॉपमध्ये मला पूड आढळली. तीही दोन लाकडी फळयांच्या मध्ये.' प्लॅस्टिकच्या पिशवीतली ती पूड त्याने टेबलावरच्या काचेवर मोकळी केली. चकाकणाऱ्या त्या पूडीकडे सगळेच डोळे विस्फारून पाहात असतानाच मिलर म्हणाला, 'रसायनशाळेत मी त्याच पृथ:करण केल. ९९.९५ शुद्धतेच्या प्लॅटिनमची पूड आहे ही.'

'उरलेल सापडल ?' सौ. आर्मिटेज मिलरला उद्देशून पुटपुटल्या.

अजून नाही. पण घाबरू नका. त्याचा शोध घेण्याचा मी प्रयत्न करीन. प्लॅटिनमची निवड करण्यात तिमोथीन एक मोठी चूक केलीय अस मला वाटतं. हा धातू आकारानं लहान असला तरी वजनानं प्रचड असतो. आता अगदी एकाद्या किरकोळ भासणाऱ्या निरुपद्रवी लाकडी पेटीच्या तळाशी जरी प्लॅटिनम ठेवल तरी ती समुद्रात बुडेल. 'सगळेच दचकले पण मिलरच तिकडं लक्ष नव्हत, तो म्हणाला, 'ती पेटी शोधली पाहिजे. हॅन्सनजवळ सुमारे अर्धा टन प्लॅटिनम होतं असा माझा अदाज आहे. ती लाकडी पेटी सापडली की बस्स.'

अचानक एकाद्या जखमी श्वापदाप्रमाण सौ. आर्मिटेज किंचाळच्या आणि कार्यालयातले वातावरण एकदमच तंग झाले. मिलर तर त्या आवाजान घाबरून उभाच राहिला. छोटा तारकीन आईला बिलगला.

'नालायक मेला' सौ. आर्मिटेज

'अस्सं.' मिलरकडे पाहात मि. पाऊंड म्हणाले. 'शोधून उपयोग नाही. हॅन्सननं अर्धा टन प्लॅटिनम स्वत:बरोबरच नेलंय. असा याचा अर्थ.

सरकारच्या महसुल अधिकाऱ्यांना श्री. पाऊंडन सर्व हकीकत सविस्तर सागितली. समुद्रतळाशी असलेल्या शवपेटिकेचा शोध घेण्यास सरकार असमर्थ आहे असं नुकतंच उत्तरही त्याला आलं होतं,

'सेंट बी' या अनाथाश्रम विद्यालयाच्या प्रमुख संचालिका लहान मुलांची प्रार्थना आटोपून आपल्या कार्यालयात परतल्या, तेव्हा कार्यालयात कोणीतरी त्यांची वाट पाहात असल्याचं कळलं. त्यांनी त्यांची विचारपूस केली. गेली कित्येक वर्षे या अनाथ आणि पोरक्या मुलांना रम्य परिसरात नेऊन मोठं करावं, शिकवावं ही त्यांची इच्छा होती, पण किरकोळ देणग्यांनी काय होणार होतं?

'काय हवंय आपल्याला? आपलं नाव काय?'

'मादाम. मी माझं नावही सांगू शकत नाही. फक्त हे पाकीट तुम्हाला द्यायचंय. ते कोणी दिलं तेही मला सांगता येणार नाही कारण मी दिल्या शब्दाला बांधील आहे.'

मादामांनी पाकीट उघडलं. त्यात तीस लाख पौंडाचा 'सेंट बी'च्या नावाचा बँक ड्राफ्ट होता. मादाम उभ्या राहिल्या, त्यांनी गळ्यातला क्रूस कपाळाला व छातीला लावला. डोळे पाण्यानं डबडबले आणि समोरचा तो 'माणूस' अदृश्यही झाला.

तो ड्राफ्ट बाजूला ठेऊन प्रिन्सिपॉल मादामनं डोळे पुसले. दैनिक जवळ केलं. त्यावरची ठसठशीत जाहिरात त्यांच्या नजरेत भरली.

'वीस एकराचा निसर्गरम्य परिसर. सुसज्ज इमारत. त्वरित विकणे आहे. किंमत तीन लाख पौंड.'

□




## स्वप्न खरी करू पाहणारा आचार्य
# डॉ. वि. वि. पेंडसे

आदर्श समाजरचनेच, आधुनिक आणि समर्थ भारताचं स्वप्नं पाहणारे अनेक थोर नेते आणि विचारवंत या शतकात भारतामध्ये झाले. पण या सर्वांनाच ज्या अनेकविध अशा प्रश्नांना सामोरे जावे लागले ते प्रश्न इतके सर्वंकष स्वरुपाचे आणि व्यापक होते आणि आहेत की, अशी स्वप्नं पहाणारे अनेकजण हताश झाले. काहींना वाटले की राज्ययंत्रणेचे–प्रशासनाचे माध्यम स्वीकारल्याशिवाय इथे काही घडवणे अशक्य आहे. पण लोकांमध्ये जाऊन स्वतंत्रपणे काहींनी आपल्या कार्याची उभारणी केली. त्याचे स्वरूप मर्यादित असेल, पण अशी कार्ये म्हणजे समाजाला दीपस्तंभासारखी वाटू लागली. अशा काही कार्यकर्त्यांमध्ये विनायक विश्वनाथ उर्फ अप्पा पेंडसे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

अप्पांनी ज्या आदर्श भारताचे स्वप्न पाहिले ते प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांना 'शिक्षणसंस्था' हे कार्यक्षेत्र जवळचे वाटले. अर्थात शिक्षणसंस्था म्हणजे केवळ पुस्तकी अभ्यासक्रम शिकविण्याचे केंद्र नव्हे, किंवा पदवी आणि नंतर नोकरी मिळवून देणारे माध्यमही नव्हे समाज आणि राष्ट्राच्या भाग्योदयासाठी झटणारी माणसे घडवायची, त्यांच्यावर संस्कार करायचे हे अप्पांनी आपले उद्दिष्ट ठरवले आणि 'ज्ञान प्रबोधिनी'ची स्थापना केली. भारतात खऱ्या अर्थाने लोकशाही रुजवायची तर संघटित असे लोकसंघ ठिकठिकाणी स्थापन झाले पाहिजेत असे प्रतिपादन अनेक विचारवंतांनी केले आहे. 'प्रबोधिनी' हा असाच एक संघटित, आदर्श वास्तवात उतरवू पाहणारा असा लोकसंघ आहे. जिथे मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करेल असे तत्त्वज्ञान आहे आणि ते आचरणात आणणारा प्रयोगही आहे. ही एक अशी शिक्षणसंस्था आहे की जी विद्यार्थ्यांनाच नव्हे तर समाजाला मार्गदर्शन करते. या शाळेच्या वास्तूत संबंध राष्ट्रापुढच्या समस्यांचं चिंतन चालते. इथे अभ्यासाबरोबर खेळ, शारीरिक संवर्धन इतकेच नव्हे तर आध्यात्मिक उपासनाही केली जाते. 'प्रबोधिनी' हे समाजसेवेचे एक केंद्र आहे.

संस्थेचे हे असे स्वरूप ठरविण्यामागे अप्पा पेंडसे यांची एका समाजचिंतकाची दृष्टी आहे. ते मूलतः एक कुशल संघटक होते. देशासाठी आणि समाजासाठी वाहून घेणाऱ्या कार्यकर्त्यांची एक पिढीच त्यांनी घडविली. ह्याच पिढीच्या प्रतिनिधी डॉ. स्वर्णलता भिशीकर ह्यांनी अप्पांचे हे स्फूर्तिदायक जीवनचरित्र लिहिले आहे. 'राष्ट्रसमर्पित एक अदम्य–उत्कट चैतन्य.'

अप्पा पेंडसे यांच्या कार्याकडे तटस्थतेने पाहून त्यांच्या व्यक्तित्वाबद्दल लेखिकेने लिहिलेले नाही. तर या संपूर्ण कार्यात समरस झालेली, अप्पांच्या महत्त्वाकांक्षा आणि त्यांच्या स्वप्नांची साक्षी असलेल्या युवतीने हे चरित्र लिहिले असल्याने ते जिवंत असे झाले आहे. प्रबोधिनीच्या आजवरच्या कार्याचा इतिहास तर त्यातून सांगितला गेला आहेच; पण हे सगळं कार्य उभं करणाऱ्या अप्पा पेंडसे यांच्या गुणांवर आणि स्वभाववैशिष्ट्यावर चांगला प्रकाश या चरित्रात टाकला आहे. सार्वजनिक जीवनात स्वतःचे आयुष्य वाहून घेणाऱ्या एका प्रतिभावान समाजसेवकाच्या जीवनाचा हा आलेख आहे.

'ज्ञान प्रबोधिनी' आणि तिच्या संस्थापकांबद्दल वाचताना प्रत्येकवेळी ह्या संस्थापकाला 'प्रतिभावान समाजसेवक' अशी पदवी देण्याचा मोह होतो. कपड्यांपासून ते भव्य वास्तूपर्यंतच्या प्रत्येक गोष्टीत कल्पकता नाविन्याचा ध्यास आणि स्वतःची अशी 'शैली' टिकवण्याचा आग्रह आहे. इथे आधुनिकीकरण करायचे तर पश्चिमेकडच्या कल्पना आणि मूल्ये सरसकट आयात करावी, या अंधश्रद्धेला अप्पा पेंडसे कधीच बळी पडले नाहीत शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, असाच प्रबोधिनीतला अभ्यासक्रम आहे. ह्या अभिनव अभ्यासक्रमात विज्ञान आणि सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनाबरोबरच अध्यात्मिक उपासनेलाही स्थान आहे. प्राचीन गुरुजन परंपरेतील शिक्षणाचा हा आधुनिक अविष्कारच म्हणावा लागेल.

हिंदुत्वाचा पेंडसे यांना वाटत असलेला अभिमान आणि आत्मीयता; राष्ट्रीय स्वयं-

सेवक संघात झालेले संस्कार त्यांची संघातील भूमिका; तेथे निर्माण झालेली वादळे, मतभेदाची परिणती; आणि दैनंदिन कार्यातून मुक्त होणे ह्या सगळ्या घटना जशाच्या तशा लेखिकेने समोर ठेवल्या आहेत. प्रत्यक्ष स्वरूपाचे सामाजिक कार्य करायचा प्रयत्न केला तर संघातल्याच लोकांकडून कशी उपेक्षा केली जाते याचे वर्णन या पुस्तकात विस्ताराने केले आहे. नागपूरच्या एका संघाच्या पदाधिकाऱ्याला त्यानी लिहिलेले पत्रच या पुस्तकात समाविष्ट करण्यात आले आहे. त्यावरून अप्पांच्या मनोवृत्तीचे दर्शन घडते. त्यात ते म्हणतात, 'एकतर चिकित्सा-विरहित पूर्ण भक्तीभाव,नाहीतर १०० टक्के विरोध, शत्रुत्व असे व्यक्तीच्या गुणग्रहणाबाबतीत नसते. मी एक भक्त खरा, पण मी एक चिकित्सक भक्त आहे' हिंदुत्ववादी संघटनातील काहींबद्दल मूल्यमापन करणारा एक लेख त्यांनी लिहिला होता. त्यावर नाराजी व्यक्त करणारी पत्रं त्यांच्याकडे आली. त्याला उत्तर देताना त्यांनी हे वरील पत्र लिहिले आहे. व्यक्तीप्रमाणेच संघटनेकडेही त्यांनी चिकित्सेनेच पाहिले. राष्ट्रापुढे उभ्या असलेल्या अक्राळविक्राळ समस्यांनी निर्माण केलेल्या आव्हानाला संघाने सामोरे जावे असे त्यांनी ठामपणे प्रतिपादन केले.

ही चिकित्सा, हे मूल्यमापन त्यानी केले असले, तरी प्रबोधिनीच्या कार्याचे स्वरूप संघकार्याशी मिळतेजुळते असेच होते. 'संस्कारातूनच राष्ट्र उभारणी' होत असते ह्याच सूत्राचा त्यानी आपल्या कार्यात अवलंब केला बऱ्याचदा इतरांकडून केले गेलेले आरोप मोठ्या व्यक्तींच्या कार्याची प्रशस्ती ठरत असतात. ज्ञानप्रबोधिनीत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या पद्धतीवर पुण्यातील काही जणांनी टीका केली. त्याचे आक्षेप असे होते की, श्री. पेंडसे मुलांना प्रार्थना म्हणायास शिकवितात, वडील माणसांबद्दल जरा जादा आदर त्याचे विद्यार्थी दाखवतात व स्त्रियाबद्दल अनुदार वृत्ती आहे. शाळेत हिंदू संस्कृतीचा पुरस्कार केला जातो वगैरे.

विद्यार्थ्यांना घडविण्याचा केवढा ध्यास त्यानी घेतला होता याची कल्पना या आक्षेपांवरून सहज येऊ शकेल.

शिक्षणाबरोबरच उद्योग, समाजकारण, राजकारण अशा विविध क्षेत्रांवर अप्पांची नजर भिरभिरत असे. समस्या निर्माण झाली की, आपण धावून जायचे हा त्यांचा स्थायीभाव होता. पंजाबसारख्या ठिकाणी वाढत जाणाऱ्या हिंसाचाराने पुण्यातल्या एका शाळेतले विद्यार्थी आणि त्याचा शिक्षक अस्वस्थ होतो, पंजाबात जाऊन शिखाना 'अरे, तुम्ही हिंदूच आहात' असे हे विद्यार्थी सांगतात, ही गोष्ट साधीसुधी नाही. राष्ट्रीय समस्यांबरोबर समाजकारणातही अप्पानी आणि त्यांच्या प्रबोधिनीने हिरीरीने भाग घेतला. गणेशोत्सवाचे स्वरूप कसे बिघडत चालले, ह्यावर चार हात लाब राहून चर्चा करण्यापेक्षा प्रत्यक्ष सहभागी होऊन या सार्वजनिक उत्सवात काही चागल्या प्रथा पाडण्याचा प्रयत्न करणे हे जास्त महत्त्वाचे, हे अप्पानी ओळखले होते. गणेशोत्सवच काय पण इतरही सामाजिक घडामोडीपासून प्रबोधिनी आणि अप्पा पेंडसे कधीच अलिप्त राहिले नाहीत. तामिळनाडूमध्ये हिंदीविरोधी आदोलन सुरू झाले आणि त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटू लागले. पुण्यातल्या तामिळी लोकांच्या दुकानांवर, उपहारगृहांवर दगडफेकीचे प्रकार घडले. या घटनामुळे अप्पा अत्यंत अस्वस्थ झाले आणि त्यानी पुण्यातील तामिळ लोकाच्या वस्तीमध्ये जाऊन त्या लोकाना विश्वासात घेतले. मराठी व तामिळ भाषकाचा एक मेळावा घेऊन आपण एक कसे आहोत हे दोघानाही पटवून दिले. त्यावेळच्या अनेक घटनामध्ये प्रबोधिनीची भूमिका वैशिष्टयपूर्ण राहिली आहे. मराठी अस्मितेचा प्रचार, पुरस्कार करणाऱ्याना अप्पानी नेहमीच विरोध केला. प्रतापगडावर पं. नेहरू शिव छत्रपतीच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरणप्रसगी येणार होते. यावेळी 'आम्ही नेहरूंना येऊ देणार नाही, काळी निशाणे दाखवून त्याना परत जायला लावू' अशा घोषणा—आव्हान दिली जात होती. त्याला अप्पानी तीव्र विरोध केला. पुरेसं पाठबळ नसतानाही संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील रथी—अतिरथीशी त्यानी झुज घेतली. प्रातीय अस्मितेपेक्षा राष्ट्रीय अस्मिता मोठी असते या तत्त्वासाठी त्यानी हा लढा दिला.

राजकारण (राष्ट्रकारण) आणि समाजकारणाबरोबरच आर्थिक क्षेत्रही अप्पांनी दुर्लक्षित ठेवले नव्हते. प्रयोगशीलतेची संधी आणि स्वातंत्र्य, शाळेला मिळाले पाहिजे या उद्देशाने शिवापूर येथे यत्रशाळा आणि पुण्यात धारक उत्पादन विभाग असे दोन औद्योगिक विभाग अप्पानी उभारले. उत्पादन आणि संशोधन या क्षेत्रात आपण अग्रेसर बनले पाहिजे या दृष्टीने प्रबोधिनीच्या विद्युत अणु प्रयोगशाळेची स्थापना झाली. प्रबोधिनीच्या उद्योगांबद्दल नेहमी विचारले जायचे की, हे उद्योग कोणत्या सेक्टरमध्ये मोडतात ? पब्लिक, प्रायव्हेट की को-ऑपरेटिव्ह ? यावेळी अप्पा उत्तर देत असत— We belong to the fourth sector, the sector of the dedicated !

अशा अनेक आठवणीमधून या राष्ट्र समर्पित व्यक्तिमत्त्वाचा, त्यामध्ये असलेल्या चैतन्याचा शोध घेण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. केवळ साहित्यिक आस्वाद म्हणून एखादे जीवनचरित्र लिहिणे हे कार्यकर्त्याच्या प्रकृतीला कधीच मानवणारे नसते प्रबोधनाचीच प्रेरणा घेऊन असे कार्यकर्ते काम करत असतात. त्यामुळे डॉ. अप्पा पेंडसे यांचे हे चरित्र निश्चितच वेगळ्या कारणासाठी लिहिले गेले आहे.

ज्ञान प्रबोधिनीच्या आद्य संचालकाने सुरू केलेल्या या कार्यामागे केवढा अलौकिक त्याग आणि निष्ठा होती याचे दर्शन नव्या पिढीला झाले पाहिजे, त्याच प्रेरणेने हे व्रत त्यानी पुढे चालू ठेवले पाहिजे या इच्छेतूनच या पुस्तकाची निर्मिती झाली आहे. विशेष म्हणजे असे असूनही हे पुस्तक प्रचारकी नाही. लेखिकेच्या सहजसुदर शैलीमुळे ते अत्यत वाचनीय बनले आहे. अप्पा पेंडसे व प्रबोधिनी याच्यासबधातील एकेक आठवणी या एकेका कथेसारख्या वाटतात आणि या प्रत्येक कथेचा शेवट कथानायकाच्या अलौकिकत्वाबद्दल आपल्या मनावर ठसा उमटवून जातो.

—निरंजन आगाशे

राष्ट्रसमर्पित
एक अदम्य उत्कट चैतन्य
डॉ. वि. वि. पेंडसे
ले. डॉ. स्वर्णलता भिशीकर
प्रकाशक — ज्ञानप्रबोधिनी, पुणे
मूल्य : पंचवीस रुपये

## ललित लेख संग्रह

'बकुळीची फुले' हा प्र. श्री. नेरूरकरांचा ललित लेखाचा संग्रह आहे असं पुस्तकात म्हटलं आहे. पण खर म्हणजे हे ललितलेख नसून आठवणींचं कथन आहे. आत्मकथनाला ललितरूप देण्याचा प्रयत्न आहे.

आयुष्याच्या एकेका टप्प्यावर माणसाला मागे वळून पहावसं वाटत. असं पहाता पहाता एक वेळ अशी येते की, मनात साठलेलं शब्दबद्ध व्हावं असं वाटत. स्मृतीचा सुगंध आपल्यापाशीच न ठेवता तो इतरानाही घेऊ द्यावा अस वाटतं. आपल्या आठवणीची 'बकुळीची फुले' वाचकाच्या ओंजळीत टाकायला लेखक प्रवृत्त झाले ते अशाच भावनेतून असावेत.

११७७ पासून 'बेळगाव–वार्ता' मधून या आठवणी प्रसिद्ध होत गेल्या. आता त्या पुस्तकरूपाने आपल्यासमोर आल्या आहेत. बेळगावशी लेखकाचं असलेलं अतूट नातं या लेखांमधून साकार होत गेलं आहे. त्याच प्रमाणे नेरूर, पुणे इथल्या आठवणींनी लेखक एका वेगळ्या वातावरणात रमून गेल्याच दिसतं. या कथनात पद्धतशीर आखीव रेखीवपणा नाही आठवणीमध्ये क्रम नाही. भूतकाळ मनाने अनुभवत गेल्यावर जे जे तरंग जसजसे आले तसतसे ते कागदावर उमटविले. त्यामुळे ही फुल अकृत्रिम असल्याचा सुखद प्रत्यय येतो. अगदी थोडक्या शब्दात प्रसग, घटना, व्यक्ती आणि त्या त्या वेळची स्वतःची मन स्थिती लेखकानी वर्णन केली आहे. त्यात संयम आहे, सूचकता आहे. स्वत.च्या जडणघडणीचा धावता आलेख आहे. बालवयातली दु ख, आनद, तरुणवयातली स्पदन, सहजतेन सागितली आहेत. या आठवणीत रमलेल्या लेखकाच्या भाववृत्ती बकुलफुलांसारख्या मद पण उत्कट, नाजूक पण बराच काळ आपल्या कोषात रेंगाळत रहाणाऱ्या आहेत.

हे आत्मवृत्तपर लेखन वाचत असताना काही गोष्टी स्पष्टपणे जाणवतात. एक तर श्री. नेरूरकर स्वतःच पूर्णपणे रमून गेले आहेत.दुसरं, त्याच्या समवयस्क आणि त्याच्या आयुष्यात स्थान असलेल्या व्यक्तींना या लेखनाचा आनद समरसून घेता येईल. तिसरे त्रयस्थ वाचक या आठवणी वाचताना रगून जाईल, लेखकाच्या आयुष्यातील भूतकाळात आपोआप खेचला जाईल अशी ताकद या लेखनात नाही. आत्मवृत्तपर लेखन वाचत असतानाही वाचक आपल्या जीवनाची प्रतिबिंब त्यात कळत नकळत शोधत असतात. समानधर्मित्वाची प्रचीती काही प्रमाणात तरी यावी अशी अपेक्षा असते. असं झालं तर ते लेखन अधिकाधिक आस्वाद्य होत जातं. वैयक्तिक अनुभवाचं नातं एकूण मानवी जीवनाशी जोडलं गेलं तर अशा प्रकारच्या लेखनाला एक उची प्राप्त होते, अन्यथा ते केवळ माहिती आणि तपशील या पातळीवरच रहात. या लेखनाची ही मर्यादा दिसते. पण पुन प्रत्ययाचा आनंद ज्याना घेता येण्यासारखा आहे अशा मडळीना ही फुलं नक्कीच आनद देतील.

—मेधा सिधये

बकुळीची फुले
प्र श्री. नेरुरकर
प्रकाशक– वि. गं. भागवत
पृष्ठसंख्या : ८८, मूल्य : १५ रु.

## हॅरी-स्टीव्ह यांच्या आयुष्यातील सुवर्णक्षण !

स्टीव्ह ओव्हेट ह्या ऑलिम्पिक विजेत्या धावपटूचे क्रीडाशिक्षक हॅरी विल्सन याचे आत्मचरित्र Running Dialogue, A coach's story नावानी प्रसिद्ध झाले आहे. ह्या पुस्तकात क्रीडाशिक्षकाना येणाऱ्या अडचणी, धावपटूना येणारे स्पर्धेपूर्वीचे ताण, दोन धावपटूची सतत होणारी तुलना, सतत प्रसिद्धीच्या झोतात असल्याने होणारा टीकेचा भडिमार, गुरुशिष्याच्या एकमेकाबद्दलच्या भावना याचे मनोज्ञ दर्शन घडते.

तसेच ह्या पुस्तकात स्टीव्ह ओव्हेटच्या मॉस्को ऑलिम्पिकमधील ८०० मीटर्स शर्यतीमधील विजयी धावेचे सपूर्ण वर्णन आहे हे वर्णन वाचताना केवळ दोन मिनिटाच्या आत सपणाऱ्या ह्या स्पर्धेत किती प्रकारचे डावपेच असतात, सेकदासेकंदाला कसे बेत बदलावे लागतात, प्रत्येक धावण्याच्या शर्यतीचे कसे एक वेगळेपण असते ह्याचे दर्शन घडते व पळण्याची शर्यत किती रोमाचकारी असू शकते याचा प्रत्यय येतो.

सतत रंग बदलत जाणारी शर्यत, स्पर्धकांच्या व त्यांच्या शिक्षकाच्या मनातील आदोलने, शर्यत पळण्यातील अनेक महत्त्वाचे बारकावे यांना एकत्र गोष्टीरूप बाधण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

¤

बंदूक उडाली. मास्को ऑलिम्पिक्स् ८०० मीटर्स अंतिम शर्यतीमधील सातही स्पर्धक ह्याच आवाजाची वाट पहात होते. स्टीव्हला अत्यत सोईची अशी दुसरी धावपट्टी मिळाली होती. त्याचा दुसरा प्रतिस्पर्धी त्याच्याच देशाचा सेबॅस्टिअन को याला मात्र आठवी धावपट्टी मिळाली होती. स्टीव्हचा शर्यत पळण्याचा बेत पूर्वीच ठरलेला होता. शर्यतीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत मागे रहावयाचे व शेवटी 'ती' मुसडी मारावयाची. परंतु ह्या शर्यतीत सुरुवातच धक्कादायक झाली. सर्वच स्पर्धकानी असे ठरविले की, आपण सर्वांच्या शेवटी रहावयाचे. १३० मी. शर्यत झाल्यावर सर्व स्पर्धक कमीत कमी अतर पळण्याच्या इराद्याने धावपट्टीच्या अगदी आतल्या कडेने पळण्याचा प्रयत्न करू लागले.

बदुकीचा आवाज ऐकल्याऐकल्याच हॅरीने सवयीने आपले स्टॉप वॉच चालू केले. हॅरीने शर्यतीची सुरुवात बघितल्यावरच मनाशी अदाज केला की, आज स्टीव्हला त्याच्या

मनासारखी शर्यत सुरुवातीपासून तर पळता येणार नाही. कारण प्रत्येक स्पर्धकाने आपापल्या डावपेचात खूपच बदल केले होते. आज स्टीव्हला क्षणाक्षणाला स्वतःचे स्वतः निर्णय घ्यावे लागणार होते. अर्थात हॅरीला त्याच्या तयारीबद्दल किंचितही शंका नव्हती.

ह्या ८०० मी. च्या शर्यतीचा पहिला टप्पा म्हणजे खरोखरच सगळया स्पर्धकामधील लढाईच होती. सर्वचजण अगदी एकमेकांना चिकटून पळण्याचा प्रयत्न करीत होते. अर्धा इंच खिळे असलेले स्पाईक्स् स्पर्धकांनी घातले असल्यामुळे कोणीही स्पर्धक फार जवळ येणे स्टीव्हला धोकादायक वाटत होते व म्हणूनच धक्काबुक्की करून तो स्वतःच बचाव करीत होता. प्रत्येकालाच अजून जिंकण्याच्या दृष्टीने आपली जागा असुरक्षित वाटत होती.

हॅरी ही धक्काबुक्की बघून मनातल्या मनात मिश्किल हसत होता. ही शर्यत १०० मी.–२०० मी. अशा शर्यतीपेक्षा फार निराळी असते. त्या शर्यतीमधून स्पर्धकाला फक्त आपापल्या आखून दिलेल्या धावपट्टीतून पळावयाचे असते. त्यामुळे तेथे प्रत्येक स्पर्धकाचा फक्त वेळेशी स्वतंत्र सामना असतो. परंतु ह्या शर्यतीत मात्र तसे नसल्याने अक्षरशः रणकंदन माजते. स्टीव्हला त्याच्या आडदांड वर्तनाबद्दल नेहमीच वार्ताहरांकडून टीका ऐकावी लागली होती व आजही तो त्यातून सुटणार नव्हता. मात्र हॅरीने हे हेरले की, हे सर्व करून स्टीव्हने अगदी त्याच्या अनुरूप नव्हे परंतु बऱ्यापैकी स्थिती प्राप्त करून घेतली आहे.

शर्यतीच्या ह्या टप्प्यात जवळजवळ मुष्टियुद्धाचा सामना चालला होता असे म्हटले तरी चालेल. प्रत्येकालाच आपापल्या मनसुब्याप्रमाणे शर्यत पळायला मिळाली नव्हती. त्यामुळेच ह्या सर्व रणकंदनानंतर शेवटी स्वतःची सुटका करता करता अचानकपणे ब्राझिलच्या स्पर्धकाला शर्यतीचे नेतृत्व करावे लागले व किरॉव्ह हा पूर्व जर्मनीचा स्पर्धक त्याच्यामागोमाग पळत होता. स्टीव्हला बावरविणाऱ्या स्वप्नाप्रमाणेच क्षणभर वाटले की, कोणी तरी आपल्याला धक्का दिलेला आहे. आणि ह्या प्रचंड कोलाहलात आपण खाली कोसळत आहोत !

हॅरीने स्टीव्हला अनेक स्पर्धकाच्या जाळयात अडकल्याचे पाहिले व घड्याळाकडेही क्षणभर नजर टाकली. त्याच्या मनात आले की, स्टीव्हने आता ह्या जाळयातून बाहेर पडून स्वतःची शर्यत पळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नाही तर थोडयाच वेळात तो आणखीनच वेळेच्या कात्रीत सापडेल.

स्टीव्ह धीमेपणाने पळत होता, परंतु स्पर्धकांची एक फळीच त्याच्या आजुबाजूला असल्याने त्याला स्वतःच्या मनासारखे पळता येत नव्हते; परंतु थोडे आत बाहेर करीत त्याने ह्या जाळयातून सहीसलामत सुटका करून घेतली व तो आता शर्यतीच्या शेवटी अगदी स्वस्थचित्ताने व आत्मविश्वासपूर्वक पळताना दिसू लागला.

हॅरीने एक निश्वास सोडला. स्टीव्हने एक अडथळा पार केलेला होता अजूनही हॅरीच्या मते त्याने परिस्थितीवर सपूर्ण कबजा मिळविलेला नव्हता; परंतु आता त्याची स्थिती निश्चितच वाईट नव्हती. हॅरीचे डोळे आता त्याच्या इतर प्रतिस्पर्ध्यांचे वेध घेत होते. स्टीव्हचा मुख्य प्रतिस्पर्धी सेब को थोडा त्याच्यापुढे पळत होता. सेब त्याच्या बेताप्रमाणेच शर्यत पळत होता. स्टीव्हला मात्र खूपच त्रास सोसून ही परिस्थिती प्राप्त करून घ्यावी लागली होती त्यामुळेच सेबला ही शर्यत जास्त अनुकूल स्थितीत पळावयास मिळत आहे असे वाटत होते. सेब आणि स्टीव्हच्या मध्ये साधारण ४–५ मी अंतर ठेवून बाकीचे स्पर्धक पळत होते.

पहिला ४०० मी. टप्पा आता जवळ आला होता. तेवढयात ह्या टप्प्याच्या अलिकडे ४० मी वर स्टीव्ह पुन्हा सगळीकडून घेरला गेला. त्याच्या थोडे पुढे वागेननेक्ट व ६ फूट ४ इंच उंचीचा महाकाय किरॉव्ह हे स्पर्धक पळत होते. स्टीव्हने लगेच निर्णय घेतला की, ह्या दोन स्पर्धकामधून घुसण्याएव्हढी जागा दिसली की, तात्काळ घुसावयाचे व तो घुसलाच जवळजवळ ! परंतु पूर्व जर्मनीचा तो महाकाय स्पर्धक पूर्वी स्टीव्हबरोबर दोन हात केलेला असल्याने त्याने स्टीव्हचे डावपेच तावडतोब ओळखले व झटकन् ती फट बंद केली. स्टीव्हला अजून अनेक प्रश्न सोडवायचे होते.

पहिले चारशे मीटर्स झाल्याची आणि शेवटचा ४०० मी चा टप्पा सुरू झाल्याची घंटा वाजली. हॅरीने घड्याळात पाहिले. ५४.५५ सेकंदात पहिला टप्पा पार करून ब्राझिलचा स्पर्धक गुईमाराईस् अजून शर्यतीचे नेतृत्व करीत होता. त्याच्या मागोमाग वॉरेन व वागेननेक्ट हे पळताना दिसत होते. डेव्हचा–ह्या स्पर्धकाचा पुढे पुढे पळण्याचाच बेत दिसत होता. त्याच्या बाजूला पळत होता किरॉव्ह. स्टीव्ह सहाव्या क्रमांकावर पळत होता. उत्कृष्ट लयीने त्याच्या मागे होता सेब को. हॅरीला वाटत होते हाच तो क्षण आता सेब त्याची नेहमीची शर्यत पळण्याचा प्रयत्न करणार. परंतु अजूनही तो शेवटच पळत होता. त्याच्या ह्या कृतीचा हॅरीला अर्थबोध होत नव्हता. हॅरीचे वेधक डोळे आता त्याच्या शिष्याच्या 'स्टीव्हच्या'मागे लागले होते.

## 'ती' प्रसिद्ध मुसंडी

शेवटचे ४०० मी धावताना आता शर्यतीचा वेग वाढला होता. डेव्हने ठरविल्याप्रमाणे सर्वांच्या पुढे धडक मारली होती व सर्वांच्या पुढे राहून शर्यत जिंकण्याचा तो आटापिटा करीत होता, परंतु लवकरच त्याचे आव्हान संपुष्टात आले. कारण किरॉव्ह आता त्याला आव्हान देऊ लागला होता. सर्वच स्पर्धकांनी आता आपापला वेग वाढविला होता. स्टीव्हने ह्या शर्यतीच्या वाढलेल्या वेगाचा केव्हाच अंदाज घेतला व त्याने किरॉव्हच्या मागे पळण्यास सुरुवात केली.

हॅरीच्या छातीची धडधड आता वाढत चालली होती. अतिशय भिरभिरत्या नजरेने हॅरीचे डोळे त्याच्या शिष्याच्या प्रतिस्पर्ध्यांचे वेध घेत होते. अजूनही सेब कोने त्याचे डावपेच उघड केले नव्हते. हॅरीला अजून वाटत होते की, सेबला नक्कीच आत्मविश्वास असणार

जवळजवळ तीन चतुर्थांश शर्यत संपली होती. ६०० मी. च्या टप्प्याच्या अलिकडे किरॉव्हने शर्यतीचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली. किरॉव्हच्या मागे धावण्याचा स्टीव्हचा निर्णय अगदी अचूक ठरला होता व तोच आता किरॉव्हच्या मागे पळत होता. पुढे तीरासारखा धावणारा डेव्ह हळूहळू निस्तेज होत होता. सेब अजूनही पुढे पळणाऱ्या स्पर्धकांच्या १० मीटर्स मागे पाचव्या क्रमांकावर पळत होता.

हॅरीला स्टीव्हला हरवू शकेल अशा एकाच

स्पर्धकाची भीती होती तो म्हणजे सेबॅस्टिअन को. हॅरी विचार करीत होता की, सेब कोला शेवटच्या सरळ धावपट्टीवर पळण्याच्या थोडे आधीपासूनच मुसंडी मारावी लागेल. कारण १० मी चे अंतर त्याला प्रथम पार करावयाचे आहे. अजूनही स्टीव्ह किरॉव्हच्या मागेच पळत आहे. अजून सेब स्टीव्हला आव्हान देऊ शकेल.

परंतु शर्यतीच्या ह्या शेवटच्या टप्प्यात किरॉव्हच्या मागे पळणारा स्टीव्ह झटकन त्याच्याबरोबर पळू लागला व आता तर त्याने आणखी जोरात त्याची ती प्रसिद्ध मुसंडी मारली होती. त्याच्यात व इतर स्पर्धकांत आता तर अंतरही निर्माण झाले होते.

जर का किरॉव्हच्या मागेच अजूनही स्टीव्ह पळत असता तर कदाचित सेबला अजूनही आव्हान देता आले असते. परंतु आता एव्हढे अंतर कापून शर्यत जिंकणे अशक्य आहे हे हॅरीने हेरले त्याने झटकन पाठ फिरविली व आपल्या सहकारी मित्राला रॉनला सांगितले की, फक्त स्टीव्ह जिंकल्यावर मला सांग. ह्या रोमहर्षक शर्यतीत आपला शिष्य सुवर्णपदक जिंकीत आहे हे दृश्य पहाणेसुद्धा त्याला अशक्य झाले होते. इतका तो भावनाविवश झाला होता.

स्टीव्हने जबरदस्त मुसंडी मारली होती. शेवटच्या १०० मी मध्ये स्टीव्हला जाणवले की, कोणाच्याच श्वासोच्छ्वासाचा आवाज नाही त्याच्या मागे पळत होता किरॉव्ह व सेब कोही आता प्रचंड भीषण गतीने पळत होता. परंतु स्टीव्हला थोपविणे आता त्या पैकी कोणालाच अशक्य होते. पळताना स्टीव्हला हॅरीचे शब्द आठवित होते.

'एकदा शर्यतीच्या शेवटच्या टप्प्यात सर्वांच्या पुढे मुसंडी मारलीस की मग स्टेडियमच्या शेवटच्या भिंतीला धडक देईपर्यंत पळत रहा ! पळत रहा !! पळत रहा !!!'

काही सेकंदातच रॉनने हॅरीला सांगितले हॅरी, तो बघ ! स्टीव्हने शर्यत जिकली आहे. तो आता आलिंपिक विजेता झालेला आहे. शर्यतीचे घड्याळ अगदी यांत्रिकतेने स्पर्धेला लागलेला अचूक वेळ दाखवित होते.

१ मिनिट ४४.५ सेकंद.

हॅरीने लांबूनच स्टीव्हकडे बघितले त्याचा फुललेला चेहेराच सर्व काही सांगून गेला. मॉन्ट्रियल ऑलिम्पिकनंतर ह्याच क्षणाची तो वाट पहात होता. ड्रेसिंगरूममध्ये क्षणार्धातच स्टीव्ह वार्ताहर, टीव्ही कॅमेरे ह्यांनी वेढला गेला. हॅरीने त्याला नंतरच भेटण्याचे ठरविले.

हॅरी आणि त्याचा शिक्षक मित्र रॉन ऑलिम्पिकनगरीतील त्यांच्या निवासस्थानावर परतले. तेवढ्यातच स्टीव्ह आपल्या आईवडिलांसमवेत भोजनास जात असल्याचा निरोप आला.

खोलीत शिरताक्षणीच रॉनने त्याला सांगितले तुझ्या उशीवर बघ काय आहे ते. हॅरी म्हणतो जे मी पाहिले ते आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही. एका जुन्या खडबडीत कागदाच्या कपट्यावर स्टीव्हने लिहिले होते.

' Tiger ! I hope you are as proud of me as I am of you - Steve. '

रॉनने माझ्याकडे पाहिले व मी रॉनकडे पाहिले आम्हा दोघांच्याही डोळ्यात आनंदाश्रू उभे होते. रॉन म्हणाला, ' माझ्याही जीवनात असाच क्षण येवो. '

मी बोलू शकलो नाही. ती लहानशी एका साध्या कागदावर लिहिलेली चिठ्ठी माझ्या क्रीडा शिक्षक जीवनातील मिळालेली सर्वात मोलाची देणगी आहे.

—श्रीकृष्ण केशव रानडे

---

# शब्दांचं अंगण

## चरितकहाण्या : पाश्चिमात्य

**आं**तरराष्ट्रीय क्षितिजावर आपल्या विलक्षण प्रभावानं तळपणाऱ्या व्यक्तींविषयी लिहिणं म्हणजे लेखणीला आव्हानच ठरावं. जागतिक राजकारणावर आणि एकूण विचारधारेवर आपला ठसा उमटवण्याचं सामर्थ्य असणाऱ्या हिटलर, लिंकन, मार्क्स, चर्चिल या व्यक्तींची नावं उच्चारली तरी वीज चमकून जाते ! त्या तेजस्वितेला साकार करणारे ग्रंथ पुनः पुन्हा वाचावेसे वाटतात. काही व्यक्ती असीम सेवा आणि मानवतेचे पुतळे असतात. डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर, डॉ. आयडा स्कडर यांच्या मनात अखिल मानवतेविषयी करुणा सतत झिरपतच असते. अशा सर्व पाश्चात्यांच्या चरितकहाण्या वेगळ्या अस्वादायला हरकत नाही. अशा चरितकहाण्या ह्या निश्चितपणे चरित्रात्मक कादंबऱ्याही नसतात आणि तो केवळ इतिहास आणि इतिवृत्तही नसतं. सर्वांगांनी उकलत जाणारी ती व्यक्ती खिळवून मात्र जरूर ठेवते. अशा तऱ्हेचं लिखाण जाणीवपूर्वक आणि सातत्यानं करणाऱ्यांमध्ये वि. स. वाळिंबे, वि. ग. कानिटकर आणि सुमती देवस्थळे ही नावं चटकन् डोळ्यांसमोर येतात. त्यातही देवस्थळेंची हाताळणी थोडी वेगळी आहे. टॉलस्टॉय, मार्क्स किंवा श्वाइट्झर यांच्यातला माणूस त्या शोधतात. वाळिंबे आणि कानिटकर आपल्या ओघवत्या शैलीनं गंभीर विषयाचं आणि उंच व्यक्तिमत्त्वाचं आव्हान सहज पेलतात.

आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्तींविषयी वाळिंब्यांना ओढ आणि कुतूहल आहे. हिटलरसारख्या व्यामिश्र व्यक्तिमत्त्वाला हात घालताना तो आधी स्वतःला पूर्ण समजला आहे याची गाठ अभ्यासाच्या जोडीनं खात्री पटवून घेतात. हिटलर हे विसाव्या शतकानं अनुभवलेलं विलक्षण व्यक्तित्व होतं. पराकोटीचा आदर आणि आत्यंतिक तिरस्कार त्याच्या वाट्याला आला. पूर्वजांची प्रतिष्ठा किंवा पुण्याई, पैशाचं बळ, बुद्धीचं वैभव यापैकी काहीही नसताना हिटलरनं सतत दहा वर्ष जगावर हुकमत गाजवली. मानवी क्षमता किती दिशांनी आणि किती प्रमाणात काम करू शकेल ? माणसाच्या क्षमतेविषयी ज्यांना कुतूहल आहे, त्यांना ही चरित कहाणी सुन्न करून टाकेल. पण क्षमतेच्या टोकानंतर पुढं फक्त उतारच असतो आणि मृत्यू हा त्याचा शेवट असतो. क्रांती आपल्या पुत्रांचा बळी घेते म्हणतात. पण हिटलरसारख्या बेगुमान व्यक्तिमत्त्वाचा शेवट असा दयनीय व्हावा ही घटना अस्वस्थ करणारी आहे. हिटलरने अनन्वित अत्याचार केले, पण

म्हणून त्याच्याविषयी निव्वळ घृणा वाटत नाही. कारण वाळिंबे म्हणतात, माणसाला शुभंकराप्रमाणेच भयंकराचाही आकर्षण असतं. हिटलरने जर्मनीला बलशाली राष्ट्र बनवलं. जर्मन गरूडाच्या रक्तबंबाळ पंखात आभाळ-झेप भरली. इतिहास त्याच हे कार्य विसरणार नाही. क्रौर्याच्या जोडीला त्याच्याजवळ महत्त्वाकांक्षा आणि राष्ट्रप्रेम होतं म्हणून त्याचं क्रौर्यही क्षम्य ठरलं. ते एक विनाशक वादळ होतं. राष्ट्रबांधणीतून युद्ध उद्‌भवली आणि त्याला चर्चिल, रूझवेल्ट, स्टॅलिन या मातब्बराशी झुंज द्यावी लागली. हिटलरची क्रूरकर्मा ही प्रतिमा बाजूला ठेवून अतिशय संयत हाताळणीनं वाचनीय झालेली वाळिंब्यांची 'हिटलर' ही चरितकहाणी हिटलरमधल्या नेतृत्वगुणांचा विकास कसा झाला, त्याचा शोध घेते. त्यातून दुसऱ्या महायुद्धाचा समग्र इतिहास पार्श्वभूमीच्या स्थानावर विस्तीर्ण पटासारखा पसरलेला, पण हिटलरच्याच चित्राला उचलून धरणारा.

'विन्स्टन चर्चिल' हे अनिरुद्ध प्रकाशनचं वि. ग. कानिटकर यांनी लिहिलेलं पुस्तक हिटलरच्या नंतर लगेच वाचलं तर दुसऱ्या महायुद्धाची दुसरी बाजू स्पष्ट होते. दुसऱ्या महायुद्धाविषयी जेवढं वाचावं तेवढं थोडंच वाटतं. हिटलरच्या चरितकहाणीत ओझरतं किंवा प्रसंगवशात् दर्शन देणारा चर्चिल जेव्हा नायक म्हणून प्रगट होतो तेव्हा, दुसऱ्या महायुद्धाचं उकळत रसायन पूर्ण होतं. इथं हिटलर बाजूला जातो. जगाच्या पटावरची ही महत्त्वाची मोहरी आपल्या जागा बदलताना बघून गमत वाटते. हिटलरचे अवगुण इथं अधिक प्रकर्षानं दृश्यमान होतात, कारण ही चर्चिलची गुणगाथा आहे. 'हिटलरच्या रूपानं थैमान घालणाऱ्या नाझी भस्मासुरापुढे उभा ठाकलेला महापुरुष' असं चर्चिलचं वर्णन कानिटकर करतात. निष्कलंक चारित्र्याचा, युद्धाचं आकर्षण असूनही अतिशय हळवा होणारा, महान् प्रतिभाशाली असूनही सामान्यांना जवळचा वाटणारा हा चर्चिल दुसऱ्या महायुद्धकाळात दोस्तराष्ट्रांचा दीपस्तंभ आणि आशास्थान होता. युद्धाच्या गर्तेतून त्यानं ब्रिटनला वाचवलं. (नुसतं वाचवलंच नाही, तर अस्मिता जागृत ठेवली.) त्याच्या आयुष्याचा प्रवास किती लांब आणि वळणावळणाचा आहे. साध्या शिपाईगिरीपासून त्यानं सुरुवात केली. असंख्य लढाया अनुभवल्या. लढाया हेच त्याचं जीवन होतं, पण याच जीवनावर त्याचं विलक्षण प्रेम होत. युद्धकैदी म्हणूनही त्यान याच जीवनातल्या काही घटिका अनुभवल्या. लेखन आणि भाषण हे तर त्याचे श्वास आणि उच्छ्वास होते. त्यानं दोन महायुद्धं बघितली आणि त्यात अनेक जबाबदाऱ्या उचलल्या. लोकांनी त्याला अनेकदा नाकारलं आणि स्वीकारलं. दोन वेळा त्याच्याकडे ब्रिटनचं पंतप्रधानपद चालून आलं. दुसऱ्या महायुद्धात त्यान देशाला कुशल नेतृत्व आणि युद्धनीती दिली. पन्नास वर्षं तो संसदीय लोकशाहीचा उपासक होता एक भारदस्त आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व ! घडीची गरज ओळखून नाझी पकडीतून रशियाला सोडवण्यासाठी धावून जाणारा चर्चिल, तुम्ही मला रक्त आणि घाम द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो असे अमर उद्‌गार काढणारा चर्चिल एक समृद्ध वाचनविषय आहे.

## कानिटकरांचा लिंकन

महामानवामध्ये ज्याची गणना करावी लागेल असा अब्राहम लिंकन वि. ग. कानिटकर यांनीच लिहिलेल्या राजहंस प्रकाशनच्या 'फाळणी टाळणारा महापुरुष' या ग्रंथात लिंकन 'महापुरुष' हे नामाभिधान सार्थ करतो अशी माणसं म्हणजे गगनवेधी पर्वताची बेलाग शिखरं असतात. त्याच्याकडे बघतानासुद्धा दृष्टी अपुरी पडते. तरीही आपल्या कुवतीनुसार त्यांना पाहण्याचा आपण प्रयत्न करतच असतो. लिंकनला शब्दबद्ध करण्याचा असाच असाच एक प्रयत्न याआधी प्रभा पानवलकरांनी श्रीविद्या प्रकाशनच्या 'अब्राहम लिंकन' या पुस्तकात केला. पण खरा अब्राहम समजून घ्यायला 'फाळणी टाळणारा महापुरुष' उत्कृष्ठ. तो जसा इतिहास आहे, तसच अब्राहमचं समग्र चित्रण आहे. लिंकन फार मोठा माणूस होता. पण त्याच मोठेपण त्याच्या पचनी पडलं नाही. लोकांनी त्याला समजून घेतलं नाही. त्याच्या वाट्याला फक्त कृतघ्न टीकाच आली. इतकच नव्हे तर त्याला जगातून नाहीसंच करण्यापर्यंत लोकांची मजल गेली. कानिटकरांनी या पुस्तकात एकाच महत्त्वाच्या मुद्द्यावर भर दिला आहे. गुलामाच्या प्रश्नावर अमेरिकेचे दोन तुकडे व्हायची वेळ आली असता, त्यानं हे आव्हान कस पेलल हा इतिहास महत्त्वाचा आहे. ही एक लिंकनची राजकीय कहाणी आहे ज्या अमेरिकेसाठी लिंकननं प्राणाचं दान दिलं. ती अमेरिका हे अजब रसायन आहे. फार मोठा इतिहास नसलेलं काही शतकांपूर्वीच उदयाला आलेलं ते राष्ट्र. जगभरातून लोक तिकडे गेले. निरनिराळ्या वसाहती तिथं उदयाला आल्या अशा स्थितीत अमेरिकेची अस्मिता जपत तिला अभंग ठेवणारा लिंकन महामानवच म्हणावा लागेल लिंकनच्या खाजगी आयुष्याबद्दल बरच बोललं जात. त्याचा मुलगा आणि पत्नी यांनी त्याची कौटुंबिक आघाडी निर्दोष ठेवली नव्हती. तरी त्याची विनोदबुद्धी सतत जागृत होती. सर्वोच्च पदाबरोबर येणाऱ्या, विलक्षण ताण निर्माण करणाऱ्या जबाबदाऱ्या पेलतानाही त्याची विनोदबुद्धी लोपली नाही. युगातून कधीतरीच जन्माला येणारे असे पुरुष, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची बांधणी समजून घ्यायला हा ग्रंथ पूर्ण उपयोगी आहे.

ज्या व्यक्तीवर आजवर प्रचंड लिहिलं गेलं आणि लिहिणं कधी संपणार नाही अशी व्यक्ती म्हणजे कार्ल मार्क्स त्याच्या वादाच्या तर एकेका शब्दावर ग्रंथ होईल. मार्क्सचे विचार आणि तो स्वतः व्यक्ती म्हणून फारकत करून लिहिणं अशक्यच आहे. कारण मार्क्सवाद आणि मार्क्स पूर्ण एकजीव झालेले. त्यांना अलग कसं करणार ? दोघ एकमेकाशिवाय अपुरे आहेत. तथापि मार्क्स माणूस म्हणून फार रसाळ आहे. त्याचं जीवन आपल्यासारखच सामान्य विवंचनांनी भरलेलं आहे. १९८३ मध्ये कार्ल मार्क्सची १०० वी पुण्यतिथी झाली. त्यानिमित्त 'कार्ल मार्क्स' या आपल्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती विनायक भुस्कुटे यांनी काढली. या पुस्तकात विचारावर जास्त भर आहे श्रीविद्या प्रकाशनचं 'मानव आणि मार्क्स' हे प्रभाकर पाध्ये लिखित आणखी एक पुस्तक आहे. पण तेही त्याच्या वादाच्या अंगानच जाणार. निसर्ग, समाज आणि मानव यांच्या परस्पर संबंधातून मानवतेचं भवितव्य सांगणारा आणि मानवी जीवनाचा रहस्यभेद करणारा मार्क्स हा असामान्य प्रतिभावंत होता. ही त्याची प्रतिमा चितारण्यात पाध्यांनी बौद्धिक

कसब दाखवलं आहे. सामान्य माणसाला मार्क्स समजावा, त्याच्या थोडं तरी जवळ जाता याव म्हणून त्याला सोपं करण्याचा यशस्वी प्रयत्न सुमती देवस्थळींनी केला. 'एक विचारवंत : कार्ल मार्क्स' या विश्वकर्मा साहित्यालयाच्या प्रकाशनात लेखिकेनं मार्क्सवादाच्या गहन प्रदेशात न शिरता त्याच्या आयुष्याचा आलेख काढला आहे. मार्क्सच्या रूढ प्रतिमेपेक्षा तो माणूस म्हणून फार वेगळा होता. नाना ऐतिहासिक घटनानी भरलेलं त्याचं आयुष्य होतं. धगधगीत क्रातीवर विश्वास ठेवणारा, करुणेनं भारावून अत्याचाराची दाद मागणारा, कर्तृत्वाची आच जागती ठेवणारा, श्रमशक्तीचं मोल शास्त्रीय भाषेत सागणारा, शोषितांना झगडयाची, संघर्षाची प्रेरणा देणारा, वर्गविरहित नवसमाजाची स्वप्ने बघणारा, अशी मार्क्सची विविध रूपं देवस्थळे यानी फार उत्कटपणे रेखाटली आहेत. मार्क्सच्या आयुष्याच आणि व्यक्तिमत्त्वाचं सार त्यांनी काढून दाखवलं आहे. कोणत्याही भौतिक प्रेरणेचं सावट त्याच्या व्यक्तिगत जीवनावर नव्हतं. त्याला 'एकॉनॉमिक मॅन' म्हणून संबोधल जातं, पण त्याच्या एकाही वृत्तीची सांगड अर्थार्जनाशी घालता येणार नाही. आर्थिक चणचण तर त्याच्यामागे हात धुवून लागली होती. या त्याच्या भटक्या ससारात त्याची पत्नी जेनी हिनं पूर्ण साथ दिली. एका प्रखर मेंदूची ती शांती होती. तिनं दागिने गहाण टाकावे, चांदीची भाडी विकावीत आणि मानपतेचं कल्याण करायला निघालेल्या आपल्या पतीचा संसारगाडा चालवावा. संसार पाठीवर घेऊन ती दोघं भटकली. हद्दपारी तर किती तरी वेळा सोसावी लागली. मार्क्सच कुटुंबवत्सल, मुलांवर नितात प्रेम करणाऱ्या पित्याचं रूप सुमतीबाईंनी सुरेख रंगवलय मार्क्स एका बाबतीत मात्र परम भाग्यवान होता. त्याला एंजल्ससारखा जिवलग मित्र मिळाला होता. त्याची मैत्री ही मार्क्सच्या आयुष्याची रुपेरी बाजू. तीच त्याची संपत्ती. मार्क्सला जगासमोर योग्य रूपात आणण्यात एंजल्सचा फार मोठा वाटा आहे.

## जिज्ञासापूर्ती–टॉलस्टॉय

सुमती देवस्थळी याचंच, राजहंस प्रकाशनचं 'टॉलस्टॉय एक माणूस' हे वाचनमूल्य असलेलं पुस्तक. विलक्षण प्रतिभासंपन्न, विश्वशांतीचा मार्गदर्शक, दलितांचा कैवारी, सत्याचा उपासक, शिक्षणशास्त्रज्ञ, अध्यात्मवादी, तत्त्वचिंतक अशा गुणसमुच्चयानं टॉलस्टॉयचं व्यक्तित्व घडलेलं. सत्य, प्रेम, शाती, त्याग आणि सेवा याची ती एक मूर्तीच होती; पण त्याचबरोबर व्यवहारशून्य आणि चक्रम अशी विशेषणही त्याला चिकटली होती. नव्वद वर्षांचं भरपूर आयुष्य त्याला लाभलं. त्यातही त्यानं लग्न बरंच उशीरा केलं. त्याला सात मुलं होती. त्याची पत्नी सोफाया आणि त्याची मुलं (अपवाद फक्त एका मुलीचा. तिचं नाव सोन्या. मरेपर्यंत त्यानं फक्त या मुलीलाच आपलं मानलं.) या सर्वांनी त्याला वेडसर आणि अर्धवट ठरवलं होतं. त्याच्या पत्नीनं तर त्याची पद्धतशीर नालस्ती केली. टॉलस्टॉयची मतं आणि तिचा स्वभाव याचे सूर कधीच जुळले नाहीत. त्याच्या जीवनात जेवढया विसंगती, तेवढया इतरत्र क्वचितच आढळतील. एवढा मोठा जगन्मान्य लेखक; पण व्यक्तिगत जीवनात तो असफल ठरला. त्याची करुण शोकांतिका झाली. अखेरच्या दिवसात तो घरादारापासून दूर गेला. एका बागेतल्या बाकावर सोन्याच्या सान्निध्यात त्याला मृत्यू आला. त्याच्या मृत्युनंतर रशियन सरकारला त्याच मोल कळलं. साहित्यविश्वातल कैलास लेणं ज्याला म्हणता येईल, अशी त्याची 'युद्ध आणि शांती' या कादंबरीच्या निर्मितीची कहाणी श्रीमती देवस्थळे यानी फार मन लावून सांगितली आहे. सगळी जिज्ञासा पूर्ण होते.

आंतरराष्ट्रीय राजकीय रंगमंचावर आपल्या आगळया तेजानं तळपणारा तारा म्हणून लेक वॉलेसाचा उल्लेख करावा लागेल. 'लेक वॉलेसा' हे शब्दचित्र डॉ. श्रीकात मुदरगी यांनी लिहिलं आहे आणि राजहंस प्रकाशननं ते प्रसिद्ध केलं आहे. व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करणाऱ्या जुलमी राजवटीविरुद्ध लढणारा लेक वॉलेसा हा खरोखर कुतूहलाचा विषय आहे. डॉ. मुंदरगीनी यापूर्वी कर्नल गडाफी, अन्वर सादात, बोगीन, अराफत याच्यासारख्या अगदी अलिकडच्या नेत्यांवरही लिहिलेलं आहे. आपल्या देशासाठी आणि जागतिक राजकारणातही त्या सर्वांचं योगदान आहे; पण लेक वॉलेसानं मात्र जगाचे डोळे दिपवले. कारण त्याचा लढा रशियासारख्या बलाढ्य सत्तेशीच प्रत्यक्षाप्रत्यक्षरणे होता. जनरल यारुझेलस्कीनी पोलंडमध्ये लष्करी कायदा जारी केला. पोलंडमधल्या घटना आणि लेक वॉलेसाच्या 'सॉलिडॅरिटी' या संघटनेनं सुरू केलेल्या चळवळीचा तो परिणाम होता. लेक वॉलेसा हा पोलंडसाठी अधारातला प्रकाशकिरण ठरला. लेक वॉलेसा आणि सॉलिडॅरिटी या दोनच शब्दानी पोलंडमध्ये खळबळ उडवून दिली. पोलंडचे सर्वसत्ताधीश होते यारुझेलस्की; पण लोकांच्या नजरेत ते खलनायक होते. त्याचा नायक होता वॉलेसा. त्याच्याजवळ सत्ता, पैसा काही नव्हतं. तरीपण लक्ष लक्ष जनसमुदायाला बांधून ठेवण्याचं सामर्थ्य त्याच्या ठिकाणी होतं. त्याचं बोलणं आणि वाणी अद्भूत होती. रशियन रणगाड्यांसमोर पोलिश जनतेचा लढा त्यानं उभा केला. तो रशियन दडपशाहीविरुद्धचा लढा होता. सॉलिडॅरिटी ही त्याची शुद्ध कामगार संघटना होती. लेक वॉलेसाला अटक केली तरी त्याच्या केसालाही धक्का लावण्याची हिंमत कोणात नव्हती. कामगाराच्या कल्याणासाठी अस्तित्वात आलेल्या साम्यवादी राष्ट्रातच कामगारानाच आपल्या मागण्यासाठी संप करावा लागावा, यापरती विसंगती कोणती असू शकेल? एका विजयी लढयाचं हे चित्रण आहे.

जनसेवेच व्रत घेऊन, देशाचा आणि घरादाराचा त्याग करून, जीविताला दया करुणेचंच रूप देणाऱ्या डॉ. आल्बर्ट श्वाइट्झर आणि डॉ. आयडा स्कडर यांच्यासारख्या काही व्यक्ती असतात. डॉ. आयडा स्कडर यांची चरितकहाणी सांगितली आहे वीणा गवाणकर यांनी राजहंस प्रकाशनात. पुस्तकाचं नाव 'डॉ. आयडा स्कडर'. अमेरिकेत जन्मलेली एक आठ वर्षांची मुलगी, न्यूयॉर्क सोडून प्रथम आपल्या वडिलांबरोबर भारतात आली मद्रासमध्ये. त्यावेळी तिथं तिनं भूक, दारिद्र्य, दैन्य, अनारोग्य आणि उपासमार पाहिली. ते चित्र तिच्या मनावर पक्कं कोरल गेलं; पण त्यावेळी तिला हा देश मुळीच आवडला नाही. तसं ती मैत्रिणीला म्हणालीसुद्धा; पण हाच देश तिच्या निस्सीम प्रेमाचा विषय झाला. हीच मुलगी

आयडा स्कडर आणि तिची कर्मभूमी होती दक्षिण भारतातलं वेलूर. तिच स्वप्न होतं वैभव आणि ऐषारामाचं; पण जे वास्तव तिन आपण होऊन स्वीकारलं ते होतं सेवामय दैन्य. तिनं गोरगरिबांसाठी आयुष्य वेचलं. लोकांना शारीरिक दुखण्यावरच केवळ औषध दिल नाही, तर त्या भागातली बालविवाह, बालमाता, देवदासी, अशिक्षित, दाया यासारखी सामाजिक दुखणीही निस्तरली.

एका वेगळ्या क्षेत्रातल्या व्यक्तीची डॉ. कार्व्हरची चरित कहाणी सौ. वीणा गवाणकर यानी स्कडरच्या पूर्वीच लिहिली होती. ती इतकी लोकप्रिय झाली की, राजहस प्रकाशनला तिसरी आवृत्तीही काढावी लागली. निग्रोच्या अस्मितेसाठी त्यानं आपलं अस्तित्वच वेचलं. काहीतरी सत्कार्य करत रहायचं ही त्याची वृत्ती होती. त्या वृत्तीला त्यानं कधी आत्मसमाधानाच्या बिंदूपर्यंत येऊ दिलं नाही. पैसा आणि कीर्ती दोन्ही मिळण्याची शक्यता असताना त्यानं त्या गोष्टीना यत्किंचितही महत्त्व न देता, जगाच्या उपयोगी पडण्यातच धन्यता मानली. त्याची कामगिरी कृषिक्षेत्राबरोबरच विज्ञान आणि शिक्षणक्षेत्रातही लक्षणीय होती. डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांनी भूगर्भातील उत्पादन साधनाचा योग्य विनियोग व्हावा म्हणून जगभर लोकाचे लढे उभारले. त्यासाठी त्यानं स्वत: तयार केलेल्या साध्या उपकरणांचा वापर केला. एक लोकविलक्षण आयुष्य तो जगला.

जगाच्या काही भागात अशी मानवजात राहते की, रोग आणि मृत्यू याना ती शरण गेलेली आहे आणि यातना-वेदना सहन करणं एवढंच तिला माहीत आहे. त्याच्यासाठी आपलं सुखासीन आयुष्य त्यागून पडतील ते कष्ट उपसण्याची तयारी असणारे डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर याच्यासारखे महामानव असतात. आपला युरोप देश सोडून ते आफ्रिकेच्या घनदाट जगलात गेले. साधं लाकडीघर तयार करण्यासाठी त्याना झाड तोडून जागा करावी लागली. साप, विंचू, डास, विषारी माशा यांच्या सहवासात ते राहिले. अज्ञान, गोरगरिबांसाठी ते देवदूत ठरले. साथीला त्यांची पत्नी होती. डॉ. श्वाइट्झर यांनी दोन विषयात डॉक्टरेट मिळवली होती. माणूस केवढी प्रचड ज्ञानोपासना करू शकतो याचा आदर्शच ! आफ्रिकेत त्यानी जे कार्य केल, त्याचा जगाला कदापि विसर पडणार नाही. अशा व्यक्तीची आयुष्यकथा सांगितली सुमती देवस्थळे यानी मॅजेस्टिक प्रकाशनच्या 'डॉ. अल्बर्ट श्वाइट्झर' या पुस्तकात.

या सर्व महापुरुषांच्या चरितकहाण्या वाचल्या म्हणजे वाचता येण्याचं सार्थक होतं.

—आशा कर्दळे

रंगभूमी

कानेटकरांचे नवे नाटक

# मदनबाधा

मदनबाधा हे वसत कानेटकराचे नवीन नाटक. नावावरून काही अंदाज करता येणे शक्य आहे. पण केवळ वाच्यार्थाने त्या कडे पाहून चालणारे नाही. ते या निमित्ताने काही सांगू इच्छितात, मांडू इच्छितात ते कितपत यथायोग्य आहे हेही पाहायला हवे. तसे पाहिले तर या नाटकाचा विषय नवा नाही. कादंबरी, नाटक आणि चित्रपट ह्या तिन्ही माध्यमांतून तो हाताळला गेला आहे. किंबहुना तो सनातन विषय आहे असेही म्हणता येईल.

'मॅन, वुमन अँड चाइल्ड' या कलाकृतीचा आधार मदनबाधेला आहे. यावर रत्नाकर मतकरीनी 'जोडीदार' नामक नाटक लिहिलेले अनेकांना स्मरत असेलच. तसेच 'मासूम' ह्या चित्रपटही अनेकानी पाहिला असेल. इतके होऊनही कानेटकराना त्यावर नाटक का लिहावेसे वाटले हा खरा प्रश्न आहे. नाट्यविषयाचे नवेपण, वेगळेपण जसे महत्त्वाचे असते तशीच त्याची हाताळणीही तितकीच महत्त्वाची ठरते.

'मदनबाधा'त कानेटकरानी सर्वात एक महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे मूळ विषयातील-कथानकातील लहान मुलाला रंगमंचावर आणलेला नाही. 'जोडीदार', 'मासूम'मध्ये मुलाला प्रत्यश व्यक्तिरेखा म्हणून आणून त्याच्याच भोवती सारे केन्द्रीत केलेले आहे. साहजिकच तिथे त्या मुलाच्या अगाने आणि अर्थातच भावनिकतेच्या वळणाने त्या कलाकृती सिद्ध झाल्या. ती एक पद्धत निश्चितच परिणामकारी ठरली. पण कानेटकरांनी मुलाला प्रत्यक्ष रगमचावर न आणता इतर व्यक्तिरेखांच्या सवादातून संदर्भ म्हणून वापरला आहे. यामुळे नाटक पती-पत्नीचे झाले. तेच कानेटकराना अभिप्रेत आहे.

नाट्यविषयाची हाताळणी करताना कानेटकरांनी काही गोष्टीचा आवर्जून वापर केलेला आहे. उदाहरणार्थ श्रीधर व्यंकटेश केतकर याचे स्त्रीविषयक विचार, तसेच मातृसत्ताक पद्धतीची विचारसरणी, त्यातही ती स्त्री नक्षलवादी असणे वगैरे. त्याहीपेक्षा त्याचा भर आहे तो घरातली स्त्री किंवा पत्नी जेव्हा आपल्या नवऱ्याच्या सदर्भात परस्त्री सबधातले काही कळाले तर कोणती भूमिका घेते. आपण इतक्या सुदर असून, नवऱ्याला सर्वतोपरी सुखी ठेवण्याचा यत्न करूनही आपला नवरा जेव्हा परस्त्रीच्या मोहात अडकतो तेव्हा त्या घटनेचा अन्वय कसा लावायचा ?

हा प्रश्न नाटकामध्ये कानेटकरानी विनोदी आणि गांभीर्याच्या स्तरावर असा दोन्ही पद्धतीने हाताळलेला आहे. लेखक म्हणून त्यांनी कोणत्या पद्धतीने हाताळणी करावी हे स्वातंत्र्य त्यांना आहेच. ते विनोदाच्या अंगाने या विषयाचा जेव्हा आविष्कार करतात तेव्हा आरभी प्रेक्षकाला काहीसे अवघडायला होते. कारण इतक्या तपशिलात पती-पत्नीचे बोलणे आणि तेही परस्त्रीच्या सबंधातले) ऐकताना त्रयस्थ म्हणून कुतुहलही असते आणि जेव्हा त्या व्यक्तिरेखेच्या सदर्भात आपण कल्पनेने विचार करू लागतो तेव्हा अनेक प्रश्नाचा गुंता सुरू होतो. नाटकाच्या शेवटी पत्नी जेव्हा म्हणते की, असे हे घडलेच कसे ? मला वाटते कानेटकरांना मानवी स्वभावाच्या याच विशेषावर भर द्यायचा असावा. अनेक घटना-प्रसगाची गणिती उत्तरे माणसाला मिळत नाही. एखादी घटना हातून घडून जाते. त्याच्या परिणामाची वेळ आली की सारे उध्वस्त होते. त्याच वेळी सारखे वाटत राहते की असे कसे घडले ? कितीही समर्थने

दिली तरी ती अपुरीच राहतात. शेवटी एकमेकाना सांभाळून राहावे लागते. तुमची जीवनदृष्टी काय आहे यावर निर्णय अवलंबून राहतो!

आणखी एका गोष्टीचे सूचन कानेटकरानी या नाटकात केले आहे. ते म्हणजे या प्राध्यापकाची तरुण मुलगी, विचाराने-आचाराने काहीशी धीट आहे. बडखोरीच्या दिशेला जाणारी आहे. तिलाही मातृसत्ताक पद्धतीचे तारुण्यसुलभ आकर्षण आहे. त्यातले फार खोलवर कळते आहे असे नव्हे, पण एखाद्या विचाराने कोवळ्या वयात झपाटून जावे तसे तिचे झाले आहे. पण ज्या स्त्रीच्या विचाराने वागण्याने ही मुलगी झपाटली. ती स्त्रीच आपल्या वडलाच्या चर्चित प्रकरणाशी संबंधित आहे असे कळताच सारेच सपते. शेवटी आपले आयुष्य सदर्भ झाले किंवा उदाहरण म्हणून आपण किंवा आपले घर आले की माणसे मोडतात. सपून जाण्याची शक्यता असते. कानेटकरांनी यातले दोन्ही स्तर त्या व्यक्तिरेखेतून उत्तम रीतीने व्यक्त केले आहेत.


विषय माहीत असूनही आपल्याला गुतवून ठेवणाऱ्या नाटकाच्या सदर्भात जाणवते असे की, यातला पहिला अक आणि दुसरा अक यांच्या रचनेत आणि नाटयपरिणामाच्या गुणवत्तेत लक्षात येण्याइतकी तफावत आहे. पहिला अक बऱ्याच गोष्टीची ओळख करून देण्यात आणि घडलेल्या घडनाबाबत बरेच काही सागण्यात खर्ची पडला आहे. लेखनातली ही तफावत प्रयोगातही सतत जाणवत राहते. कानेटकरांच्या संदर्भात असे घडावे याचे आश्चर्य वाटते. कारण विविध विषयाची उत्तम हाताळणी आणि नाटयरचनेवर त्याची असलेली हुकमत यासाठी त्यांची ख्याती आहे.

चंद्रलेखा सस्थेने हे नाटक प्रयोगित केले आहे म्हटल्यावर त्यातल्या सुविहितपणाविषयी निराळे सागण्याची आवश्यकता नसावी. नेपथ्य-प्रकाशयोजना स्वतः मोहन वाघाची होती. एका सुविद्य, सधन प्राध्यापकाचे घर म्हटल्यावर जे जे आवश्यक ते ते यथायोग्यपणे होते. दिग्दर्शनाची जबाबदारी अरविंद देशपांडे यांनी स्वीकारली होती. त्याने त्याच्या नेहमीच्या पद्धतीने प्रयोग व्यवस्थित होईल याची काळजी घेतलेली होती. प्रसगाचे अपेक्षित परिणाम येण्यासाठी कलाकाराच्या हालचाली, संवाद बोलणे यावर विशेष लक्ष दिले होते वंदना गुप्ते आणि यशवत दत्त हे दोघे मध्यवर्ती भूमिकेत होते. या दोघानीही त्यातले हास्य आणि गांभीर्य नेमकेपणाने व्यक्त केले. दोघाची रंगमचीय रूपे आता प्रेक्षकमान्य आहेत याची पुन्हा एकदा खात्री झाली. या दोघानी दुसरा अंक उत्तम रीतीने पेश केला. तिथेच त्याना आव्हान होते. विषयातली प्रौढता आणि खेळकरता असा सतत छायाप्रकाशी अभिनयाचा खेळ त्यांनी केल्याने प्रयोगाला जिवंतपण आले. छोटया भूमिकांमध्ये कादळगावकर उपेन्द्र दाते, वाड, इत्यादी कलाकार होते.

¤

**बापूराव माने यांचे निधन :** ३१ जानेवारी ८६ ला नटवर्य बापूराव माने याचे निधन झाले. बालगंधर्वांच्यानंतर ज्या पुरुष कलाकारानी स्त्री-भूमिका केल्या अशामध्ये बापूरावाच्या कामगिरीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. आचार्य अत्रे याच्या बहुतांश नाटकातून त्यानी भूमिका केल्या. विशेषतः उद्याचा ससार, घराबाहेर, जग काय म्हणेल, मोरूची मावशी, साष्टाग नमस्कार, लग्नाची बेडी, तो मी नव्हेच, डॉ. लागू अशा अनेक नाटकांतून महत्त्वाच्या भूमिका त्यानी केल्या. त्यामध्ये 'मोरूची मावशी' तील बडचा ढगमवार आणि 'लग्नाची बेडी' तील रश्मी ह्या भूमिका विशेष लोकप्रिय झाल्या. अलिकडे त्यानी जिजाबाईच्या जीवनावर एकपात्री प्रयोग गावोगाव जाऊन सादर करण्याचा प्रयत्न केला होता. 'इदन मम' हे आत्मवृत्तही त्यानी लिहिले. वयाच्या ७४ व्या वर्षीपर्यंत लहानसहान भूमिकाच्या निमित्ताने त्याचा रगभूमीशी सबंध राहिलेला होता.

—वि. भा. देशपांडे



चित्रपट

# 'कत्ल'

## फक्त संजीवकुमार उल्लेखनीय

संजीवकुमारच्या अकाली निधनानतर आलेला 'कत्ल' हा त्याचा पहिला चित्रपट. चित्रपटाच्या नावावरून आणि त्याची जी जाहिरात करण्यात येते त्यावरून हा रहस्यपट असावा हे सहज लक्षात येते. पण या रहस्याची माडणी नीट पद्धतीने झालेली नाही. चित्रपटात रहस्याला प्राधान्य देण्याऐवजी इतर गोष्टीनाच प्राधान्य दिलं गेल्यानं जो एक प्रभावी रहस्यपट बनू शकला असता, तो चित्रपट केवळ सजीवकुमारच्या अभिनयानच लक्षात राहिला आहे.

'कत्ल'ची नायिका आहे रोहिणी. (सारिका) अभिनेत्री बनण्याची इच्छा असलेल्या या सुदर तरुणीला रणजित (मार्क झुबेर) हा निर्माता आपल्या नाटकात सधी देऊ पहातो. पण रोहिणीजवळ अभिनय नसल्याने दिग्दर्शक तिला नाटकात घ्यायचं नाकारतो. अशा वेळेस तिला मदतीचा हात देतो राकेश (संजीवकुमार) हा प्रसिद्ध अभिनेता. त्याच्या मदतीनं रोहिणी स्टेजवर नाव मिळवते. आणि त्याच्या या उपकारांमुळेच रणजितवर प्रेम असतानाही राकेशने मागणी घातल्यावर त्याच्याशी लग्न करते.

लग्नानतर स्टेजवर काम करत असताना झालेल्या अपघातातून रोहिणीला राकेश वाचवतो. पण या प्रयत्नात त्याचे डोळे जातात त्याचा अभिनयचा रस्ता बद होतो.

रोहिणी मात्र त्याच्या अंधपणाचा फायदा घेऊन पुन्हा रणजितशी संधान बांधते. राकेशला याची काहीच कल्पना नसते. आणि थोड्या दिवसानी रोहिणी रणजितच्या फ्लॅट मध्ये मृतावस्थेत आढळते. कुणी तरी रणिजितच्याच रिव्हॉल्व्हरने तिचा खून केलेला असतो.

या खुनाची चौकशी करणाऱ्या इन्स्पेक्टर शत्रू (शत्रुघ्न सिन्हा) समोर तीन संशयित असतात. एक खुद्द रणजित, दुसरा राकेश आणि तिसरी राकेशची देखभाल करणारी

आणि रोहिणीचं वर्तन पसत नसणारी नर्स (रंजिता.)

या तिघापैकी खुनी कोण असत हे पहाण लेखक, दिग्दर्शकानं फारसं मनोरजक केलेलं नाही. मुख्य म्हणजे रहस्यपटाला जो वेग लागतो त्याबाबतीतच या चित्रपटान मार खाल्ला आहे. दिग्दर्शक आर. के. नय्यरच्या संथ हाताळणीमुळं चित्रपट बराचसा कटाळवाणा होतो.

रहस्यपटात विविध घटना आणि सभाव्य संशयिताभोवती घटनांचे जे जाळे अपेक्षित असते तेही इथ नाही. कथा तशी बरीच सरळसोट पद्धतीनं जाते. खुन कुणी केला असावा याबद्दल प्रेक्षकानं अंदाज बाधणं आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसणं ही करामत इथं लेखक–दिग्दर्शकाला बिल्कुल साधलेली नाही. कारण खुनी कोण असावा हे प्रेक्षकाला सुरुवातीपासून कळावं अशीच चित्रपटाची रचना आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे रहस्यपटात रहस्याला जास्त महत्त्व हवं, याकडेही दुर्लक्ष झालेलं दिसतं. त्यामुळ चित्रपटाच्या पूर्वार्धात नाच, गाणी यासारख्या अनावश्यक घटना घडत असतात. खून आणि त्या भोवतालचं रहस्य जर अधिक गडद करता आलं असतं तर चित्रपट खूपच प्रभावी ठरू शकला असता.

दिग्दर्शक म्हणून आर. के. नय्यरांची कामगिरी म्हणूनच फारशी समाधानकारक नाही. निर्माता म्हणून त्यांनी सेट्स वगैरे उची लावले असले तरी त्यात दर्जा किंवा कलात्मकता बिल्कुल दिसत नाही. दुसरं म्हणजे नाटक म्हणून त्यांनी सतत नाच दाखवले आहेत. ज्या अभिनयासाठी रोहिणी प्रयत्न करते तो अभिनय स्टेजवर करताना ती कधीच दिसत नाही. दिसते ती नाचताना.

रहस्यपट म्हणून जाहिरात केलेल्या या चित्रपटाचा हा खेळखंडोबा सावरला आहे तो संजीवकुमारन. या दर्जेदार अभिनेत्यान राकेशची भूमिका चांगली रंगवली आहे. पत्नीवर जिवापाड प्रेम करणारा, अंधत्व आल्यावरही खचून न जाणारा आणि पत्नीनं केलेल्या विश्वासघातानं संतापलेला हे सगळे भाव त्यानं सहजतेनं दाखवले आहेत. त्यानं एकट्यानं हा चित्रपट सावरला आहे असं म्हटलं पाहिजे.

रोहिणीच्या भूमिकेसाठी सारिकाची निवड योग्य वाटते. तिनं आणि रंजीतानही ठीक काम केलं. मार्क झुबेरला मात्र फारसा वाव नाही. सगळ्यात वाईट काम केलय शत्रुघ्न सिन्हानं. त्याची भूमिका बरीचशी 'ऐतबार' मधल्या डॅनीच्या भूमिकेसारखी आहे. पण डॅनीनं बावळट दिसणारा; पण अतिशय हुषार पोलीस अधिकारी कुशलतेन रंगवला होता. शत्रुघ्न सिन्हा इथ त्या पद्धतीने प्रयत्न करताना कृत्रिम वाटतो. तो मुद्दाम हे सगळे करतोय हे जाणवत रहात. त्यामुळे त्याची भूमिका हास्यास्पद झाली आहे.

चित्रपटाच्या तांत्रिक बाबीत जसं काही खास उल्लेखनीय नाही तसच लक्ष्मी–प्यारेच्या संगीतातही नाही.

साराश, सजीवकुमारच्या आणखी एका चागल्या भूमिकेसाठीच फक्त 'कत्ल' पहाण्यासारखा.

—सीमा कुलकर्णी

## मल्याळी अभिनेता – गोपी

सध्या मल्याळी फिल्म अभिनेता गोपी अनेकाचा चर्चाविषय झालाय. दक्षिणेत ते 'कोडियट्टम गोपी' याच नावाने ओळखले जातात. शरीराने तसे ते अगदी सुमार, टक्कलवाले, सडपातळ असे आहेत. लक्षात रहाण्याजोगं त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कसलच वैशिष्ठ्य नाही. मात्र पडद्यावर त्यांना पहात असताना लक्षात रहात ते फक्त ते पात्र, ज्याची भूमिका ते वठवीत असतात. अभिनयाची इतकी विविधता फारच क्वचित दिसून येते.

१९७२ मध्ये 'स्वयवरम्' मध्ये एक छोटासा रोल त्यानी केला होता. दिग्दर्शक होते श्री. अदूर गोपालकृष्णन्. ती छोटी भूमिका प्रेक्षकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहिली. तेव्हा ते सरकारी नोकरीत होते व फिल्मलाइनमध्ये जायचा त्यांचा विचार नव्हता. ७८ मध्ये 'कोडियट्टम' या चित्रपटात एका भटक्या खेडुताचा अभिनय केला होता. या भूमिकेसाठी त्याना राष्ट्रीय पारितोषिक मिळाल. या चित्राने त्यांचं जीवनच बदललं. मध्यमवर्गीय गोपी त्रिवेंद्रम शेजारच्या चिरायकील या खेड्याचे रहिवासी. त्यांना प्रथम रंगमंचावर आणल, त्रिचुरच्या अभिनय शाळेच्या प्रो. जी. शंकर पिल्लै ह्यानी. तथापि गोपी फिल्मीजगात वा रंगभूमीवरही स्वत ला एक सामान्य कर्मचारी मानतात.

त्याच्या नसा-नसातून अभिनय भरला आहे. चित्रपटातील प्रवासाआधी त्यानी कित्येक नाटकातून कामं केली.

हिंदीत त्यांच पहिल चित्रं होतं–मणिकौल दिग्दर्शित 'सतह से उठा आदमी' व दुसरं चित्र गोविंद निहलानी याच 'आघात'. आघातमध्ये त्यानी अशा एका ट्रेड युनियन लीडरचा रोल केलाय की जो नुसत्या नजरेने सारी क्रूरता प्रदर्शित करतो... एक अशी व्यक्ती की जी केरळहून येऊन मुबईत स्थायिक झाली असून गुडगिरीच्या जोरावर आपल नेतृत्व घट्ट करते.

गोपी म्हणतात की, चित्रपटाची सख्या अथवा त्यावर मिळणाऱ्या पैशाची मुळीच चिंता करीत नाही मी ! लाख वा कोटी रुपयाच मला मुळीच महत्त्व वाटत नाही. इतका खूप पैसा मिळाल्यावर मृत्यूच्या प्रतीक्षेखेरीज तुमच्या आयुष्यात उरतच काय ? मी तर कफल्लक म्हणून मरणं जास्त पसत करीन.

त्याच्या मते ते अपघातानेच नट झाले. अभिनयात सहजता कशी आणावी हे सांगता येत नाही, ती गोष्ट आपोआपच येते. त्यासाठी ते खास असा कुठला प्रयत्न तर राहोच; पण त्यासाठी कुणा व्यक्तिचं निरीक्षणही करत नाहीत. नट व्हायला तुमच्यापाशी प्रतिभा हवी असं ते मानतात. अभिनय शिकवला जाऊ शकत नाही. तसंच फिल्म हे फक्त दिग्दर्शकाच माध्यम आहे, हेही त्यांना मंजूर नाही. आजवर त्यानी जितक्या चित्रपटात काम केलीत, त्याहून जास्त नाकारलेत. २–३ चित्रपट वगळता ते आपल्या बाकीच्या चित्रावर संतोषी आहेत.

इतर चरित्र-अभिनेत्याप्रमाणेच ते कधी टेन्सही होत नाहीत. ते म्हणतात, 'अभिनेत्याला दुसऱ्या भूमिकेतील व्यक्तीचे कपडे व मुखवटे तर चढवले जातात. बाकी अभिनय मग सहज जमतो, कोणत्याही इतर कामापेक्षा सहज' मात्र त्याच्या मते सिनेमात काम करताना कॅमेरा तुम्हाला बांधून ठेवतो. कॅनव्हास मर्यादित करतो. तरीही त्यांचा कल सिनेमापेक्षा नाटकाकडेच जास्त आहे.

'अभिनय हा फक्त अभिनय असतो– त्याला 'वास्तव', 'सहज' अशा श्रेणी लागू होत नाहीत.' मणि कौल आपल्यातून योग्य तो अभिनय काढून घेतात– त्याच हे कौशल्य ते मानतात. 'माझ्यापेक्षा ते मला जास्त चांगल जाणतात.' असं त्यांचं मत आहे. ते म्हणतात की, 'आघात' मधील कृष्णनची भूमीका केलीय मी. तसा माणूस ना मी कुठे पाहिला, अगर वाचला, त्यामुळे रोल करणं जास्त सुलभ झालं. मुबईच्याच काय पण मल्याळम् फिल्म धद्यातही त्यांना जखडून घ्यायचं नाही. अभिनेत्याने समाजासाठी सुसंस्कृत व आदर्श रहायला हवं, यावर ते जोर देतात. त्यांच्या विचाराने वाईट सिनेमात चांगल्याचा रोल करण्यापेक्षा, चांगल्या चित्रात वाईट इसमाची भूमिका करणं जास्त छान !

—मनोहर देखणे

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

बुद्धी व भावना या दोन्हींच्या सहाय्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तिमत्त्वात त्याचे संतुलन असावे लागते. हे सतुलन असणारा माणूसही पूर्ण बुद्धिनिष्ठपणे विचार करतोच असे नाही. तोही छोट्यामोठ्या अनेक समजुती स्वतःशी बाळगून असतो. त्या अवैज्ञानिकच असतात, पण तेवढ्यामुळे त्याचा तोल गेला असे होत नाही. मात्र बुद्धी व भावना याचे हे सतुलन एका मर्यादेपलिकडे बिघडले की, बुद्धी गहाण पडते. माणूस भावनेची शिकार बनतो. अधश्रद्ध होतो.

□

अधश्रद्धा निर्मूलन चळवळीतल्या एका कार्यकर्त्याने बुवाबाजी, झपाटणे, भानामती, वशीकरण, पुनर्जन्म, ग्रहाचे खेळ यासारख्या आपल्या समाजात ठाण माडून बसलेल्या गोष्टीचे केलेले शास्त्रशुद्ध विवेचन आणि अधश्रद्धा निर्मूलन चळवळीतले प्रत्यक्ष अनुभव.

**विज्ञाननिष्ठा रुजवणारे राजहंसचे नवे प्रकाशन**

# भ्रम आणि निरास

**लेखक : डॉ. नरेंद्र दाभोळकर**

**पृष्ठे : १४० / किमत : ३० रुपये**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुबई · ४०० ०२८ * फोन · ४२२ ५४५५